# 4

# भारत, दक्षिण आशिया आणि सार्क

**घटकाची रचना :**

४.० उद्दिष्टे.
४.१ प्रस्तावना.
४.२ दक्षिण आशिया : काही वैशीष्टे.
४.३ भारत.
४.४ पाकिस्तान.
४.५ श्रीलंका.
४.६ बांग्लादेश.
४.७ नेपाळ.
४.८ अफगाणिस्तान.
४.९ भुतान व मालदिव.
४.१० दक्षिण आशियातील सहकार्याला पूरक बाबी.
४.११ सहकार्याला मारक व संघर्षाचे घटक.
४.१२ सहकार्याचा उपोद्घात.
४.१३ सार्क : सहकारासाठी यंत्रणा.
४.१४ सार्कची वाटचाल.
४.१५ सार्कची कामगिरी.
४.१६ सार्कची क्षमता, भारताची भूमिका आणि मूल्यांकन.
४.१७ प्रकरणावरील प्रश्न.
४.१८ अधिक वाचनासाठी पुस्तके.

## ४.० उद्दिष्टे

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

(अ) दक्षिण आशियाबद्दल एक समग्र चित्र सादर करता येईल.
(ब) दक्षिण आशियातील देशांमधील गुंतागुंतीचे संबंध समजतील.
(क) दक्षिण आशियातील सहकार्याचे आणि संघर्षाचे घटक आपल्याला कळतील.
(ड) एक प्रादेशिक संघटना म्हणून सार्कबद्दल आपणास माहिती मिळेल.
(इ) सार्कच्या कार्याबद्दल व उपलब्धीबद्दल आपणास ज्ञान होईल.
(फ) दक्षिण आशिया संदर्भात भारताच्या भूमिकेचे विश्लेषण करता येईल.

## ४.१ प्रस्तावना

मोठ्या आशिया खंडाचा एक भाग असलेल्या दक्षिण आशिया प्रदेशाबद्दलचे वर्णन ह्या प्रकरणात केले आहे. त्यामध्ये – दक्षिण आशियातील देशांचे वैशिष्ट्ये, त्यांच्यातील परस्पर संबंध, बहुपक्षीय संबंध, त्यांच्यातील तणावाचे मुद्दे, त्यांच्यावरील अंतर्गत व बाह्य दबाव, आणि जागतिक राजकरणात ह्या देशांची पत - ह्याबद्दल विवेचन केले आहे. तसेच ह्या प्रदेशातील मुख्य देशांची प्रादेशिक संघर्षाच्या मुद्द्यावरील भूमिकेबद्दल चर्चा केली आहे. शेवटी, भारताच्या विशेष भूमिकेला अनुसरून सार्कच्या वाटचालीचे स्पष्टीकरण केले आहे. ह्या प्रकरणाच्या अभ्यासानंतर तुम्हाला दक्षिण आशियातील गुंतागुंतीचे संबंध समजतील आणि त्याचे विश्र्लेषण करता येईल.

## ४.२ दक्षिण आशिया : काही वैशिष्टे

दक्षिण आशिया मध्ये अफगानिस्तान, बांग्लादेश, भुतान, भारत, मालदिव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका हे आठ देश येतात. भौगोलिक दृष्ट्या दक्षिण आशिया एकत्रित व सलग भूभाग असून विषुववृत्ताच्या उत्तरेस वसला आहे. दक्षिण आशियाची उत्तरेकडील सिमा हिमालय पर्वतरांगानी बनली असून दक्षिणेस तीनही बाजूला हिन्दी महासागर आहे. हा प्रदेश समशीतोष्ण हवामान क्षत्रात येतो आणि त्यामुळे येथील पर्जन्यमान व हवामान, मातीचा पोत, जंगल, झाडे व फुले, पिकांच्या जाती व शेतीची वैशिष्टे इत्यादि विकासित झाली आहेत. आणि त्यामुळे दक्षिण आशियातील जनतेचे राहणीमान व जीवनशैली सुध्दा प्रभावित झाली आहे. सामाजिक दृष्ट्या दक्षिण आशियातील जीवनात अनेक वंश, जाती, धर्म व पंथ, भाषा, वेशभूषेचे प्रकार, चालीरीती व परंपरा निर्माण झाल्या. त्यामुळे दक्षिण आशियात अनेक प्रकारची विविधता दिसते. परंतु ह्या विविधतेही संमिश्र सांस्कृतिक एकतेचा आणि समग्र व आध्यात्मिक जीवनदृष्टीचा एक सशक्त धागा ह्या प्रदेशाला एकत्र जोडतो आणि विविधतेत एकता हे एक समान सूत्र ह्या प्रदेशाचे वैशिष्ट्ये बनते. हे सांस्कृतिक वैशिष्ट्य व समग्र जीवनदृष्टी हजारो वर्षाच्या वैचारिक देवाणघेवाणीतून, मंथनातून आणि सृजनशील प्रयोगातून निर्माण झाली आहे. ह्याबरोबर ह्या प्रदेशातील देश आर्थिकदृष्ट्या एकमेकांशी बांधलेले असून त्यांची अर्थव्यवस्था भौगोलिक समीपतेमुळे परस्परांना पूरक झाली आहे. दक्षिण आशियातील देशांनी इतिहासात युध्दे, परकीय आक्रमणे, वसाहतवाद ह्याची प्रचंड झळ सोसली असून त्याविरूध्द प्रखर संघर्षसुध्दा अनुभवला आहे. स्वातंत्र्यानंतर ह्या देशांना सारख्याच आर्थिक – सामाजिक – राजकीय समस्यांनी भेडसावले आणि जागतिक पातळीवर हे देश विकसनशील म्हणून गणले जातात. जगातील संपन्न व बलाढ्य देशांच्या सत्तेच्या खेळात हे देश नगण्य ठरले असून नेहेमीच दुर्लक्षित राहिले. अशा समदुःखीपणामुळे हे देश आपल्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी एक समान व्यासपीठ शोधत होते. ते त्यांना १९८५ मध्ये सार्कच्या स्थापनेमुळे मिळाले. परंतु हा विकास अनेक अडचणींचा व खडतर होता.

ह्या विकासाचे व बदलांचे आकलन होण्यासाठी प्रथम दक्षिण आशियातील आठही देशांची प्राथमिक माहिती घेणे आवश्यक आहे.

## ४.३ भारत

भारत हा दक्षिण आशियातील सर्वात मोठा देश आहे. १९४७ पर्यन्त भारत, पाकिस्तान व बांग्लादेश हे एकच देश होते आणि ह्या विस्तृत प्रदेशाला भारतीय उपखंड म्हटले जात असे. इतिहासात हिंदू सम्राटांनी पश्र्चिमेकडील अफगानिस्तान पासून पूर्वेकडील जावा-सुमात्रा बेटांपर्यत आपल्या राज्याचा विस्तार केल्याचा उल्लेख आढळतो. त्यामुळे ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या भारतीय संस्कृतीची अनेक उदाहरणे संपूर्ण दक्षिण आशियात आजही दिसतात, ज्यामध्ये प्रामुख्याने हिंदू सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक वैशिष्टे आढळतात. मध्ययुगीन काळात हिंदू संस्कृती बरोबर इस्लामी व ख्रिस्ती संस्कृतींची सरमिसळ झाल्याने एक विशिष्ट प्रकारची संमिश्र संस्कृती येथे विकसित झाली. भारतीय उपखंड हा एक संपन्न प्रदेश म्हणून ख्यात होता. येथे व्यापारासाठी अनेक देशातील लोक येत असत. पश्र्चिम व पूर्वेकडील देशांना जोडणारा हा एक दुवा होता. १९ व्या व २० व्या शतकात भारतातील स्वातंत्र्य चळवळी बरोबरच सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक पुनरूत्थानाच्या चळवळीसुध्दा जोमात सुरू होत्या. त्यामुळे भारत एक सुसंस्कृत, आधुनिक, सुदारणावादी, प्रगतीशैली, नैतिक व संयमी देश म्हणून जगात पुढे आला. भारताची स्वातंत्र्य चळवळ ही केवळ दक्षिण आशिया साठीच नाही तर साऱ्या जगातील वसाहतवाद विरोधी चळवळींना प्रोत्साहनपद ठरली. ह्यामुळे दुसऱ्या महायुध्दानंतर स्वतंत्र्य झालेल्या तिसऱ्या जगाचे राजकीय नेतृत्व आपोआपच भारताकडे आले. भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले, पण तुकडे होऊन. तरीही दक्षिण आशियामध्ये भारताचे स्थान फार महत्वाचे राहिले. क्षेत्रफळ, लोकसंख्या, अर्थव्यवस्था, सैनिक शक्ति, विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगति, भक्कम प्रशासकीय व्यवस्था इत्यादि सर्वच बाबतीत भारत इतर देशांपेक्षा मोठा व उजवा आहे. नव्या संविधानांतर्गत अनेक आदर्श व सर्वमान्य मूल्यांच्या आधारे सशक्त राजकीय संस्थांची निर्मिती करून भारताने राजकीय परिपक्वता साधली आणि जगासमोर आदर्श ठेवला. भारतीय नेत्यांनीही सुरूवातीला जागतिक राजकरणात आघाडीची भूमिका वठवली. तिसऱ्या जगाचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवावे आणि शीतयुध्दाची झळ त्यांना लागू नये ह्या उदात्त हेतूने भारताने जागिक राजकरणात अलिप्ततावादाच्या रूपाने नवे शस्त्र दिले. पण त्याचे स्वतःचेच धोरण सोविएत रशियाच्या बाजूने झुकल्याने सक्षिण आशियातील अन्य देशही जगात स्वतःसाठी आधार शोधू लागले. ह्यामुळे भारताचा दबदबा जगात जरी वाढला तरी शेजारची राष्ट्रे मात्र काहीशा भितियुक्त किंवा संशयित नजरेतून भारताकडे पाहू लागली. भारताच्या रक्तरंजित फाळणीमुळे मुळातच संबंध अत्यंत कलुषित झाले होते. तसेच भारत दक्षिण आशियात भौगोलिक दृष्ट्या मध्यवर्ती स्थानावर आहे. त्यामुळे प्रत्येक देशाची सीमा भारताच्या सीमेला भिडते. ज्यामुळे व्यापार सहज होतो, परंतु सीमेवरील चकमकीही वाढतात. भारताबद्दल सुरूवातीपासूनच इतर देशांच्या मनात अविश्र्वास निर्माण झाला. पुढे तीन युध्दात भारताच्या सफल कामगिरीमुळे आणि यशस्वी अणुचाचण्यांमुळे भारताबद्दलची भीती अधिकच वाढली. ह्या सर्व परिस्थितीमुळे दक्षिण आशियातील देशांमध्ये आर्थिक-सामाजिक-तांत्रिक सहकार्य शक्य असूनही केवळ राजकीय अविश्र्वास व मतभेदांमुळे सर्वच क्षेत्रात सहकार्याच्या प्रयत्नांना खीळ बसली. भारताच्या दक्षिण आशियातील मध्यवर्ती स्थानामुळे आणि एकूण सर्वांगीण प्रगतीमुळे वास्तविक अन्य देशांना फायदा होऊ शकतो, पण दुर्देवाने नुकसानच अधिक झाले आहे. ह्याला भारताप्रमाणेच अन्य देशही जबाबदार आहेत. ह्याबद्दल आधिक विश्र्लेषण करणे सुलभ व्हावे म्हणून दक्षिण आशियातील अन्य देशांबद्दल माहिती करून घेणे आवश्यक आहे.

## ४.४ पाकिस्तान

१४ आगस्ट १९४७ रोजी अखंड भारताची फाळणी होऊन स्वतंत्र झालेला पाकिस्तान दक्षिण आशियातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. फाळणी झाली तेव्हा भारताच्या पश्र्चिमेला आणि पूर्वेला असे दोन पाकिस्तानचे भाग होते आणि मध्ये हजारो मैलांचा भारत होता. १९७१ मध्ये पूर्वेकडील पाकिस्तान उठाव होऊन तो स्वतंत्र झाला आणि बांग्लादेश हा नवीन देश दक्षिण आशियात उदयाला आला. आज पाकिस्तान हा सुमारे ७ लाख ९० हजार चौरस किलोमीटर चा प्रदेश असून त्याला दक्षिणेकडे १०४६ की. मी. चा समुद्रकिनारा लाभाला आहे. पूर्वेकडे भारत, पश्र्चिमेकडे अफगानिस्तान, नैर्ऋतेकडे इराण, ईशान्येकडे चीन असे देश आहेत. पाकिस्तानमध्ये – पंजाब, सिंध, खैबर पख्तुंख्वा व बलुचिस्तान आणि वायव्येकडील केंद्रशासित प्रदेश – हे ४ प्रांत असून राजधानी इस्लामाबाद हा विशेष दर्जा असलेला प्रांत आहे. ईशान्येकडील आझाद कश्मीर हासुध्दा एक प्रेश पाकिस्तान कडे असून त्याबद्दल भाराताशी वाद सुरू आहे. स्वतंत्र पाकिस्तान हा एक धर्मनिरपेक्ष, समताधिष्ठित, आधुनिक, संघराज्य व्हावा असे पाकिस्तानचे जनक जिना ह्यांचे स्वप्न होते. परंतु त्यांच्या अकाली निधनानंतर १९५६ मध्ये संविधानात बदल करून पाकिस्तान इस्लामी राष्ट्र घोषित करण्यात आले. त्यानंतर पाकिस्तानचे राजकारण कायाम अशांत व अस्थिर राहिले. पाकिस्तानमध्ये – १९५८-१९७१, १९७७-१९८८ आणि १९९९-२००८ असे तीनदा लष्करी शासन आले आणि जेव्हाकेव्हा निवडणूकीद्वारे लोकनियुक्त शासन आले तेव्हाही लष्करचे त्यावर नियंत्रण राहिले. पाकिस्तानच्या राजकरणात लष्कर व आय. एस. आय. ह्या गुप्तहेर संगठनेचे प्रचंड वर्चस्व आहे. विशेषतः भारताच्या बाबतीत त्यांचाच शब्द अंतिम असतो.

पाकिस्तान अधिकृत इस्लामी देश असून तिथे हिंदू, ख्रिस्ती, बौध्द, ज्यू, शीख असे अल्पसंख्या धार्मिक गटही आहेत. वांशिक दृष्ट्या येथे प्रामुख्याने पंजाबी वंशाचे लोक असून (४४%) इतर पाश्तुनी, सिंधी, बलूची, सराइकी, पारशी, पठाण अशा वंशाचे लोक आढळतात. मुहाजीर म्हणून संबोधण्यात येणारा भारतातून आलेल्या मुसलमानांचा एक गट वेगळ गणण्यात येतो ज्यांना फारशी सन्माननीय वागणूक मिळत नाही. पंजाबी वंशाचे लोक पाकिस्तानच्या सर्वच क्षेत्रात वरचढ असून विशेषतः सैन्य, राजकारण व उद्योग ह्यात त्यांचे प्रभुत्व आहे. पाकिस्तानची अधिकृत भाषा उर्दू असून शासकीय, न्यायालयीन उच्च शिक्षण आणि परकीय व्यवहारासाठी इंग्रजी वापरली जाते. तसेच सुमारे ६० भाषा येथे बोलल्या जातात ज्यात पंजाबी, सिंधी, पश्तु व बलूची ह्या भाषा प्रमुख आहेत. शिक्षण क्षेत्रात पाकिस्तान मध्ये आधुनिक शिक्षण मिळते – ज्यात सर्वच विद्याशाखांमध्ये उच्चतम अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. पाकिस्तानच्या शास्त्रज्ञाला भौतिकशास्त्रात नोबेल मिळाले हे तेथील उच्चशिक्षणाचे द्योतक आहे. प्राथमिक स्तरावर मदरशाद्वारे काही प्रमाणात शिक्षण मिळते, पण आज इंग्रजी शिक्षणाकडे ओढा वाढत आहे. एकूण साक्षरतेचे प्रमाण मात्र कमीच असून पाकिस्तानची समाजव्यवस्था आजही पुरातन, धार्मिक प्रभावाखाली आणि सरंजामीवृत्तीची आहे. स्त्रियांवर अनेक पुरातन बंधने आहेत. वेठबिगारी अस्तीत्वात आहे. गरीब-श्रीमंत आणि शहरी-ग्रामीण अशी प्रचंड तफावत आहे आणि त्याशिवाय कुपोषण, दारिद्र्य, बेरोजगारी, वाढता जन्म-मृत्यू दर, वाढती महागाई अश्या समस्या येथे आहेत.

पाकिस्तानची अर्थव्यवस्था शहरी आणि ग्रामीण दोन्ही क्षेत्रावर आधारित आहे. इंडस नदीचे खोरे हे शेतीसाठी मुख्य क्षेत्र आहे. येथ गहू, तांदूळ, कापूस, ऊस ही महत्वाची पिके होतात. पाकिस्तान मध्ये जंगलेही विस्तृत असून साग, देवदार, महागनी, शिसम, अल्पाइन असे उत्तम लाकूड येथे मिळते. वस्त्रोद्योग आणि साखर कारखाने येथील जुने उद्योग असून नव्या उद्योगात सीमेंट, रसायनिक उद्योग, अन्न-प्रकिया उद्योग, लोखंड, स्टील अश्या उद्योगांची वाढ झाली आहे. बदलत्या जागतिक प्रभावामुळे इलेक्ट्रॉनिक, बांधकाम उद्योग व वीजनिर्मिती ह्यातही वाढ झाली आहे. थेट परकीय गुंतवणूक अलीकडे वाढल्यामुळे बँकिंग व्यवसायात भरभराट झाली आहे. पर्यटन हे पाकिस्तानचे उत्तम व्यवसायचे क्षेत्र आहे, पण राजकीय अस्थिरतेमुळे व वाढत्या हिंसाचारमुळे त्यावर विपरीत परिणाम झाला आहे. अलीकडच्या काळात शेतीचे क्षेत्र कमी होत असून उद्योग व सेवाक्षेत्रात वाद होत आहे. पाकिस्तानवर आजही अंतर्गत व विदेशी कर्ज आहे. पाकिस्तानचे दरडोई उत्पन्न कमी असून लोकसंख्यावाढ वेगाने होत आहे. महागाईवर आणि अन्य आर्थिक समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास सरकार अपयशी ठरले आहे. शस्त्रनिर्मिती, सैन्य व संरक्षण, अनुचाचण्या व अवकाश संशोधन यावर पाकिस्तान गरजेपेक्षा जास्त खर्च करत आहे. एकीकडे पाकिस्तानची वैज्ञानिक प्रगति दिसत असली तरी राजकीय दृष्ट्या ते एक असफल राष्ट्र आहे.

## ४.५ श्रीलंका

श्रीलंका हा बेटासारखा देश भारतीय महासागरात दक्षिणेला व बंगालच्या उपसागराच्या नैऋत्तेला स्थित असलेला भारताचा शेजारी असून मन्नारच्या आखाताने व पाक समुद्रधुनीद्वारे त्यामध्ये सीमा तयार झाली आहे. श्रीलंकेला ज्ञात असा ३००० वर्षाचा इतिहास आहे. भारत व श्रीलंकेमध्ये प्राचीन काळापासून संबंध आहेत. प्राचीन हिंदू ग्रंथात, विशेषतः रामायणात, ह्या बेटांचा उल्लेख लंका अस आढळतो आणि श्रीरामाने तेथील राजा रावणाशी युध्द करून आपली पत्नी सीता हिला बंदिवासातून मुक्त केले अशी आख्यायिका आहे. नंतरच्या काळात बौद्ध धर्माचा प्रसार या बेटांवर झाला आणि सम्राट अशोकाने महेंद्र नामक आपल्या दुताला येथे धर्मप्रचारासाठी पाठवले. दक्षिण भारतातील चोल, पंड्या, चेरा आणि पल्लव घराण्याच्या राजांनी लंकेवर आक्रमणे केली. युरोपिय वंशपैकी पोर्तुगीज, डच, ग्रीक, फ्रेंचांनी येथे आक्रमणे केली व नंतर १९ व्या शतकात इंग्रजांनी आपले राजकीय नियंत्रण प्रस्थापित केले. श्रीलंकेला चारही बाजूंनी समुद्रकिनारा असल्यामुळे त्याचे व्यापारीक, राजनैतिक व संरक्षणात्मक महत्व फार आहे. युरोप, आफ्रिका व पूर्वेकडील देशांमध्ये व्यापाराचा, खास करून सिल्क व मसाल्यांच्या पदार्थासाठी, हा एका प्रमुख मार्ग आहे. आशिया खंडावर लष्करीदृष्ट्या लक्ष ठेवण्यासाठी हे बेट अत्यंत उपयुक्त आहे. द्वितीय महायुध्दानंतर अमेरिकेने तसा प्रयत्न केला. श्रीलंकेला जंगल, पर्वत, नद्या आणि उत्तम हवामान व भरपूर पर्जन्यमान अशी नैसर्गिक देणगी लाभली आहे. येथील वातावरण वर्षभर समान राहते व मुख्यत्वे ते दमट असते. श्रीलंकेत नैसर्गिक बंदरे आहेत आणि त्यांच्या आधुनिकीकरणा मुळे जहाजबांधणी उद्योग येथे चांगला वाढला आहे. श्रीलंका चहा, कॉफी, दालचीनी व अन्य मसाल्याचे पदार्थ, रबर ह्यांच्या उत्पादनात व निर्यातीत आघाडीवर आहे. उस, कापूस, भात हे सुध्दा येथे भरपूर होते. पर्यटन हासुध्दा एक महत्वाचा परकीय चलन देणारा व्यवसाय आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे अलीकडे श्रीलंकेत संगणक, इलेक्ट्रॉनिक, दळवळणाची साधने व अन्नप्रक्रिया इत्यादि उद्योग वाढले आहेत, तसेच सेवाक्षेत्र व बँक

व्यवसायाचीही वाढ झाली आहे. आखाती देस व युरोपात गेलेल्या श्रीलंकन तरूणांकडून भरपूर परकीय चलन देशात येते.

श्रीलंकेचा समाज विविधतेने भरला आहे. येथे सिंहली वंशाचे लोक प्रमुख असून त्यानंतर भारतीय व श्रीलंकन तामिळ, मूर आणि बर्गर्स असे लोक आढळतात. भारतीय तामिळ हे ब्रिटिश काळात भारतातून चह-मळ्यात काम करण्यासाठी आणले गेलेले मजूर आहेत. श्रीलंकेची ७०% जनता बौध्द आहे. ख्रिस्ती व मुस्लिम अनुक्रमे ७% व ९% आहेत. हिंदू १२% असून हे सर्वच तामिळ आहेत. श्रीलंकेत सिंहली व तामिळ ह्या प्रमुख भाषा असून इंग्रजी ही व्यवहाराची भाषा आहे. तसेच काही प्रमाणात पौर्तुगीज व मलय भाषांच्या जवळची बोली भाषा येथे बोलली जाते. ह्या संमिश्र समाजामुळे येथील संस्कृतीही संमिश्र झाली आहे. धार्मिक सण, खान-पानाच्या सवयी, कौटुंबिक परंपरा इत्यादींमध्ये हिंदू, बौध्द, ख्रिस्ती, पोर्तुगीज संस्कृतीची वैशिष्टे आढळतात. श्रीलंकेला लोककला, संगीत-वादन, नृत्य-नाट्य, साहित्य, चित्रकला, वास्तुकला ह्यांचीसुध्दा जुनी व सशक्त परंपरा लाभली आहे.

श्रीलंकेत प्राचीन व मध्ययुगीन काळात अनेक राजांची राज्ये होती. त्यांचा प्रामुख्याने दक्षिण भारतातील  राजवटींशी राजनैतिक, आर्थिक व कौटुंबिक संबंध होता. श्रीलंकेचा १५०५ नंतरचा इतिहास हा परकीय आक्रमणाचा इतिहास आहे. प्रथम पोर्तुगीज व नंतर डचांनी श्रीलंकेच्या काही भागात आपले वर्चस्व स्थापित केले. १९ व्या शतकात भारतात ब्रिटीशांनी आपले पाय घट्ट रोवले होते. युरोपात फ्रेंच व डच ह्यांच्यातील युध्दात फ्रेंच जिंकल्यास श्रीलंकेच्या त्यांच्ये राज्य येईल ह्या भीतीने ब्रिटीशांनी १७९६ मध्ये भारतातून श्रीलंकेच्या उत्तर किनाऱ्यावर नियंत्रण मिळवले. शेवटी १८१८ मध्ये कॅंडीच्या शेवटच्या राजाला हरवून ब्रिटीशांनी श्रीलंकेवर पूर्ण सत्ता प्राप्त केली. ब्रिटीश सरकारने श्रीलंकेत अनेक राजकीय, सामाजिक व आर्थिक सुधाणा केल्या ज्यामुळे श्रीलंका एक आधुनिक, प्रगतिशील देश म्हणून विकसित झाला. ह्याच वेळेस भारतातील स्वातंत्र्य चळवळीतून प्रेरणा घेऊन श्रीलंकेतही ब्रिटिश राजवटीविरूध्द सिलोन नॅशनल कॅग्रेस च्या द्वारे आंदोलन सुरू झाले आणि १९४८ मध्ये श्रीलंकेला स्वातंत्र्य मिळाले.

श्रीलंका एक विकसनशील देश म्हणून गणला जातो. सुरवातीला तेथे डोगमोर संविधान, नंतर सोलबरी संविधान असे प्रयोग झाले. १९७२ मध्ये व्यापक संविधान-सुधारणा होऊन श्रीलंका एक लोकशाही गणराज्य झाले. ह्या गणराज्यात संघीय व एकात्म शासन पध्दतीचे मिश्रण आढळते. राष्ट्राध्यक्ष हे देशाचे व शासनाचे प्रमुख असून ते सैन्याचे सरसेनापती आहेत. ते संसदेला जबाबदार असतात आणि संसदेतील सदस्यांतून आपले मंत्रिमंडळ बनवतात. १९८७ च्या संविधान्न दुरूस्तीनंतर प्रथमच श्रीलंकेत विक्रेंद्रीकरण करण्यात येऊन नऊ प्रांत व २५ जिल्ह्यांची रचना करण्यात आली. नऊ प्रांतात प्रोव्हिंशियल कौन्सिल स्थापून निर्वाचित शासनाची तरतूद करण्यात आली. २५ जिल्ह्यांचे प्रशासन हे प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांद्वारे पहिले जाते. तसेच तेथे लोकसंख्येनुसार मुनिसिपल कीन्सिल, नगरसभा आणि प्रदेशसभा आहेत. श्रीलंकेचे लष्कर हे तटस्थ असून संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेत त्यांचनी योगदान दिले आहे.

श्रीलंकेचा साक्षरतेचा दर ९२.५% हा विकसनशील देशात अत्यंत वरचा आहे. जन्मदर हजारी १७.६ आणि मृत्युदर हजारी ६.२ आहे. श्रीलंकेचे दरडोई उत्पन्न २००५ मध्ये दुप्पट

झाले आणि त्याच काळात दरीद्र्याचे आणि बरोजगारीचे प्रमाण निम्म्यावर आले. आरोग्यसेवा, पिण्याचे पाणी, बँकिंग, सेवा, संगणकीकरण, दूरसंचार, वाहतूक ह्या क्षत्रात उत्तम प्रगति केली आहे.

स्वातंत्र्यानंतर श्रीलंकेला सर्वात गहन आणि दीर्घकाळ एका समस्येने त्रासले – ती म्हणजे तामिळ-सिंहली संघर्ष आणि त्यातून फोफावलेला तामिळ दहशतवाद. ब्रिटिश काळापर्यन्त तामिळ-सिंहली संबंध सौहार्दाचे होते. पण कोलंबोची जागा कोणासाठी असावी ह्यावरून नाराजी सूरू झाली. तामिळ नेत्यांनी ५०% आरक्षणाची मागणी केली, ती मान्य झाली नाही. स्वातंत्र्यनंतर १९५६ मध्ये सरकारने सिंहली भाषेला अधिकृत भाषा घोषित केले त्यावरून तामिळांना आपल्या अस्तित्वाला धोका असल्याचे जाणवले आणि त्यांनी शांततामय मार्गाने संघर्ष सुरू केला. परंतु ही तेढ वाढत गेली आणि तमिळांनी तमिळबहुल प्रदेशाचे वेगळे राज्य (ईलम) मागितले. ८० च्या दशकात तामिळ वाघांच्या (एल.टी.टी.ई.) संघटनेद्वारे सशस्त्र संघर्ष सुरू झाला. हजारो तामिळ मारले गेले आणि लाखो निर्वासित झाले. १९८५ ते २००५ ह्या दरम्यान श्रीलंका सरकार व तामिळ वाघांच्या दरम्यान चर्चेच्या अनेक बैठका झाल्या पण सर्व असफल ठरल्या. १९८७ मध्ये भारताच्या पुढाकाराने तेथे शांतिसेना पाठवण्यात आली. भारत श्रीलंकेच्या संविधांनांतर्गतच तमिळांना योग्य न्याय देण्याच्या बाजूने होता. एलटीटीई ची वेगळ्या राज्याची मागणी भारताला पसंत नव्हती. शांतीसेनेचा प्रयोग मात्र फासला आणि भारताविरूध्द असंतोष वाढला. भारताच्या तामिळनाडूमध्ये ह्याबद्दल फारच तीव्र भावना असतात. त्यामुळे भारत सरकारची कोंडी होते. श्रीलंका सरकार मात्र नोर्वे च्या मध्यस्थीने तमिळांशी वाटाघाटी करत होता, पण त्यातही यश आले नाही. शेवटी २६ वर्षे चाललेल्या ह्या संघर्षाचा अंत श्रीलंका सरकारने २००९ मध्ये जोरदार, व्यापक सैनिकी कारवाईदवारे केला. ह्या यशस्वी कारवाईमुळे श्रीलंकेत शांतता प्रस्थापित झाली असली तरी जागतिक स्तरावर मात्र श्रीलंकन लष्कराने अत्याचार करून मानवधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप होत आहे व युनोच्या तशा चौकशीला तोंड द्यावे गालत आहे. ह्या सर्व संघर्षाच्या काळात भारतातील तमिळांच्या मनात श्रीलंकन तमिळांबद्दल असलेल्या भावनिक पाठिंब्यामुळे भारताला सतत तारवरची कसरत करावी लागली. ह्या कळीच्या व गहन प्रश्नशिवाय काही अन्य प्रश्न होते – जसे, भारतीय मासेमाऱ्यांना सतत अटक करणे, त्रिंकोमाली बेटावर अमेरिकेला लष्करी तळासाठी परवानगी देणे, ईत्यादि. परंतु तणावातही दोन देशांतले संबंध चांगले राहिले.

## ४.६ बांग्लादेश

बांग्लादेशची निर्मिती १९७१ मध्ये भारताच्या सक्रिय पाठिंब्यामुळे झाली. त्यापर्वी तो पाकिस्तानचा भाग होता आणि त्याही पूर्वी, म्हणजे १९४७ पर्यन्त, अखंड भारताचा भाग होता. बांग्लादेशचा इतिहास भारतीय राजघराण्यांचा इतिहास आहे. येथे मौर्य वंश, मग्ध घराणे, सेना घराणे अशांची राजवट होती. बौध्द काळात पाल घराणे येथे सत्तेवर होते. त्यानंतर मुघल काळात खिलजी घराणे व बंगालच्या नबाबांचे येथे राज्य होते. ब्रिटिस काळात हा भाग बंगाल प्रांताचा हिस्सा होता आणि १९०५ व १९११ अश्या दोनदा बंगालचे तुकडे करण्याचे प्रयन्त हाणून पडण्यात आले. १९४७ ते १९७१ हा काळ पश्चिम पाकिस्तानच्या दडपशाहीचा होता. भूगोलाने वेगळे केलेले पूर्व व पश्चिम पाकिस्तान भाषा, संस्कृती, इतिहास ह्या आधारावर मनानेही कधीच एकसंघ व एकरूप झाले नाहीत आणि शेवटी ते वेगळे झाले.

बांग्लादेशचा भूगोल हा गंगा, ब्रम्हपुत्र व मेघाना ह्या मोठ्या नद्यांच्या त्रिभुज प्रदेशचा आणि समुद्रासपाटीपासून फार खालच्या भागात आहे. येथील जमीन व मातीचा पोत नद्यांमुळे शेतीसाठी फारच पोषक झाला आहे. परंतु हा भाग समुद्रसपाटीपासून खाली असल्याने येथे दरवर्षी पुर, वादळे व अन्य नैसर्गिक संकटे येतात, तसेच हा भाग भूकंपप्रवणसुध्दा आहे.

बांग्लादेशच्या सुपीक मातीमुळे आणि दमट, समशीतोष्ण हवामानामुळे येथे तांदूळ, बटाटा, ज्युट, चहा, आणि काही उत्तम फळांचे उत्पादन होते. मासेमारी व त्याच्या निर्यातही बांग्लादेश आघाडीवर आहे. वस्त्रोद्योग व तयार कपड्यांचे उद्योग येथे प्रमुख असून त्याद्वारे देशात सर्वात जास्त परकीय चलन येते. अलीकडे उत्तम बंदरांचा विकास होऊन जहाजबांधणी उद्योगही चांगला वाढला आहे. काही पुरातन, ऐतिहासिक वास्तूंमुळे आणि सुंदरबन सारख्या जगातील एकमेव अशा तीन नद्यांच्या संगमावरील त्रिभुज प्रदेशात नैसर्गिकरित्या तयार झालेल्या पाणथळीच्या जंगलामुळे पर्यटन व्यवसायालही येथे वाव आहे. बांग्लादेशची जनता द्राविडी, इंडो-आर्यन, तिबेटी-बर्मी अशा संमिश्र वंशाची आहे. येथील संस्कृती बंगाली संस्कृती म्हणून ओळखली  जाते. त्यात वेशभूषा, सण-वार, खान-पान सवयी, संगीत-वादन, वस्तूशिल्पकला, चित्रकाला इत्यादि घटकांचा समावेश होतो, ज्यावर हिंदू संस्कृतीची छाप आढळते. मुख्यतः येथे ८९% मुसलमान असून त्यातील बहुतांश इस्लामच्या सुफीपंथाचे पालन करतात. तसेच येथे हिंदू, बौध्द व ख्रिस्ती धर्माचे लोकही आहेत. ९८% जनता बंगाली भाषा बोलते आणि इंग्रजीसुध्दा संपर्क भाषा म्हणून वापरली जाते. बंगाली भाषा संस्कृतोद्धव, प्राचीन व अत्यंत समृद्ध भाषा असून मध्ययुगीन काळापासून २०व्या शतकापर्यंत उत्कृष्ट साहित्यनिर्मिती ह्या भाषते झाली आहे. जनतेला बंगाली भाषा आणि बंगाली संस्कृती ह्याचा प्रचंड अभिमान आहे.

निर्मितीच्या वेळेस बांगलादेशची आर्थिक स्थिति फारच नाजुक होती. पण हळूहळू ती सुधारली. बांग्लादेश लोकसंख्येच्या बाबतीत जगात ८व्या क्रमांकावर आणि लोकसंख्या-घनतेच्या बाबतीत जगात ११व्या क्रमांकावर येतो. बांग्लादेश प्रथम प्रचंड वेदेशी कर्जत बूडाला होता, पण २०१० पर्यन्त हे प्रमाण २% वर आले. मृत्युदर, जीवनमान, आरोग्यसेवा, शैक्षणिक स्तर, साक्षरता, कुपोषण ह्याबाबतीत बांग्लादेश अजूनही फार मागे आहे. बांग्लादेशला विस्तृत आणि उत्तम समुद्रकिनारा लाभल्याने तेथे उत्तम बंदरे आणि समुद्री-वाहतुकीचे मार्ग आहेत, ज्यामुळे व्यापारात फायदा होतो. अलीकडे देशात रस्ते, रेल्वे, पूल, विमानतळ, मॉल्स बांधण्यात आले आहेत. नोबेल पुरस्कार प्राप्त महमद युनूस ह्यांच्या लघु-कर्ज योजनेमुळे बांगलादेशात दरिद्र्यचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. बँकिंग, विमा, संगणक, सांदेशवहन, अशा क्षेत्रात चांगली वाढ झाली आहे. वीजनिर्मिती मात्र मागे पडली असून त्याचा विपरीत परिणाम उद्योगांवर पडतो. शेती ही निसर्गावर अवलंबून असून नैसर्गिक आपत्तिंमुळे फार नुकसान होते. त्यावर मात करण्यासाठी डच सहाय्याने बंधारे व कालवे बांधणे आणि आपतीग्रस्त जनतेसाठी नवीन व सुरक्षित वसतिस्थान निर्माण करणे असे उपाय योजले आहेत. पण ह्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर फारच मोठा बोजा पडतो. काही काळ राजकीय अस्थिरतेमुळेसुद्धा देशाचे नुकसान झाले परंतु २००५ मध्ये अर्थतज्ञ गोल्डमन सैक्सने बांग्लादेशचा समावेश एन-११ ह्या जगातील अकरा देशांत केला जे २१व्या शतकात खूप वेगात आर्थिक प्रगति करू शकतात.

बांग्लादेशमध्ये एकात्म संसदीय शासनव्यवस्था असून एक-सदनीय लोकनिर्वाचित संसद सर्वोच्च कायदेमंडळ आहे. पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ  हे देशाचे वास्तविक शासक असून राष्ट्रध्यक्ष हे देशाचे नाममात्र प्रमुख आहेत. बांग्लादेशचे कायदे मुख्यतः ब्रिटिश कायद्यांवर

आधारित असले तरी काही बाबतीत धार्मिक कायद्यांनुसार न्याय दिला जातो. बांग्लादेशच्या लष्कराने दोनदा उठाव करून सत्ता ताब्यात घेतली असली तरी नजीकच्या काळात त्याने तटस्थ भूमिका घेतली आहे. लष्कराला आपत्तिव्यवस्थापनाचे फार मोठे काम करावे लागते, तसेच युनोच्या शांतिसेनेमध्ये बांग्लादेशचे जवान सर्वात जास्त संख्येने सहभागी होतात. बांग्लादेशचे सात प्रशासकीय भाग केले असून, त्यांचेही ६४ जिल्हे आहेत. ह्यांचा कारभार प्रशासकीय अधिकाऱ्यांद्वारे पहिला जातो. मोठ्या शहरांमध्ये महापालिका आणि अन्य भागात वॉडर्स आहेत, ज्यांच्या ५ वर्षांनी निवडणुका होतात.

भारत व बांग्लादेश ह्यांच्यात सुरवातीला अत्यंत चांगले संबंध होते, परंतु लष्करी राजवट आणि इस्लामी कट्टरवाद्यांच्या दडपणामुळे हळूहळू भारत विरोध वाढला. दोन देशात प्रमुख वाद – तिस्ता नदीचे पाणिवाटप, सीमेवर कुंपणाची उभारणी, फराक्का धरण, सीमेवरील घुसखोरी, भारताच्या अतिपूर्वेकडील राज्यात जाण्यासाठी बांग्लादेशातून मार्ग (चिकन कॉरीडॉर) आणि बंगालच्या उपसागरातील बेटांवर हक्क – हे आहेत. त्याबद्दल वाटाघाटी सुरू आहेत. ह्या वादांच्या भोवऱ्यातही दोन्ही देशात अनेक क्षेत्रात सहकार्यहोत आहे.

## ४.७ नेपाळ

नेपाळ हा भारताच्या उत्तरेला हिमालयाच्या पर्वतराजीमध्ये वसलेला देश आहे. त्याच्या उत्तरेला चीन आहे. चारही बाजूंनी जमीनीने वेढल्याने व्यापारासाठी त्याला शेजारच्या देशांवर अवलंबून राहावे लागते. नेपाळच्या उल्लेख प्राचीन हिंदू ग्रंथात आढळतो ज्यावरून नेपाळचा उगम एका ने नामक मुनीद्वाचे हजारो वर्षापूर्वी झाला असा इतिहास आहे. येथे नंतर गोपाल, महिशपाल, किरात अशा टोळ्या होत्या, त्या काही भागात राज्य करीत. तिबेटी-बर्मी वंशाचे लोकही पुरातन काळापासून येथे राहत होते. ख्रि. पू. ५०० च्या सुमारास येथे प्रथम शाक्य आणि नंतर मौर्य, गुप्त आणि लिछचवी अशा वंशाचे राजे सत्तेवर होते. मध्ययुगीन काळात ठाकुर व मल्ल घराण्यांचे राज्य होते. शेवटी १८व्या शतकात शाह घराण्याने विस्तृत प्रदेश काबिज करून खऱ्या अर्थाने आधुनिक नेपाळी राजेशाही रूजवली. १८१६ मध्ये ब्रिटीशांशी झालेल्या युध्दात काही प्रदेश त्यांना देण्यात आला. त्यानंतर शाह कुटुंबात अंतर्गत दुहीमुळे राणा वंशाच्या सेनापतीने सत्ता काबिज केली. हे शासक ब्रिटिश समर्थक होते आणि त्यांनी स्वतःला नाममात्र शासक करून ब्रिटिशांचे अंकित होण्यात धन्यता मानली. परंतु राणा शासकांच्या कारभारावर जनता नाराज होती. शेजारच्या भारताप्रमाणे येथेही नेपाळी कॉंग्रेसच्या नेतृत्वात लोकशाही प्रस्थापनासाठी आंदोलन सुरू झाले. १९५१ मध्ये राजे त्रिभुवन हे भारताच्या मदतीने राजे झाले आणि नेपाळी कँग्रेसच्या नेत्यांचे सरकार स्थापन झाले. १९५९ मध्ये 'पक्ष-विरहित पंचायत' नामक शासनाचा प्रयोग सुरू झाला. परंतु १९८९ मध्ये जन-आंदोलनामुळे तो बंद झाला आणि व्यापक संविधान दुरूस्त्या करून संसदीय शासन अस्तित्वात आले. ह्याच काळात नेपाळी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात राजेशाही विरूध्द आंदोलन तीव्र होत होते. २००१ मध्ये दुर्देवी आणि रहस्यमय घटनेत शाही महालात युवराजाने राजा, राणी व इतर सात जणांची हत्या केली. नंतर आलेल्या राजाला जनसमर्थन नव्हते. परंतु त्यांनी २००५ मध्ये सर्व अधिकार स्वतःकडे घेतले त्यामुळे जनक्षोभ अधिकच वाढत गेला. शेवटी २००६ मध्ये पुनरूज्जीवित संसदेने ठराव करून नेपाळला एक धर्मनिरपेक्ष, सांघिय, गणराज्य घोषित केले आणि २००८ मध्ये राजाला राजमहाल सोडण्यास भाग पाडून जगातील एकमेव हिंदू राज्य संपुष्टात आले. ह्य सर्व आधुनिक

इतिहासात नेपाळमध्ये कमालीची राजकीय अस्थिरता होती. कोणत्याच एका पक्षाला बहुमत नव्हते. परंतु २००८ मध्ये नेपाळी कम्युनिस्ट पक्षाने सर्वाधिक जागा जिंकून गठबंधन सरकार स्थापन केले.

ह्या सर्व अंधाधुदीच्या काळात भारताने नेपाळला मदत करायचा प्रयन्त केला, परंतु त्याच्यापेक्षा जास्त प्रभाव चीनचा राहिला. नेपाळी साम्यवादी पक्षांमुळे आणि चीनने प्रचंड आर्थिक मदत केल्याने हे शक्य झाले. वास्तविक सुरवातीपासूनच नेपाळी जनतेत भारताबद्दल नाराजी होतीच, ती अलीकडच्या काळात वाढली. असे असले तरी दोन्ही देशातील करारांचे पालन व्यवस्थित सुरू होते. संस्कृतिक दृष्ट्या भारत व नेपाळ ह्यांच्यात फार पुरातन व घनिष्ठ संबंध आहेत. नेपाळचे राजघराणे भारतातील राजपूत घराण्यांशी विवाहसंबंधने जोडले आहेत. नेपाळमधील पशुपतिनाथ हे शिवमंदिर हिंदुंचे श्रध्दास्थान आहे, तर भारतातील पुरातन देवस्थाने नेपाळच्या हिंदुसाठी श्रध्येय आहेत. नेपाळचे सण, परंपरा, चालीरीती, धार्मिक विधी, संगीत, वादन लोकगीते ह्यावर हिंदू संस्कृतीचाच प्रभाव आहे. वेशभूषा, खानपान पध्दती, पदार्थाचे प्रकार, काही क्रीडा प्रकार हे भारतीय प्रकारांशी मिळते-जुळते आहेत.

नेपाळचा राजकीय प्रवास अत्यंत चढ-उताराचा आहे. राजेशाही ते संसदीय राजेशाही ते पक्ष-विरहित पंचायत आणि शेवटी सांघीय गणराज्य – असा त्याचा प्रवास आहे. आज नेपाळमध्ये नवीन संविधान तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे, परंतु त्यात अनेक मतभेदांमुळे वेळ लागत आहे. सध्याच्या अंतरिम सरकारमध्ये अंतरिम राष्ट्रध्यक्ष, संसद व त्यातून निवडलेले पंतप्रधान व मंत्रीपरिषद आणि न्यायपालिका अशी रचना आहे. ६०१ सदस्यांची संसद नवे संविधान तयार करण्याचेसुध्दा काम करत आहे. नेपाळ मध्ये प्रशासकीय सोयीकरिता १४ झोन व ७५ जिल्हे आहेत. त्यांचा कारभार प्रशासकीय अधिकारी पाहतात.

नेपाळमध्ये भारतीय-तिबेटी, बर्मीज आणि काही प्रमाणात चीनी वंशाचे लोक आहेत. भारतीय वंशाचे लोक हे उत्तर भारतातून आले आणि आज त्यांनी नेपाळच्या सर्वच क्षेत्रात वर्चस्व प्राप्त केले आहे. गोरखा नामक वंशाचे लोक हे लढवय्ये, प्रामाणिक व मेहनती म्हणून प्रसिध्द असून भारतात ब्रिटिश काळापासूनच सैन्यात खास गोरखा रेजीमेंट निर्माण करून त्यांना सेवेत घेण्यात येत असे, जी रेजीमेंट आजही अस्तीत्वात आहे. देवनागरी लिपीत लिहिली जाणारी आणि संस्कृतोद्वव अशी नेपाळी भाषा येथे प्रामुख्याने बोलली जाते. शिवाय भोजपुरी, मैथिली, थारू, तामांग, मगर, दोतेली अशा भाषाही येथे बोलल्या जातात. ८१ज्ञ हिंदू असून बौध्द, ख्रिश्चन, मुस्लिम, मंधुम अश्या धर्माचेही लोक येथे आहेत. बौध्द धर्माचा संस्थापक सिध्दार्थ गौतम ह्याचे जन्मस्थान नेपाळच्या तराई प्रदेशातील कपिलवस्तू जिल्ह्यातील लुंबिनी येथे आहे. ही जागा युनेस्को द्वारे जागतिक ऐतिहासिक वास्तु म्हणून संरक्षित आहे.

नेपाळ जगातील अति-मागास देशांपैकी एक आहे. येथील मुख्य व्यवसाय शेती असून हिमालयाच्या बर्फाच्छादीत प्रदेशात ती शक्य नसल्याने दमट व काहीश्या उष्ण हवामानाच्या भारताच्या सीमेजवळील तराई प्रदेशतच शेती होते. प्राद्बयाने चहा, तांदूळ, मका, उस, तंबाखू, ज्युट ही पिके होतात. तसेच दूध व दुग्धजन्य पदार्थाचेही उत्पादन होते. नेपाळच्या नैसर्गिक सौर्द्यामुळे आणि धार्मिक स्थाळांमुळे पर्यटन हा फार मोठा व्यवसाय आहे. पण राजकीय अस्थिरतेमुळे हा उद्योग मंदावला आहे. तयार लोकरी कपडे, चामड्याच्या वस्तु, स्थानिक कलाकुसरीच्या वस्तु व दागिने अशा वस्तु निर्यात केल्या जातात. पाणी ही एकमेव मुबलक

नैसर्गिक संपत्ती आणि नद्या व पर्वत रांगांची अनुकूल स्थिति असल्याने येथे वीजनिर्मितीला भरपूर वाव असूनही त्याकडे  दुर्लक्ष झाले. ज्युट, लोकर, साखरनिर्मिती अश्या उद्योगांव्यातिरिक्त अन्य उद्योग फारसे वाढले नाहीत. सामुदायिक जंगल व्यवस्थापनातून काही पारंपरिक उपजीविकेची साधने संवर्धित करण्याचे प्रयन्त अलीकडे झाले आहेत.

नेपाळमध्ये निरक्षरतेचे प्रमाण, जन्म-मृत्यू दर, बाल-मृत्यू दर हे फार जास्त आहे. आरोग्यसेवा अत्यंत असमाधानकारक असून जूने व छोटे मलेरिया, डायरिया, गलगंड, कुष्ठरोग, क्षयरोग, पोलिओ असे रोग येथे आढळतात. एच.आय.व्ही. चे प्रमाणही येथे गंभीर आहे. महागाई, कुपोषण, बेरोजगारी, दारिद्र्य ह्याचेही प्रमाण जास्त आहे. मादक द्रव्यांचे सेवन, बाल-गुन्हेगारी आणि वेश्याव्यवसाय येथे फारच वाढला आहे व त्यामुळेच एच.आय.व्ही. व अन्य लैंगिक रोग येथे जास्त आढळतात. हिमालयातून गंगा, ब्रम्हपुत्र व इंडस ह्या नद्या उगम पावतात, त्यामुळे पुर येतो. तसेच हिमालयाची घसरण होत असल्याने भुस्खलनाची गंभीर समस्याही नेपाळला भेडसावते आहे. नेपाळचा सर्वाधिक खर्च पेट्रोलजन्य पदार्थाच्या आयातीवर होतो. अलीकडे विदेशात गेलेल्या नेपाळी नागरीकांकडून बऱ्यापैकी विदेशी चलन नेपाळला मिळते आहे. नेपाळची प्रगति होण्यासाठी तेथे प्रथम संविधान तयार होऊन राजकीय शांतता प्रस्थापित झाली पाहिजे. तसेच खंबीर नेतृत्व सत्तेवर आले पाहिजे.

## ४.८ अफगाणिस्तान

अफगाणिस्तान हा सार्क मध्ये नंतर सामील झालेला आठवा देश आहे. दक्षिण आशियाबरोबरच तो पश्चिम व मध्य आशियाचाही भाग म्हणून गणला जातो. अफगाणिस्तानला समुद्रकिनारा नसून त्यांच्या दक्षिण व पूर्वेकडे पाकिस्तान, पश्चिमेकडे इराण, उत्तरेकडे तुर्कमेंनिस्तान, उझ्बेकिस्तान व ताजिकिस्तान आणि ईशान्येकडे चीन वसले आहेत. अफगाणिस्तान हा अत्यंत विरोधी हवामानाचा देश असून उत्तरेकडे $-15^{0}$ पर्यन्त थंडी तर पूर्व व दक्षिणेकडे $35^{0}$ पर्यन्त उष्णता वाढते. येथे हिंदुकुश, आमीर अश्या पर्वतरांगा आणि आमु सारख्या नद्या व तलाव आहेत. तरीही. तरीही अफगाणिस्तान शुष्क प्रदेश आहे. हिंदुकुशचा भाग भूकंप-प्रवण प्रदेश आहे. अफगाणिस्तान हा प्राचीन जमिनी व्यापाराचा आणि जनतेच्या स्थलांतराचा प्रमुख मार्ग होता. तसेच ह्या प्रदेशाने अनेक आक्रमणे व लढाया अनुभवल्या आणि अनेक घराणी व राजांच्या सत्ता भोगल्या. त्यामध्ये ग्रीक, कुशाण, मौर्य, कबुलशहा, सफरीद, गझनवी, घोरी, तीमुर, मुघल, दुर्राणी इत्यादि घरण्यांचा समावेश आहे. इतिहासाच्या वेगवेगळ्या कालखंडात अफगाणिस्तान मेसोडोनीया, मौर्य आणि मुघल अश्या साम्राज्याचा भाग होता. इस्लामी सुवर्णयुग म्हणून ओळखले जाणाऱ्या ११ व्या शतकात अफगाणिस्तानमध्ये महम्मद गझनीचे राज्य होते आणि तो इस्लामी जगताच्या केंद्रास्थानी होता. भारतातील मुघल साम्राज्याच्या काळात येथे बाबर आणि लोधी साम्राज्याचा भाग होता. १७व्या शतकात होतकी घराण्यातील मीर वाईज होतक याने पर्शियाच्या जोखडातून अफगाणिस्तानला मुक्त केले आणि आधुनिक अफगाणिस्तानची उभारणी केली. १८व्या शतकात नादीर शाह ने साम्राज्य पूर्वेकडे दिल्ली पर्यन्त वाढवले. १७६१ मध्ये अहमद शाह अब्दालीने पानीपतच्या युध्दात मराठ्यांचा पराभव केला. भारतात ब्रिटिश राजवट आल्यावर त्यांचे अफगाणिस्तानवर पूर्ण नियंत्रण प्रस्थापित करण्याचे प्रयन्त फारसे यशस्वी झाले नाहीत. परंतु त्याचे राजनैतिक संबंध ब्रिटीशांच्या मार्फत होऊ लागले. त्यांनंतर वेगवेगळे सत्ताधारी तेथे आले, ज्यांनी

अफगाणिस्तानचे स्वातंत्र्य व विशिष्ठ ओळख कायम ठेवत राज्य केले. ब्रिटिशांनी अफगाणिस्तानच्या सीमारेषा निर्धारित केल्या, जसे डुरँड रेषा, जी अजूनही अफगाणिस्तान-पाकिस्तान मध्ये कायम आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर अफगाणिस्तान शीतयुध्दाच्या राजकरणात सापडून अमेरिका व सोविएत रशिया ह्यांच्या चढाओढीत अडकला. अफगाणिस्तानचे व्यापारी, सामिरक व राजनैतिक महत्व ओळखून दोन्ही देशांनी हरप्रकारची मदत अफगाणिस्तानला दिली. १९७३ मध्ये राजे झहीर शहाविरूध्द बंड करून दाऊद खानने सत्ता काबिज केली. १९७८ मध्ये साम्यवादी पी.डी.पी.ए. पक्षाने उठाव केला आणि सत्ता बळकावली. परंतु त्या पक्षातही अंतर्गत मतभेदांमुळे नवे नेते सत्तेवर येत गेले. १९७९ मध्ये सोविएत रशियाने अफगाणिस्तानात थेट सैन्य घुसवून आपले अंकित सरकार स्थापन केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने मुजाहिदीन व पाकिस्तानात आश्रयाला आलेले अफगाण निर्वासितांना भरपूर मदत देणे सुरू केले. ह्यामुळे अफगाणिस्तानात साम्यवादी नेते आणि कट्टर इस्लामी विचारांचे समर्थक 'तालिबान' ह्यांच्यात यादवी सुरू झाली. दोन्ही गटांकडे शस्त्रसाठा असल्याने नागरी युध्दात प्रचंड हानी झाली. त्याचप्रमाणे ह्या युध्दाला ताझ्जिक, उझ्बेकी, हाझरा असा वांशिक आणि शिया-सुन्नी असा धार्मिक रंगसुध्दा चढला. त्यामुळे गुंतागुंत अधिकच वाढली. रशियाने सैन्य मागे घेतल्यावर अफगाणिस्तानच्या पुनर्बांधणीसाठी प्रयत्न सुरू झाले. २००१ मध्ये नाटो-प्रणीत सैन्याने तालीबानी तळांवर हल्ले केले आणि त्यांना पलायन करण्यास भाग पाडले. काही महत्वाची ठाणी ताब्यात आल्यावर युनोच्या पुढाकाराने International Security Assistance Force स्थापून अफगाणिस्तानच्या सुरक्षेसाठी व पुनर्बांधणीसाठी प्रयत्न सुरू झाले आणि त्यादृष्टीने पहिले पाऊल म्हणून हमीद करझाई हे पुरोगामी, सुधारणावादी नेते तालीबानी शासनाला उलथून अध्यक्ष झाले. मध्यंतरी तालीबानी गटाचा वैचारिक व राजकीय सर्वेसर्वा नेता ओसामा बिन लादेन ह्याने अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला करवून अमेरिकरलाच नव्हे तर साऱ्या जगाला हादरवले आणि जगातील दहशतवादाचा चेहरा व मुख्य सुत्रधार म्हणून ओसामा गणला गेला. त्याचाही खातमा अमेरिकेने शिताफीने पाकिस्तानमधील त्याचे गुप्त ठोकाण जलालाबादवर हल्ला करून बदला घेतला. आजही अफगाणिस्तानमधील परिस्थिति पुर्णपणे निवळली नाही. अजूनही तेथे कट्टरवादी हल्ले होतातच आणि पाक-अफगाण सीमेवरही संघर्ष सुरूच असून रालीबानी कट्टर नेते व विचार पुर्णपणे नष्ट झालेले नाहीत. नाटो सैनीक २०१४ पर्यन्त माघारी जाणार आहे आणि अफगाणिस्तान मध्ये नव्या संविधानांतर्गत निवडणुका होणार आहेत. त्यानंतर तेथे काय परिस्थिति राहील हे सांगणे कठीण आहे.

अफगाणिस्तानमध्ये ९९% इस्लामचे अनुयायी असून त्यातील ८५% सुन्नी आहेत. अन्य पारसी, ख्रिस्ती, बौध्द, हिंदु आणि शीख असून एक नुरीस्तानी किंवा काफिरी म्हणून प्राचीन जादूटोणा व तत्सम प्रथा पाळणारी जमातही येथे आहे. बहुतांश जनता अफगाणी, ग्रीको-इराणी, तुर्की वंसाची आहे. पुश्तु व दरी ( पर्शियन ) ह्या दोन प्रमुख भाषा असून अन्य ३० पेक्षा जास्त भाषा येथे बोलल्या जातात. पर्शियन ही उच्चभ्रू व सभ्य भाषा समजली जाते आणि तीच शासकीय कामकाजात व दैनंदिन व्यवहारात वापरली जाते. येथील संस्कृती फार प्राचीन असून त्यावर ग्रीक, इराणी, हिंदू व बौध्द संस्कृतीचा प्रभाव दिसतो. कठीण भौगोलिक स्थितीमुळे येथील जमाती अजूनही अनेक छोट्या टोळ्यांमध्ये राहतात आणि त्यामुळे त्यांचे समाज-जीवन खडतर, भटक्या स्वरूपाचे व साधे बनले आहे. तसेच त्यांचा स्वभाव अत्यंत आक्रमक व लढाऊ बनला आहे. अफगान लोकंना आपला इतिहास, संस्कृती, परंपरा ह्यांचा प्रचंड अभिमान असून त्यासाठी किंवा कोणतीही समस्या सोडण्यासाठी ते एकदम आक्रमक होतात. अफगाणिस्तान प्राचीन काळात हिंदू व बौध्द संस्कृतीचे प्रमुख केंद्र होते हे अनेक मंदिरे, स्तूप, मूर्त्या, शिलालेख,

ह्यातून सिध्द होते. अलेक्झांडर च्या काळातील आणि नंतर येथे प्रसारित झालेल्या इस्लामी संस्कृतीचीही वैशिष्ठे येते आढळतात. त्यामुळे येथे पर्यटनासाठी भरपूर वाव आहे, पण राजकीय अस्थिरतेमुळे ते विकसित होऊ शकले नाही. तसेच येथे अन्य उद्योगही फारसे विकसित झाले नाही. मात्र पारंपरिक गालिचे आणि सतरंज्या विणण्याचे उद्योग येथे आहेत ज्यांच्या निर्यातीतून परकीय चलन मिळते. दुसरा जुना व्यवसाय म्हणजे अफुची शेती ज्यावर लाखो लोक अवलंबून आहेत. अफगाणिस्तान हा जगात अफूच्या चोरट्या व्यापारासाठी प्रसिध्द आहे. ह्याचा परिणाम मादक द्रव्यांच्या व्यसनाधीनतंवर होतोच शिवाय शस्त्रांचा चोरटा व्यापार करून दहशतवादाला मदत करणेसुध्दा शक्य होते. ह्यामुळे हा प्रश्न अधिकच क्लिष्ट झाला आहे. मात्र अलीकडे आफुच्या शेतीवर सरकारने बंधने आणली आहेत. तसेच अलीकडच्या काळात विदेशात शिकून आलेल्या तरूणांनी बांधकाम व्यवसाय धडाक्यात सुरू केला असून सरकारच्या व परकीय मदतीने मोठे प्रकल्प येथे सुरू आहेत. अफगाणिस्तानच्या अर्थव्यवस्थेचा सर्वात महत्वाचा कणा म्हणजे येथे असलेल्या तेल, नैसर्गिक वायुम तांबे, लोखंड, लिथियम, कोळसा, सोने व अन्य महत्वाच्या खनिजांचे साठे, ज्यामुळे तेथे खाजगी उद्योग विस्तारण्यास वाव असून देशाला प्रचंड परकीय चलन मिळू शकते. गेल्या दशकात येथे दूरसंचार, संगणक, बँकिंग अश्या व्यवसायात वाढ झाली आहे. अफगाणिस्तान मध्ये आरोग्यसेवा फारच तोकडी असून विविध प्रकारचे रोग आढळतात आणि बाल-मृत्युदर, माता-मृत्यूदर जास्त आहे. विशेष म्हणजे येथे अपंगाची संख्या सर्वाधिक आहे. ह्याचे कारण खाणीमध्ये होणारे अपघात. गेल्या दशकात मात्र अन्य देशांच्या मदतीने येथे उत्तम व आधुनिक दवाखाने उघडले आहेत. अस्थिरतेमुळे शिक्षणावर विपरीत परिणाम झाला होता पण २००१ मध्ये नव्या शाळा उभारून राष्ट्रीय शिक्षणाचे पुंनरूज्जीवन करण्यात आले. येथे जुनी ६ विद्यापीठे होतीच शिवाय २००६ मध्ये अमेरिकरच्या पुढाकाराने एक ने व आधुनिक विद्यापीठ सुरू करण्यात आले. आज साक्षरता वाढत आहे आणि चांगल्या सुविधांमुळे लोकांचे जीवनमानही उंचावत आहे. अफगाणिस्तानात पारंपारिक संगीत प्रसिध्द आहे आणि त्याच प्रमाणे हिंन्दी चित्रपटांची गाणीही खूप प्रसिध्द आहेत. येथे हिंन्दी चित्रपट आवडीने पहिले जातात आणि बऱ्याच हिंन्दी चित्रपटांचे कथानक अफगाणिस्तानच्या पार्श्वभूमीवर बेतले आहे. अफगाणिस्तान एक अत्यंत मागास देशाच्या छबितून हळूहळू बाहेर येत असून त्याची पुढील प्रगति राजकीय स्थितिवर अवलंबून आहे.

## ४.९ भुतान व मालदिव

दक्षिण आशियातील सर्वात लहान आणि विकासात सर्वात खालच्या पातळीवर असलेले देश भुतान व मालदिव आहेत. भुतान हा भारताच्या पूर्वेला हिमालयच्या पूर्वेकडील शेवटच्या पर्वतरांगांमध्ये वसलेला देश असून त्यांच्या पूर्वेला चीन व इतर तीन बाजूस भारत आहे. येथे पूर्वी अनेक टोळ्या होत्या त्यांना १७व्या शतकात तिबेटमधून धार्मिक अत्याचारामुळे पलायन करून आलेल्या लामा वंशाच्या नाम्याल नामक योध्याने एकत्र केले आणि एका समाईक कायद्याद्वारे भूतानची राजवट स्थापन केली. ब्रिटिश काळात जवळचे काही प्रदेश काबिज केल्याने ब्रिटिश व भूतानच्या राजांमध्ये युध्द झाले पण काही प्रदेशांच्या बदल्यात ब्रिटीशांशी तह होऊन शांतिपूर्ण संबंध प्रस्थापित झाले. ह्याच काळात राजघराण्यात यादवी होऊन वांगचूक घराणे सत्तरेवर आले जे आजही आहेत. १९५३ मध्ये राजाने लोकशाही प्रक्रियेचा भाग म्हणून १३० सदस्यांची एक संसद आणि १९६८ मध्ये मंत्रीपरिषद निर्माण केली. त्यातच पुढे १९९९ मध्ये जनता व प्रसारमाध्यमांवरील बंधने उठवून २००५ मध्ये नवे संविधान तयार करण्यात आले आणि २००७

मध्ये देशात पहिल्या निवडणुका घेण्यात आल्या. त्यानंतर २००८ मध्ये राजाने स्वेछेने सत्ता निर्वाचित सत्ताधाऱ्यांकडे सुपूर्द केली आणि भुतानचे अमर्याद राजेशाहीकडून संवैधनिक राजेशाहीत परिवर्तन झाले. हा बदल अत्यंत क्रांतिकारी, समयोचित आणि शांततापूर्ण होता. भुतान चे २० प्रशासकीय विभाग आहेत. त्यांचे प्रशासन स्थानिक निर्वाचित मंडळातर्फे पहिले जाते. मोठ्या शहरात नगर पालिका आहेत. भुतानचे परराष्ट्र संबंध १९४९ पासून भारतातर्फे पहिले जात होते, पण २००७ पासून भूतानचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व मान्य करून भारताने परराष्ट्र धोरणातून आपले अंग काढून घेतले. भूतानचे सर्वच प्रमुख देश व संघटनांशी संबंध आहेत, परंतु चीनशी मात्र अधिकृत संबंध प्रस्थापित झाले नाहीत. चीन व भूतान मधील मधील सीमा निर्दारित नसून त्याबाबत अजूनही वाद आहेत. भारत व बांग्लादेशाचे नागरिक वगळता इतर सर्वच देशांच्या पर्यटकांना भूतानमध्ये फिरण्यासाठी प्रती दिन २५० डॉलर द्यावे लागतात. त्यामुळे पर्यटन व्यवसाय येथे विकसित झाला नाही. वास्तविक तो भुतान च्या अर्थव्यवस्थेचा महत्वाचा आधार आहे. शेती हा येथे पारंपरिक आणि मोठा व्यवसाय आहे, ज्यात तांदूळ, मिरची, सफरचंद व लिबवर्गातील फळे, बार्ली, अशी पिके होतात. अन्य उद्योगात वन-संरक्षण, हस्तकला, गृहोद्योग, पशू-पालन अशी क्षेत्रे आहेत. जल-विद्युत निर्मिती भारताच्या मदतीने विकसित झाली असून त्यातून चांगले उत्पन्न मिळते. तसेच मसाल्याचे पदार्थ, विलायची, हस्तकलेच्या वस्तु, पारंपरिक दागिने, मौल्यवान खडे व रत्ने, इमारती लाकूड, सीमेंट, कॅल्शियम कार्बाइट, जिप्सम, फळांवर प्रक्रिया करून केलेले पदार्थ आणि मद्य ह्यांची निर्यात केली जाते. अलीकडच्या काळात काही आधुनिक उद्योग येथे उभारले गेले आहेत. तसेच, रस्ते, बांधकाम उद्योग, इ-कॉमर्स असे नवे उद्योग सुरू झाले आहेत. तसेच भारताच्या मदतीने रेल्वे मार्ग बांधणे सुरू आहे. भुतान चे चलन गुल्तृम (Ngultrum) भारताच्या रूपयाशी जोडले गेल्याने आणि भुतानचा ६०% वित्तीय खर्च भारत करत असल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणारे सर्व बरे-वाईट परिणाम भुतानवरही दिसतात.

भुतानमध्ये पूर्व भुतानी आणि पश्चिमी भुतानी लोक प्रामुख्याने आहेत आणि काही नेपाळी वंशाचे लोक आहेत. येथे ७६% लोक बौध्द असून, २३% हिंदू आणि १% इतर धर्माचे आहेत. मुख्य भाषा भुतानी असून इतर ५३ भाषा बोलल्या जातात. भूतानची संस्कृति ही बाह्य प्रभावापासून मुक्त राहिली असून, वेशभूषा, संगीत, नृत्य, वास्तूकला, वादन, पाककला ह्याबाबतीत येथे स्वतंत्र व खास वैशिष्टे आढळतात. बौध्द धर्म अधिकृत धर्म असून त्याचे दृश्य अवशेष येथे आढळतात. तसेच येथे धार्मिक स्वातंत्र्य आहे. मात्र, नेपाळी हिंदू निर्वासित आणि तिबेटमधून आलेले निर्वासित ह्यांचे भुतानी जनतेशी खटके उडतात. अधिकृत नागरिक म्हणून सरकार त्यांना मान्यता देत नाही आणि त्यांच्या बाबतीत फार कडक कायदे आहेत. त्यामुळे मनावाधिकाराच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

मालदिव हा भारताच्या दक्षिणेला हिंन्दी महासागरात वसलेला बेटांचा देश आहे. भारताच्या लक्षदिव बेटांच्या साऊथ-वेस्टला ४०० की. मी. वर आणि श्रीलंकेच्या साऊथ-वेस्टला ७०० की. मी. वर मालदिवच्या सुमारे ११०० बेटांची गोलाकार रचना आहे. त्यांचे एकत्र गट करून २६ अटॉल बनले आहेत. ११०० बेटांपैकी फक्त १८५ वर मानवी वस्ती आहे. 'मालदिव' हा शब्द संस्कृत मधून उत्पन्न झाला असून त्याचा अर्थ 'दिव्यांची माला किंवा हार' असा होतो आणि मालदिवच्या बेटांची रचना माळेप्रमाणे गोल असल्याने त्याला हे नाव समर्पक ठरले आहे. भारत व श्रीलंकेतून आलेल्या लोकांचे येथे प्राचीन काळापासून सुरू झाले. नंतर भारताच्या उत्तरेतून आणि आखाती परदेशातूनही लोक आले. कालौघात येथे जनतेची

सरमिसळ झाली आणि त्यामुळे येथे भारताच्या आर्यन व द्रविड संस्कृतीची, बौध्द संस्कृतीची आणि इस्लामी संस्कृतीची अशी संमिश्र वैशिष्टे आढळतात. बौध्द धर्माचा प्रसार येथे अशोकाच्या काळात झाला आणि त्याचा प्रभाव १२ व्या शतकापर्यंत राहिला. त्यानंतर इराणी युसुफ ताबरिजी ह्याने इस्लाम धर्म येथे रूजवला आणि आज मालदिवमध्ये ९८% मुस्लिम आहेत. १९६८ मध्ये एका जनमताद्वारे मालदिवने अध्यक्षीय पध्दत स्वीकारली आणि ८०० वर्ष जुनी राजेशाही संपली. १९७८ मध्ये मौमून अब्दुल गयुम हे अध्यक्ष झाले आणि पुढील ३० वर्षे त्यांनी राजकीय स्थैर्य दिले. १९८०, १९८३ आणि १९८८ मध्ये सत्ता उलथवण्याचे प्रयत्न झाले, पण भारताच्या हस्तक्षेपाने ते अयशस्वी झाले. मालदिवचे संविधान २००८ मध्ये मोठ्या प्रमाणात सुधारित करण्यात आले आणि न्यायपालिका इतर दोन संस्थापासून स्वतंत्र करण्यात आले. इस्लाम मालदीवचा अधिकृत धर्म असून संविधांनातील कायद्यामुसार न्याय दिला जातो. जेथे संविधानातील तरतुदी अपुऱ्या पडतात तेथे शरीयत प्रमाणे न्याय दिला जातो. प्रशासकीय दृष्ट्या मालदीवचे २६ अटॉल हे प्रत्येकी एका मुख्य अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली असतात. हे अटॉल ७ प्रशासकीय विभागात बांधले आहेत.

मालदिव हे समुद्रात असल्याने येथे वर्षभर दमट व उष्ण हवामान असते. हा देश समुद्रासपाटीपासून फक्त १.५ मीटर उंच आहे आणि हवामानाच्या झपाट्याने होणाऱ्या बदलांमुळे ही सर्व बेटे भविष्यात समुद्रात बुडण्याची भीती आहे. ही मालदिवची सर्वात गंभीर समस्या आहे. मालदिवची अर्थव्यवस्था पर्यटनावर आधारित आहे, ज्यातून २८% उत्पन्न मिळते. सरकारने शांत व स्वच्छ बेटांवर समुद्रकिनारे विकसित केले असून तिथे सर्व आधुनिक सोयीसह रीसॉर्ट बांधले आहेत. माले ह्या राजधानीत असलेले विमानतळ आधुनिक पध्दतीने विकसित करण्यात आले आहे. मासेमारी येथे पुरातन व्यवसाय असून अत्यंत उत्तम व दुर्मिळ जातीचे मासे येथे मिळतात, ज्याच्या निर्यातीतूनही सुमारे १५% उत्पन्न मिळते. मासेमारीचे तंत्रसुध्दा जपानच्या साहाय्याने आधुनिक पध्दतने करण्यात आले आहे. बाकी येथे नारळ, पपई अन्य फळे आणि काही प्रमाणात तांदूळ अशी उत्पादने होतात. पिण्याचा पाण्यासाठी समुद्राच्या पाण्यातून क्षार काढण्याची यंत्रे येथे वापरली जातात.

मालदिव ची जनता ही द्रविड-आर्यन अश्या मिश्र वंशाची असून त्यामुळे येथील संस्कृतिक वैशिष्टे संगीत, वादन, कला, नृत्य-ह्यावरहि तीच छाप दिसते. येथील भाषा धीवेही सिंहली-तामिळ अश्या मिश्रणातून तयार झाली आहे. मालदीवमध्ये प्राथमिक शिक्षण मिळते, मात्र उच्च शिक्षणासाठी इजिप्त किंवा अमेरिकेत जावे लागते.

## ४.१० दक्षिण आशियातील सहकार्याला पूरक बाबी

वर आपण दक्षिण आशियातील देशांची मूलभूत माहिती घेतली. त्यातून काही समान वैशिष्टे प्रकर्षाने लक्षात येतात. ह्या समानतेमधुन दक्षिण आशियातील देशांमध्ये सहकार्याला पूरक असा समान धागा पुढील गोष्टीमधून लक्षात येतो.

१) दक्षिण आशियाला १०,००० वर्षाचा इतिहास आणि तेवढीच जुनी संस्कृती आहे. प्राचीन काळी फार मोठी, विकसित, सुसंस्कृत अशी सभ्यता अस्तीत्वात होती, ज्याची तुलना प्राचीन चीनी, इजिप्शियन, मेसोपोटेमियन अशा सभ्यतांशी केली जाते. दक्षिण

आशियातील मोहेंजोदारो-हरप्पाची सभ्यता आणि नंतरची वैदिक काळातील सभ्यता व आर्य संस्कृती हे सर्व सिंधु (इंडस), काबुल, गोमती, झेलम, रावी, बियास, सतलज आणि गंगा ह्या नद्यांच्या भोवती विकसित झाल्या. 'सप्त-सिंधु' नामक अत्यंत प्रगत व संपन्न प्रदेश ह्याच दक्षिण आशियाच्या मध्यभागी येतो. दक्षिण आशियाचा इतिहास हा स्थालांतराचा इतिहास आहे. मध्यपूर्वेकडून आलेले लोक दक्षिण आशियाच्या सप्त-सिंधु भागात वसले, त्यानंतर तिथून ते आणखी पुढे दक्षिणेकडे व पूर्वेकडे सरकले. नंतरच्या काळात श्रीलंका, मालदिव येथे व्यापार व धर्म प्रसारासाठी लोक गेले व स्थायिक झाले. १९व्या शतकापर्यंत चाललेल्या ह्या स्थालांतरामुळे आणि लोकांच्या मिसळण्यामुळे दक्षिण आशियातील जनता विशिष्ठ वंशाची आणि संस्कृतीची झाली आहे.

२) भौगोलिक दृष्ट्या दक्षिण आशिया हा एक सलग भूप्रदेश आहे. हिमालय, ऋतु ह्यात एकसारखेपणा आढळतो. येथील मातीचा पोत, जीवसृष्टी, वनस्पतीसृष्टी ह्यातही साधर्म्य दिसते. शेती व उगवणारी पिके ह्यातही साम्य दिसते. त्याचबरोबर पुर, वादळ, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तीही येथे सारख्याच भेडसावतात. आजच्या काळात येथील पर्यावरणीय समस्याही सारख्याच आहेत.

३) दक्षिण आशियातील आठही देशांचे एकमेकांशी प्राचीन काळापासून घनिष्ठ संबंध आहेत. किंबहुना इतिहासाच्या काही कालखंडात हे देश एकाच साम्राज्याचा भाग होते. मौर्य, गुप्त, हर्षवर्धन, अशोक, अकबर ह्यांच्या काळात अफगानिस्तान पासून म्यानमारपर्यंत साम्राम्य पसरले होते. इतर काळात जरी राज्ये वेगवेगळी झाली असली तरी त्यांचात राजकीय, व्यापारी, सांस्कृतिक संबंध कायम होते. श्रीलंकेतील सिंहली हे भारतातील बिहार, उत्तरप्रदेश मधून आलेल्या जनतेचे वंशज आहेत. नेपाळमधील राजघराणी भारतातील राजपूत घराण्याचे वंशज आहेत. पाकिस्तान, बांग्लादेश व भारतामधील जनताही एकाच वांशिक गुणसूत्रांचे धारक आहेत.

४) लोकांच्या स्थलांतराने आणि परस्पर देवाणघेवाणीने सर्वात जास्त प्रभाव येथील सांस्कृतिक घटकांवर, लोकांच्या दैनंदिन जीवनावर आणि एकूणच जीवनदृष्टीवर दिसून येतो. मूलतः येथे वैदिक-हिंदू संस्कृतीचा प्रसार सर्वात जास्त काळ व सर्वदूर पसरला होता. त्यामुळे येथील भाषा, साहित्य, नाट्य, गायन, वादन, नृत्य, चित्रकला, वास्तूकला, हस्तकला, मूर्तिकला, इत्यादीवर ह्याच संस्कृतीचा प्रभाव दिसतो. तसेच बौध्द संस्कृतीची वैशिष्टे नंतर आली आणि त्याही नंतरच्या काळातील आक्रमणांमुळे ग्रीक-रोमन, इस्लामी व ख्रिस्ती संस्कृतीची काही वैशिष्टे येथे रूजली. भाषेबद्दल प्रमुख्याने जाणवते ते म्हणजे भौगोलिक सीमा न मानता भाषा ह्या प्रदेशाला एकत्र आणते. उर्दू व पंजाबी भाषा भारत व पाकिस्तान मध्ये बोलली जाते, बंगाली भारत व बांग्लादेशमध्ये समान आहे आणि तामिळ भारत श्रीलंकेमधील दुवा आहे. हिंन्दी ही कमी अधिक प्रमाणात सर्वच दक्षिण आशियात लोकांना समजते. ह्या भाषांमध्ये निर्माण झालेले साहित्य हे सर्व परदेशात वाचले जाते. २०व्या शतकात इंग्रजी ही एक समान भाषा झाली आहे. जनतेमध्ये एकमेकांशी वागण्याच पध्दत, नमस्काराची पध्दत, कपडे व वेशभूषा, दागिने, सण, जन्म-लग्न-मृतू ह्याबदलचे विधी व चालीरीती, खान-पानाच्या पध्दती इत्यादीबद्दल पुष्कळ साधर्म्य आढळते.

५) धार्मिक बाबतीत दक्षिण आशिया एक अजब प्रदेश आहे. जगातील सर्व धर्माचे अनुयायी येथे आढळतात. हिंदू, बौध्द, जैन, शीख हे धर्म भारतात निर्माण झाले आणि जगभर पसरले. इस्लाम, ख्रिश्चन, जुडाईसम (ज्यू), झेड-अवेस्ता (पारशी) हे धर्म बाहेरून येथे आले अन स्थिरावले. हिंदू धर्म येथील सर्वात प्राचीन, सर्वदूर पसरलेला आणि व्यापक धर्म आहे. हिंदूची काही धार्मिक स्थळे नेपाळ (पशुपतिनाथ मंदिर), श्रीलंका, बांगलादेशात आहेत. शिख धर्माचा संस्थापक नानक यांचे जन्मस्थान बाबाडेरानानक पाकीस्तानात आहे. गौतम बौध्दाचे जन्मस्थान लुंबिनी हे नेपाळमध्ये असून बामियन बौध्द ह्या प्रसिध्द मुर्त्या व गुंफा अफगाणिस्तानात आहेत. श्रीलंकेत बौध्दाशी संबंधित प्राचीन अवशेष व स्तूप आहेत. नेपाळ व श्रीलंकेतील हिंदूना श्रध्देय अशी ठीकाणे भारतात आहेत. दक्षिण आशियातील मुसलमानांना पवित्र असे प्रसिध्द दर्गे व मशिदी भारतात आहेत. ही धार्मिक वास्तविकता येथील जनतेला एकत्र बांधण्यास समर्थ आहे. त्याशिवाय कालौघात अन्य सर्व धर्मानी आणलेल्या तत्वज्ञानाची हिंदू विचारांशी देवाण-घेवाण झाली. मुळात सहिष्णू व सर्व उत्तम चिवाराचे स्वागत करणारा हिंदू धर्म हा एक राजकीय-सामाजिक-न्यायिक जीवनाचा मार्ग म्हणून अधिकच उजळला. मध्ययुगीन काळात संतांनी हिंदू धर्माचे खरे मानवतावादी स्वरूप भक्तिसंप्रदायाच्या माध्यमातून पुढे आणले आणि इस्लामला सुफीसंतांनी नव्या रूपात सादर केले. बौध्द धर्म, ज्याला एकेकाळी राजाश्रय होता आणि तो दक्षिण आशियाच्या सीमा ओलांडून बाहेत परसरला, त्याला १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी पुनरूज्जीवित केले. ह्या सर्व धार्मिक विचारांच्या मिश्रणाने व आदान-प्रदानाने दक्षिण आशियातील लोकांचे धार्मिक विचार अत्यंत सखोल झाले असून त्यातून त्यांची जीनदृष्टीही समग्र, सुध्ढ, मानवतावादी, व्यापक बनली आहे.

६) १९व्या आणि २०व्या शतकात परकीय राजवटीने दक्षिण आशियाला सारखेच पोळले आहे. डच, पोर्तुगीज, फ्रेंच, ब्रिटिश असे युरोपिय व्यापारासाठी आले आणि हळूहळी राजकीय सत्ता काबिज केली. अखंड भारत, श्रीलंका, नेपाळ, भुतान इतक्या विस्तृत प्रदेशावर ब्रिटिशांची सत्ता दुसऱ्या महायुध्दापर्यंत होती. काही छोट्या पोर्तुगीज व फ्रेंच वसाहती होत्या. ह्या राजवटीचा दक्षिण आशियावर बरा-वाईट परिणाम झाला. राजकीय दृष्ट्या ह्या प्रदेशाचे एकत्रीकरण झाले. नव्या राजकीय संस्था येथे वाढल्या, उदा. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ. नोकरशाही व्यवस्था आणि नवी प्रशासकीय यंत्रणा आली. नवे कायदे आणि कायद्याचे राज्य आले. न्यायव्यवस्था स्वतंत्र व आधुनिक रूपात आली. महत्वाचे म्हणजे नवे विचार – स्वातंत्र्य, समता, धर्मनिरपेक्षता, न्याय, लोकशाही, कायद्याचे राज्य, प्रतिनिधिक सरकार, मतदान, निवडणुक – असे विचार रूजले. नव्या शिक्षण पध्दतीमुळे जगाचा इतिहास, औद्योगिक क्रांती, युरोपातील युध्दे आणि विविध चळवळी, विज्ञन-तंत्रज्ञानाची प्रगति, वैज्ञानिक दृष्टीकोण, वैचारिक स्थित्यंतरे ह्यांची ओळख झाली. त्यातून दक्षिण आशियाच्या वाईट, क्रूर सामाजिक प्रथांबद्दल चीड निर्माण झाली. मुख्य म्हणजे दक्षिण आशियाच्या लोकांमध्ये स्वातंत्र्याचे महत्व समजून अत्याचाराविरूध्द उठाव करण्याची प्रेरणा निर्माण झाली. असहकार, अहिंसा, शांतिपूर्वक विरोध ही नवे शस्त्रे येथील स्वातंत्र्य चळवळीने जगाला दिली. दक्षिण आशियातील वसाहतवादाविरूध्दचे आंदोलन हा आधुनिक इतिहासाचा परमोच्च व प्रेरणादायी काळ आहे.

७) परकीय राजवटीने दक्षिण आशियाची आर्थिक प्रगति केली तसेच शोषणही केले. नवीन राज्यव्यवस्थेबरोबरच काही आर्थिक शुधारणा झाल्या. सर्वप्रथम संपूर्ण प्रदेशात एक सामायिक चलन 'रूपया' सुरू झाले, जे ब्रिटिश पौंडाशी जोडले होते आणि सर्व अंतर्गत व्यवहारासाठी त्याचा उपयोग होऊ लागला. रेल्वे, टपाल सेवा, दूरसंचार सेवा, दूरध्वनी, पक्के डांबरी रस्ते, वीज अशा सुधारणा झाल्या. वस्त्रोद्योगाचे यांत्रिकीकरण झाले; ज्यूट उद्योग वाढला; रबर उद्योग विकसित झाल; कोळसा, लोखड ह्यांच्या खाणी विकसित झाल्या; सीमेंट व स्टील कारखाने सुरू झाले. शेतूमध्ये काही नगदी पिके सुरू झाली, जसे तंबाखू, चहा, कॉफी, इंडिगो. तसेच कापूस, ज्यट, मसाल्याच्या पदार्थाचे व्यापारी दृष्टीने उत्पादन सुरू झाले. ह्यामुळे उद्योगाला पोषक असे वातावरण निर्माण झाले आणि दक्षिण आशियातील अर्थकारण अधिकच एकत्रित झाले. मात्र, ब्रिटीशांच्या कर-पध्दतीने जनतेचे हाल केले. विशेषतः शेतसारा पध्दतीने आणि जमीनदारी पध्दतीने शेतकऱ्यांचे फार नुकसान झाले. तसेच उद्योगांवर लावलेल्या करांमुळे स्थानिक उद्योग बुडाले. लोकांचे पारंपारिक उदरनिर्वाहाचे मार्ग नष्ट होऊन बेरोजगारी, उपासमार, दारिद्र्य, कर्जबाजारी, गरीब-श्रीमंत आणि शहरी-ग्रामीण भेद, इ. समस्या निर्माण झाल्या. हे धोरण जाणीवपूर्वक ब्रिटिश वस्तु खपवण्यासाठी होते. त्यामुळे दक्षिण आशियाला काही आधुनिक, प्रगतिशील गोष्टी दिल्या, त्याचबरोबर काही गंभीर समस्या निर्माण केल्या ज्या पुढील कळातही डोकेदुखी ठरल्या. हे सर्व देश अविकसित किंवा विकसनशील गणले गेले.

८) परकीय राजवटीचा दक्षिण आशियातील समाजावरसुध्द खोल परिणाम झाला. समानतेवर आधारित युरोपिय समाजाच्या तुलनेत येथील विषमता व सामाजिक उतरंड क्रूर व अमानवी होती आणि त्याच्या सुधारणेसाठी चळवळी सुरू झाल्या. अन्य अनेक सामाजिक कुप्रथांविरूध्दसुध्दा आंदोलने झाली. नव्या शिक्षणामुळे दृष्टी बदलली, इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढला, आधुनिक विज्ञानाचे शिक्षण मिळाले आणि त्यामुळे अनेक कालबाह्य आचार-विचारांचा प्रभाव कमी झाला, अंधश्रध्दा कमी झाल्या, जाचक रूढी-परंपरा नाहीशा झाल्या. पण त्याचबरोबर लोकांमध्ये आपल्या चांगल्या परंपरांबद्दल, चालीरीतींबद्दल, धार्मिक विचारांबद्दल, इतिहासाबद्दल, संस्कृतीबद्दल कमीपणा व न्युनगंड निर्माण झाला आणि पाश्चात्य सर्वकाही श्रेष्ठ अशी भावना निर्माण झाली. ह्यातून पाश्चात्यांच्या अंधानुकरणाची सवय दक्षिण आशियात सुरू झाली.

९) दक्षिण आशियातील देशांना अनेक समान आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्नांनी ग्रासले आहे. ह्या देशात बेरोजगारी, दारिद्र्य, विदेशी कर्जाचा बोजा, कुपोषण, चलनफुगवटा, महागाई ह्या समस्या तर आहेतच, शिवाय चोरटा व्यापार, भ्रष्टचार, आर्थिक घोटाळे, प्रशासनातील दिरंगाई व अकार्यक्षमता, जीवनावश्यक वस्तूंची, कृत्रिम टंचाई, अश्या समस्यांनी या देशांना ग्रासले आहे. शिवाय काळे धन आणि त्यातून निर्माण झालेली एक समांतर अर्थव्यवस्था ह्या सुध्दा एक गहन प्रश्न ह्या देशांपुढे आहे. भारत वगळतात इतर देशात राजकीय अस्थिरता ही सुध्दा गंभीर समस्या आहे. सामाजिक पातळीवर सरंजामशाही प्रवृत्ती काही प्रमाणात अजूनही कायम आहेत. गरीब-श्रीमंत, शहरी-ग्रामीण, उच्च-नीच आणि जातीचे व वांशिक असे भेद अजूनही दिसतात. भारताचा अपवाद वगळता अणुतंत्रज्ञान, अवकाशसंशोधन, मोठ्या व अवजड यंत्रांची निर्मिती अश्या बाबतीत दक्षिण आशियातील देश फार मागे आहेत. ह्या सर्व समस्यांना एकत्रितपणे सोडवणे अधिक फायद्याचे ठरले असते.

१०) परकीय राजवटीच्या काळात दक्षिण आशियात सैन्याचा चांगला विकास झाला आणि त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ह्याचा उपयोग दक्षिण आशियातील देशांना झाला. आंतरराष्ट्रीय राजकारणात मात्र ह्या देशांना कधी सहभागी होता आले नाही आणि त्या अनुभवाच्या अभावामुळे दुसऱ्या महायुध्दांनतर ह्यांचे नुकसान झाले. अलिप्ततावादी चळवळीत असूनही शीतयुध्दाच्या राजकारणात हे देश अडकले आणि महासत्तांच्या चढाओढीत जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करू शकले नाहीत. ही न्यूनता दक्षिण आशियात समान आहे.

निर्माण करू शकले नाहीत. ही न्यूनता दक्षिण आशियात समान आहे.

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येईल की दक्षिण आशियात ऐतिहासिक, भौगोलिक, आर्थिक, सामाजकि आणि सांस्कृतिक असे वरील घटक आहेत. ज्यामुळे ह्या देशांना एकत्र जोडणारा मजबूत धागा अस्तीत्वात आहे. तसेच त्यांच्या समोर अनेक गंभीर समान प्रश्न आहेत. ज्यामुळेही हे देश एकत्र येऊ शकतात. पण काही विपरीत आणि नकारात्मक घटकांमुळे हे होत नाही.

## ४.११ सहकार्याला मारक व संघर्षाचे घटक

वर उल्लेख केलेले सहकार्याला पूरक घटक अस्तीत्वात असले तरी दुदैवाने दक्षिण आशियात अपेक्षित सहकार्य झाले नाही ही वास्तविकता आहे. ह्या सहकार्याला रोखणारे किंवा मारक असे कोणते घटक आहेत ते आपण आता पाहू.

१) दक्षिण आशियाचा इतिहास संघर्षमय आहे, ज्यामुळे येथे नकारात्मकता फार दिसते. परकीय राजे येथे आले तेच मुळातच युध्द करून आणि येथे सत्ता ताब्यात घेतल्यावर बळजबरीने जाचक कर वसूलणे, ताब्यात घेतलेल्या राज्यातील जनतेचा छळ करणे, राजदरबारी आपल्या खास मर्जीतील सरदारांना नेमणे, स्थानिक सरदारांना दुय्यम वागणूक देणे आणि जबरस्तीने धर्मांतर करवणे असे प्रकार झाले. मुघल राजवटीबद्दल हे प्रकर्षाने जाणवते. सर्वसामान्य जनतेमध्ये असा धार्मिक भेद नसला तरी पुढे ब्रिटिश राजवटीत हे विष मुद्दाम पसरवण्यात आले. त्यामुळे दक्षिण आशियात १९व्या शतकात हिंदू-मुस्लिम द्वेष वाढला ज्याचे पर्यवसान १९४७ मध्ये भारत व पाकिस्तान असे दोन वेगळे देश होण्यात झाले. ही फाळणी रक्तरंजित, द्वेषमूलक होती. त्याने दोन देशांतील सिमा आखून अनेक कुटुंबे तोडली, अनेकांनी जमिनी, संपत्ति, घरदार घमावले, लाखो मृत्यूमुखी पडले आणि तेवढेच बेघर व निर्वासित झाले. ही घटना दक्षिण आशियाई जनतेच्या मानसिकतेवर कायमची जखम करून गेली. त्यानंतरही भारतात हिंदी-मुस्लिम तनाव कायम राहिला आणि जेव्हा त्यांच्यात दंगे झाले तेव्हा त्याचे पडसाद सीमेपलीकडेही होऊ लागले. ह्या तणावामुळे दक्षिण आशियातील दोन प्रमुख देशातील राजकीय संबंधही कायम तणावाचे राहिले.

२) द्विराष्ट्रवादाच्या सिध्दांतावर दोन देश निर्माण झाले. पण हे विभाजन पाकिस्तानच्या मते अपूर्णच होते. मुस्लिम-बहुल जम्मू-काश्मीरचे भारतातील विलीनीकरण पाकिस्तानला

मान्य नव्हते आणि त्याने प्रथम १९४८ मध्येच भाडोत्री सैनिकांच्या मदतीने काश्मीर बळकवण्याचा प्रयत्न केला, जो असफल झाला. मात्र भारताने गरज नसताना हा प्रश्न युनोमध्ये नेला, ज्याने 'जैसे थे' चा आदेश दिला. तेव्हापासून हा प्रश्न एक डोकेदुखी आणि भारत-पाक संबंधातील मुख्य मुद्दा बनला.

३) पाकिस्तान सतत प्रत्येक क्षेत्रात भारताशी बरोबरी करण्याचा प्रयत्न करू लागला. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये लष्करी सामर्थ्य वाढवण्याची स्पर्धा सुरू झाली. त्याने इर्षेने भारताशी १९६५ मध्ये युध्द सुरू केले, पण पराभूत झाला. १९७१ मध्ये भारताने यशस्वी मध्यस्थी करून लष्करी कारवाईद्वारे पाकिस्तानच्या पूर्व भागाला "बांग्लादेश" म्हणून स्वातंत्र्य मिळवून दिले. अशारीतीने पाकिस्तानचा भारताला नमवण्याचा प्रत्येक डाव फसला.

४) दक्षिण आशियात भारताचा दक्षिणेकडील शेजारी श्रीलंकेशीसुध्दा तणावाचे संबंध राहिले. हा वाद रामिळ विरूध्द सिंहली असा होता. श्रीलंकेत अशोकाच्या काळापासून भारतातून लोक स्थलांतरीत झाले. नंतर ब्रिटिश काळात तामिळनाडूतून मजूर येथे आले. स्वातंत्र्यानंतर श्रीलंकन सरकारने सिंहल भाषा अधिकृत केली त्यामुळे तमिळांना आपल्या अस्तित्वाला धोका असल्याचे जाणवले. त्यातून संघर्ष वाढत गेला. एल.टी.टी.ई. ह्या संघटनेद्वारे हा लढा आक्रमक झाला आणि त्याला दहशतवादाचे स्वरूप आले. श्रीलंका सतत तामिळ दहशतवाद्यांना भारत मदत करत असल्याचा आरोप करीत असे. भारतातील तामिळ जनता ह्याबाबतीत फार संवेदनशील होती. १९८७ मध्ये शांतिसेना पाठवून भारताने प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला, पण तो अंगलट आला. ह्या दहशतवादामुळे भाराचे राजीव गांधी आणि श्रीलंकेचे प्रेमदासा ह्यांची हत्या झाली. श्रीलंका बरेचदा भारतीय मासेमाऱ्यांनासुध्दा समुद्रात सीमा ओलांडली म्हणून अटक करीत असते. ह्या प्रश्नांमुळे भारत-श्रीलंका संबंध तनवचे राहिले.

५) बांग्लादेशच्या निर्मितीत भारताचे योगदान असूनही थोड्याच वर्षात फराक्का धरण, सीमेवरील कुंपण, नद्यांच्या पाणी-वाटपाचा प्रश्न, सीमेवरील घुसखोरी व चकमकी असे वाद निर्माण झाले. आणि बांग्लादेशने त्याबाबत ताठर भूमिका घेतली. तसेच भारतात लाखो बांगलादेशी निर्वासित आहेत आणि सतत सीमा ओलांडून लोक येत असतात आणि भारतीय जनतेत सहज मिसळतात. त्यांना बांग्लादेश परत घेण्यास नकार देते. त्यामुळे भारत व बांग्लादेशात तणाव, निर्माण झाल.

६) भारत दक्षिण आशियातील मध्यवर्ती देश आहे. त्यांची लोकसंख्या, आकार, नैसर्गिक साधने, भक्कम अर्थव्यवस्था, तांत्रिक व औद्योगिक प्रगति, यशस्वी अणुचाचण्या, विकसित राजकीय संस्था आणि राजकीय स्थैर्य इत्यादीमुळे शेजारच्या देशांना भारताची एकप्रकारे भीती वाटते. अगदी सुरवातीच्या काळात भारताचे धोरण व्यापक आशियाई आणि विकसनशल राष्ट्रांचे संघटन करण्याकडे होते. नेहरूंनी त्यासाठी बांडुंग परिषदेसाठी पुढाकार घेतला. त्याचप्रमाणे नव्या स्वतंत्र झालेल्या देशांना अलिप्ततावादाच्या धोरणात एकत्र आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. भारत हा जागतिक राजकरणात जास्त रस घेतोय आणि जगाचे नेतृत्व करतोय असा शेजारच्या देशांचा समज झाला. त्यामुळे दक्षिण आशियाच्या संघटनेकडे काहीसे दुर्लक्ष झाले.

७) तसेच तीन युध्दात भारताच्या विजयामुळे भारताचा दबदबा वाढला. शेजारचे देश आपले जागतिक स्थान उंचावण्यासाठी आणि राजनैतिक पाठिंबा मिळवण्यासाठी दक्षिण आशिया बाहेर मित्र देश किंवा संघटना शोधू लागले. पाकिस्तान सिटो (SEATO) व सेंटो (CENTO) ह्या मध्यपूर्वेतील आणि इस्लामी जगतातील संघटनांचा सदस्य झाला. तसेच अमेरिकेलाही त्याने जवळ केले. श्रीलंकेनेही अमेरिकेशी जवळीक साधून त्रिंकोमाली येथे हवाई तळ उपलब्ध करून दिला. बांगलादेशसुध्दा इस्लामी संघटनांशी जोडला गेला.

८) भारताची अर्थव्यवस्था आपल्या अर्थव्यवस्थेवर वरचष्मा प्रस्थापित करेल अशी शेजारच्या देशांना भीती वाटत होती. कापड, चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, ज्युट, गहू, तांदूळ, उस, ह्या उत्पादनाच्या बाबतीत ह्या देशांत स्पर्धा होती. तसेच लोखंड, कोळसा, तांबे, अश्या खनीजांच्या उत्पादनातही स्पर्धा होती. भारतात जसे उद्योग निर्माण झाले तसे अन्य देशात होऊ शकले नाहीत. भारताबद्दलच्या संशयित भूमिकेमुळे अनेक क्षेत्रात सहकार्य होऊ शकले असते ते झाले नाही. उदा. वीजनिर्मिती, धरणे, रस्ते, वस्त्रोद्योग, मासेमारी ई. दक्षिण आशियातील देशांचा बाहेरच्या देशांशी व्यापार जास्त होता आणि शेजारच्या देशांशी कमी होता.

९) दक्षिण आशियात भारताच्या केंद्रीय स्थानामुळे अन्य देशांशी तणावाचे संबंध तर होतेच, परंतु अन्य देशांतही काही प्रमाणात तणाव होते. बांग्लादेशातील अडीच लाख बिहारी जनतेला पाकिस्तानमध्ये पाठवण्याचा मुद्दा त्या देशांमध्ये वादाचा झाला. मालदिव हा दक्षिण आशियातील दुर्लक्षित देश, पण त्याने आपले पर्यटन वाढवण्याचा प्रयत्न केला तेव्हा श्रीलंकेला आपल्या पर्यटनावर त्याचा विपरीत परिणाम होईल अशी भीती वाटली. भारताच्या ह्या शेजारच्या राष्ट्रांनी परस्पर संबंध वाढवले त्यामागे एक अंतस्थ हेतु भारताविरूध्द आपली स्थिति सुरक्षित करणे हा होता.

१०) दक्षिण आशियात बाहेरच्या देशांनी बरेचदा हस्तक्षेप करून येथील तणाव वाढवला आहे. मालदिवचे गान बेट इराण, सोविएत रशिया, लिबिया कडून लष्करी तळासाठी घेण्याचा प्रयत्न झाला. त्रिंकोमाली व दिएगो गार्सिया बेटांवर अमरेकिचे तळ होतेच. अमेरिका व रशियाने दक्षिण आशियातल्या गंभीर प्रश्नांमध्ये लक्ष घातले. मुख्यतः बांग्लादेशच्या निर्मितीच्या वेळी अमेरिकेचे आरमार भारतीय महासागरात सज्ज होते, तर रशियाने भारताशी मैत्रिकरार केला होता. चीन हा दक्षिण आशियात जास्त सक्रिय होता आणि त्याला भारताचे वाढते सामर्थ्य सहन होत नव्हते. प्रथम त्याने तिबेट बळकावून थेट भारतालाच आव्हान दिले आणि १९६२ मध्ये युध्दात आपले सामर्थ्य सिध्द केले. तसेच नंतर नेपाळ व बांगलादेशमध्ये आपला प्रभाव वाढवला आणि नेपाळमध्ये तर राजवट बदलण्यातही हातभार लावला. पाकिस्तानने चीनशी जवळीक साधून पाकव्यास काश्मीरमध्ये चीनला रस्ते बांधून व्यापारास मुभा दिली. त्याहीपेक्षा गंभीर म्हणजे चीनकडून अणुतंत्रज्ञान मिळवले. यामुळे दक्षिण आशियातील सत्ता-संतुलन आणि परस्पर संबंध बिघडले.

वरील विवेचनावरून आपल्या हे लक्षात येते की दक्षिण आशियातील संबंध हे भारतकेंद्री आहेत. भारताची सीमा अन्य प्रत्येक देशाशी जोडली आहे. अत्यंत दुर्देवी आणि हिंसक भूतकाळामुळे येथील राजकीय संबंध अविश्र्वासाचे व संशयाचे झाले. धार्मिक, सामाजिक समानता असूनही

ताठर व कट्टर भूमिकेमुळे एकता प्रस्थापित होऊ शकली नाही. त्यांचे पर्यवसान आर्थिक, शैक्षणिक, संस्कृतिक, वैज्ञानिक, तांत्रिक क्षेत्रातील दुराव्यात झाले. "विविधतेत एकता" हे दक्षिण आशियांचे वैशिष्ठ असून त्यात एकतेपेक्षा विविधतेवर जास्त जोर दिल्या गेला. ह्याला कमी-अधिक प्रमाणात सर्वच देश जबाबदार आहेत.

दक्षिण आशियातील नेत्यांमध्ये एकमेकांशी सहकार्य व्हावे अशी सुप्त भावना अस्तीत्वात होती. नेहरूंनी त्याकरता मार्च-१९४७ मध्येच दिल्ली येथे एक परिषद बोलावली होती आणि त्यात व्यापक आशियाच्या सहकार्याबद्दल योजना मांडली. नंतर बांडुंग येथे आशिया व आफ्रिका खंडाच्या सहकार्याबद्दल चर्चा झाली. त्याही पुढे वसाहतवादाविरूध्द, वर्णभेदाविरूध्द आणि महासत्तांच्या दंडेलीविरूध्द नव्या स्वतंत्र झालेल्या देशांचे एक संघठन असावे असा विचार पुढे आला आणि त्यातून अलिप्ततावादाचा जन्म झाला. अलिप्ततावादाने काही काळ विकसनशील राष्ट्रांना शीतयुध्दाच्या राजकारणाविरूध्द एक व्यासपीठ दिले, पण तेवढीच त्याची मर्यादा होती. त्याने संस्थात्मक स्वरूप धारण केले नाही आणि तो अखेर एक विचार म्हणूनच राहिला. तसेच जगामध्ये हळूहळू प्रादेशिक स्तरावर सहकार्याला सुरवात झाली. युरोप, लॅटिन अमेरिका, मध्य आशिया, आफ्रिका, पश्चिम आशिया अश्या प्रादेशिक पातळीवर निरनिराळ्या क्षेत्रात सहकार्य सुरू झाले. ह्या संगठ्नांनी आर्थिक, व्यापारी, शैक्षणिक, तांत्रिक क्षेत्रात सहकार्याचे एक यशस्वी उदाहरण जगासमोर ठेवले. शेवटी दक्षिण-पूर्व आशियातील देशांनीही आपली संगठना – आशियान – (ASEAN) स्थापन केली. ह्या काळात दक्षिण आशियाची ओळख दक्षिण-पूर्व आशियामुळे होती. पण जेव्हा आशियन स्थापन झाला तेव्हा दक्षिण आशिया एक वेगळा प्रदेश म्हणून प्रकर्षाने समोर आला. सुप्त स्वरूपात असलेल्या दक्षिण आशियातील एकतेच्या जाणिवेला हळूहळू स्फूर्ति मिळत गेली आणि सहकार्याची कल्पना आकार घेऊ लागली.

७०व्या दशकात दक्षिण आशियाची ओोळख येथील नेत्यांनाही होऊ लागली. ह्या देशांचे परस्परावलंबित्व, त्यांची सामायिक वैशिष्ट्ये आणि अनेक समान प्रश्न एकत्रित सोडवता येऊ शकतात ही जाणीव व्हायला लागली. एकमेकांशी लढण्याने नुकसानच अधिक होते हे राज्यकर्त्यांना उमगले. ह्याच दशकात जगात अधिक स्थित्यंतरे झाली. १९७७ मध्ये युनोच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या विली ब्राण्ड आयोगाने आपल्या अहवालात विकसित राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांना आपल्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ०.७% मदत द्यावी. ह्यामुळे दक्षिण आशियातील राष्ट्रांचे मनोबल वाढले आणि एकमेकांशी सहकार्य करण्याच्या भावनेला बळ मिळाले. १९८० मध्ये अफगाणिस्तानमध्ये रशियाने सैन्य घुसवले. ज्यामुळे दक्षिण आशियात शीतयुध्दाची थेट झळ पोचली आणि आधीच अशांत क्षत्रात युध्दाची भीती निर्माण झाली. ह्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने "कार्टर योजने" अंतर्गत दक्षिण आशियासाठी क्षेत्रीय सहकारी सुरक्षेची योजना मांडली. दक्षिण आशियातील नेत्यांनी ह्याला संमिश्र प्रतिसाद दिला तरीही त्यामुळे संरक्षणासाठीही एकत्र येण्याची गरज मात्र अधोरेखित झाली.

दक्षिण आशियात ह्याच दशकात काही महत्वाच्या घटना घडल्या. भारतात प्रथमच जनता पक्षाचे गैर-काँग्रेसी सरकार निवडून आले तर श्रीलंकेत जयवर्धने हे सत्तेत आले आणि पाकिस्तानात जन. झिया-उल-हक व बांग्लादेशात जन. झिया-उर-रहमान ह्या लष्करशहांनी सत्ता काबिज केली. हे नेते नव्या विचारांचे, पुरोगामी, भूतकाळचे ओझे न बाळगणारे, नव्या पद्धतीने कार्य करणारे आणि थोडे पश्चिम देशांशी जवळिक असलेले नेते होते. दक्षिण आशियाच्या समस्यांबद्दल त्यांचा स्पष्ट आणि सकारात्मक दृष्टीकोण होता व त्यांना क्षेत्रीय सहकार्याचे फायदे

समजले होते. तसेच सत्तेत नवीन असल्याने ह्या नेत्यांना आतंरराष्ट्रीय राजकरणात स्थान मिळण्यासाठी एकमेकांच्या पाठिंब्याची गरज होती. भारताबद्दलची भीती व संशयसुध्दा काहीसा कमी झाला होता. जागतिक संगठना व बड्या राष्ट्रांच्या बद्दल भ्रमनिरास आणि प्रचंड नाराजी दक्षिण आशियात निर्माण झाली होती. त्यामुळे अनेक अडचणी व संघर्षाचे मुद्दे असूनही एकता, परस्परावलंबित्व व सहकार्याची उत्कट गरज आणि वर उल्लेखिलेल्या सामायिक घटकांमुळे १९८० च्या दशकात प्रत्यक्ष सहकार्याच्या प्रयत्नांना सुरूवात झाली.

ह्या प्रयत्नाना चालना देण्याचे श्रेय बांग्लादेशचे अध्यक्ष जन. झिया-उर-रहमान यांना जाते. त्यांनी १९७७ ते १९८० दरम्यान दक्षिण आशियातील नेत्यांच्या स्वतः भेटी घेऊन दक्षिण आशियातील संस्थात्मक सहकार्याचे महत्व पटवले. तसेच त्यांनी सहकार्याचे काही ठळक व समायिक विषय आणि एक प्राथमिक संस्थात्मक आराखडा समोर ठेवला. जन. रहमान यांनी हे करताना स्पष्ट केले की प्रस्तावित सहकार्य कोणत्याही नव्या सत्ताकेंद्राच्या निर्मितीसाठी नसून व्यापक अलिप्ततावादाच्या सिध्दांतानुसार ही रचना असेल. हा विचार व्यवहारी आणि वास्तववादी होता. १९८३ ला दिल्ली येथे दक्षिण आशियाई देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेत रेहमान यांचा प्रस्ताव मंजूर झाला. त्यानंतर चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या आणि १९८५ मध्ये ढाका येथे सातही देशांच्या प्रमुखांच्या शिखर परिषदेत 'सार्क जाहिरनामा' मंजूर होऊन दक्षिण आशियाई देशांचा संघ (South Asian Association for Regional Cooperation – SAARC) स्थापन झाला. १९८५ मध्ये सात देश सार्कचे सदस्य होते आठवा अफगाणिस्तान २००५ मध्ये सदस्य झाला.

सार्क जाहीरनाम्यात पुढील उद्दिष्टे सांगण्यात आली आहेत.

१) दक्षिण आशियातील जनतेचे जीवनमान उंचवण्यार्थ त्यांच्या कल्याणाल प्रोत्साहन देणे.
२) दक्षिण आशियात आर्थिक वृध्दी, सामाजिक प्रगति आणि सांस्कृतिक विकासाचा वेग वाढवून प्रत्येक व्यक्तिला त्यांच्या पूर्ण क्षमता साध्य करण्यासाठी स्वाभिमानाने जगण्याच्या संधी उपलब्ध करून देणे.
३) दक्षिण आशियातील देशांत सामूहिक स्वयंनिर्भरता वाढवणे व मजबूत करणे;
४) परस्परांवरील विश्र्वास, सामंजस्य आणि एकमेकांच्या समस्यांच्या आकलनासाठी योगदान देणे;
५) आर्थिक, सामाजि, सांस्कृतिक, तांत्रिक व वैज्ञानिक क्षेत्रात परस्पर सहकार्य व सक्रिय सहभाग वृद्धिंगत करणे;
६) इतर विकसनशील देशांशी सहकार्य मजबूत करणे;
७) सामायिक प्रश्नांबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्परातील सहकार्य मजबूत करणे;
८) समान उद्दिष्टे व ध्येय असलेल्या आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटनांना सहकार्य करणे सार्क मधील सहकार्यासाठी आधारभूत अशा खालील तत्वांचाही अंतर्भाव सार्क जाहीरनाम्यात करण्यात आला आहे.

- सार्वभौम एकता, भौगोलिक एकात्मता, राजकीय स्वातंत्र्या, राज्यांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे आणि परस्पर लाभ ह्या तत्वांवर सार्क संघटनेच्या अंतर्गत सहकार्य अवलंबून आहे.
- हे सहकार्य द्विपक्षीय व बहुपक्षीय सहकार्याला पर्याय नसून पूरक आहे;

- हे सहकार्य सदस्य राज्यांच्या द्विपक्षीय व बहुपक्षीय करारांच्या सुसंगत राहील

तसेच सार्कने कामकाजाबाबत पुढील सर्वसामान्या नियमसुध्दा स्वीकारले आहेत.

(□) सार्क अंतर्गत सर्वच स्तरावरील निर्णय सर्वसंमतीने घेतले जातील, आणि

(□) संघटनेतील सर्व चर्चांमधून द्विपक्षीय व वादग्रस्त मुद्दे बाहेर ठेवण्यात येतील.

## ४.१३ सार्क : सहकार्याची यंत्रणा

सार्कच्या स्थापनेमुळे अशारितीने एक क्रांतीकारी निर्णय होऊन दक्षिण आशियामध्ये एका नव्या पर्वाला सूरवात झाली. दक्षिण आशियातील नेते अत्यंत जागृत, सहकार्याबद्दल प्रामाणिक व उत्साही आणि वास्तववादी होते. आधुच्या अनुभवामुळे त्यांनी जुन्या चुका टाळल्या आणि सकारात्म भूमिकेतून सार्कची उभारणी केली. स्थापनेबरोबर सार्कची यंत्रणा मजबूत पायावर उभी राहावी म्हणून काही निर्णय घेण्यात आले. मुख्य म्हणजे केवळ वैचारिक पातळीवरच सार्कचे चैतन्य न ठेवता त्याला एक संस्थात्मक-घटनात्म स्वरूप देण्यात आले. ही रचना कशी आहे ते आता आपण पाहू –

### (अ) सार्क सचिवालय –

दक्षिण आशिया जगातील शेवटचा प्रदेश ठरला ज्याने आपली संघटना उभारली. अन्य संघटनांच्या धर्तीवर सार्कनेही आपल्या सहकार्याला संस्थात्म व कायमस्वरूपी रूप दिले. सर्वप्रथम सार्कने आपले सचिवालय स्थापन केले जे कायमस्वरूपी मुख्यालय म्हणून कार्य करते. हे सचिवालय सार्कच्या सर्व निर्णयांचे व कागदपत्रांचे संरक्षक म्हणून काम करते. सार्कच्या सर्व स्तंरावरील कार्यक्रम, बैठक आयोजित करण्याची मुख्यालयाची जबाबदारी असेत. तसेच सार्कच्या विविध उपसमित्या व अभिकरणांमध्ये समन्वय साधण्याचे कार्यही सचिवालय करते. त्याचप्रमाणे दक्षिण आशियातील सर्व देश, सार्कच्या समित्या व विविध खाती ह्यांच्यातील दुवा म्हणूनही मुख्यालय कार्य करते. शेवटी सार्क व दक्षिण आशियाची सर्व माहिती संकलीत करणे, त्याचा योग्य उपयोग करणे आणि अभिलेख म्हणून ही माहिती जतन करणे हे सुध्दा मुख्यालयाचे कर्तव्य आहे. मुख्य म्हणजे सार्कचे सर्व निर्णय आणि प्रकल्पांचे कार्यान्वयन सार्क मुख्यालय करते. सार्कच्या प्रशासकीय कार्यात हे मुख्यालय अग्रभागी असून ते नेपाळची राजधानी काठमांडू येथे स्थित आहे. सचिवालयाचे प्रत्यक्ष कामकात १९८७ मध्ये सुरू झाले. सचिवालयाचा प्रशासकीय प्रमुख महासचिव असतो आणि त्याची निवड सार्क सदस्य राष्ट्रांच्या राजदूतांमधून चक्रक्रमाने दोन वर्षाकरता होते. महासचिव सार्कच्या अध्यक्षांना उत्तरदायी असतो. त्याशिवाय आठ संचालक असतात जे प्रत्येक देशांतून नियुक्त होतात. महासचिव व आठ संचालक हे व्यावसायिक परराष्ट्र सेवेतील राजदूत असतात आणि ते वरिष्ठ परराष्ट्र सचिव दर्जाचे अधिकारी असतात. ह्या अधिकाऱ्यांव्यातिरिक्त इतर दुय्यम कर्मचारी वर्ग मुख्यालयाद्वारे नियुक्त केला जातो. बांग्लादेशचे वरिष्ठ राजदूत अबुल अहसन हे पहिले महासचिव होते. भारताच्या दोन राजदूतांना आजपर्यंत महासचिव होण्याची संधी मिळाली आहे.

### (ब) शिखर परिषद –

सार्क संघटनेच्या रचनेत सर्वात वरिष्ठ स्थान शिखर परिषदेला आहे. सार्कच्या सदस्य राष्ट्राच्या राष्ट्रप्रमुख किंवा शासन प्रमुखांची ही शिखर परिषद असते. शिखर परिषदेच्या यजमान देशाच्या प्रमुखांना सार्कचे अध्यक्ष निवडले जाते. सार्कची ही महत्वाची व अंतिम निर्णय घेणारी

संस्था आहे. स्थापनेपासून आजपर्यत १७ शिखर परिषदा झाल्या आहेत. प्रथम शिखर परिषद दरवर्षी घेण्याचे ठरेले होते, पण नंतर त्यात बदल करून दर दोन वर्षानी ती घेण्यात येते. शिखर परिषदेच्या अधिकृत व जाहिर बैठकीला जोडूनच राष्ट्रप्रमुखांमध्ये अनौपचारिक बैठक खाजगीरित्या घेण्याचीही प्रथा पडली आहे, ज्यामध्ये नेते आपल्या कर्मचाऱ्यांच्या मदतीशिवाय अनौपचारिक वातावरणात चर्चा करू शकतात. त्याचा फायदा कधी कधी वादग्रस्त मुद्दे निवळण्यात होतो. अधिकृत शिखर परिषदेत सार्कच्या प्रगतिचा आढावा घेतला जातो आणि भविष्यातील उद्दिष्टे, धोरणे व कार्यक्रम निर्धारित केले जातात.

**(क) मंत्री परिषद –**

शिखर परिषदेनंतर दुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे मंत्री परिषद. ह्यात सर्व सदस्य राष्ट्रांचे परराष्ट्र मंत्री असतात. सार्कची धोरणे व कार्यक्रम ठरवणे, सहकार्याची नवी क्षेत्रे ठरवणे, तांत्रिक समित्यांची उभारणी करणे आणि सार्कच्या एकून कामकाजावर देखरेख ठेवणे असे परिषदेचे कार्य आहे. परिषद दर दोन वर्षानी किंवा आवश्यकता असल्यास जास्त वेळा घेतली जाते. परिषदेच्या अहवालावर शिखर परिषद अंतिम शिक्कामोर्तब करते.

**(ड) स्थायी समिती –**

सार्क सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्र सचिवांची स्थायी समिती असते, जी मंत्री परिषदेला जबाबदार असते. गरजेनुसार ह्यांच्या बैठका होतात आणि त्याचा अहवाल मंत्रीपरिषदेकडे दिला जातो. सार्कच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेणे, प्रकल्पांची योजना आखणे, आर्थिक सहाय्य ठरवणे, योजनांची प्राथमिकता ठरवणे, दक्षिण आशियांतर्गत किंवा अन्य देशांकडून सहाय्य मिळवणे, नवे मार्ग व साधने निर्धारित करणे आणि सार्कच्या प्रकल्पांची अंमलबजावणी करणे अशा जबाबदाऱ्या स्थायी समितीकडे आहेत.

**(इ) तांत्रिक समिती –**

सार्कचे कार्य एकात्मिक कार्यक्रमाद्वारे (खपीशसीरींशव झीशीराश ं ष अलिंळेप – खझअ) चालते. त्याकरता मान्यताप्राप्त क्षेत्रासाठी तांत्रिक समित्या आहेत. त्यांचे कार्य हे त्यांना नेमून दिलेल्या क्षेत्राकरता कार्यक्रमांची व योजनांची आखणी करणे हे आहे. तसेच योजनांची अंमलबजावणी करून त्याचा अहवाल स्थायी समितीला सादर केला जातो. सध्या सार्कमध्ये सहा तांत्रिक समित्या आहेत.

(१) कृषी व ग्रामीण विकास
(२) आरोग्य व लोकसंख्या
(३) महिला, युवक आणि बालक
(४) विज्ञान व तंत्रज्ञान
(५) वाहतूक
(६) पर्यावरण

**(फ) कार्यक्रम समिती –**

स्थायी समितीला मदत करण्यासाठी कार्यक्रम समित्या करण्यात आल्या आहेत. प्रादेशिक प्रकल्पांची निवड करणे, त्यांचे कार्यक्षेत्र ठरवणे, खर्चाचा हिशेब व पैसाचे वाटप ठरवणे, बाह्य मदत निर्धारीत करणे आणि प्रकल्पांची प्राथमिकता ठरवणे ह्याबाबत कार्यक्रम समिती स्थायी समितीला मदत करते व सल्ला देते.

**(ग) कार्यगट –**

सार्क अंतर्गत येणाऱ्या कार्यक्रमांना सुदृढ करण्यासाठी कार्यगटांची खास योजना करण्यात आली आहे. सार्क जाहिरनाम्यानुसार कार्यगट विविध प्रकल्पांमध्ये समन्वय राखतात, त्यांच्या प्रस्तावित लक्ष्याच्या पूर्तीवर लक्ष ठेवतात, तसेच योजना कार्यान्वित करण्यासाठी योग्य अशा तांत्रिक सल्ला देणे आणि आर्थिक बाबतीत मार्गदर्शन करणे अशी कार्यगटाची कामे आहेत. सध्या सार्कमध्ये जीवतंत्रज्ञान, उर्जा, माहिती व दूरसंचार तंत्रज्ञान आणि पर्यटन ह्या क्षेत्रात कार्यगट अस्तित्वात आहेत.

**(ह) प्रादेशिक केंद्र –**

हा एक सार्कने स्वीकारलेला अनोखा मार्ग आहे. काही विशेष महत्वाच्या क्षेत्रांसाठी सार्क प्रादेशिक केंद्र स्थापन केले आहेत. ते सर्व संमतीने एखाद्या सदस्य देशात स्थापन केले जातात. त्याचे व्यवस्थापन यजमान देशाचा परराष्ट्र खात्याचा प्रतिनिधीची, सार्कचा महासचिव, सार्कचा एक संचालक आणि सर्व सदस्य देशांच्या प्रत्येकी एक प्रतिनिधींच्या बनलेल्या एका संचालक मंडळाद्वारे केले जाते. सध्या अकरा सार्क केंद्रे कार्यरत आहेत. त्यांची नवे आणि यजमान देश पुढीलप्रमाणे – (१) सार्क कृषी केंद्र (ढाका), सार्क हवामान शास्त्र संशोधन केंद्र (ढाका), सार्क क्षयरोग केंद्र (काठमांडू), सार्क दस्तावेज केंद्र (दिल्ली), सार्क मानव संसाधन विकास केंद्र (इस्लमाबाद), सार्क सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन केंद्र (मालदिव), सार्क माहिती केंद्र (नेपाळ), सार्क उर्जा केंद्र (पाकिस्तान), सार्क आपत्ती व्यवस्थापन केंद्र (भारत), सार्क वनशास्त्र केंद्र (भूतान), सार्क सांस्कृतिक केंद्र (श्रीलंका).

ह्या प्रत्येक केंद्राकडे विशिष्ठ कार्य असून दक्षिण आशियाच्या दृष्टीने प्रत्येक केंद्र महत्वाचे आहे.

**४.१४ सार्कची वाटचाल –**

सार्कच्या स्थापनेनंतर सहकार्यची काही महत्वाची क्षेत्रे निर्धारीत करण्यात आली ती अशी आहेत.

(१) कृषी व ग्रमीण विकास (२) जैव तंत्रज्ञान (३) संस्कृती व क्रिडा (४) शिक्षण (५) उर्जा (६) पर्यावरण (७) वित्त (८) मानव संसाधन विकास (९) माहिती, दूरसंचार व प्रसारमाध्यमे (१०) दारिद्रय निर्मूलन (११) विज्ञान व तंत्रज्ञान (१२) सुरक्षा व कायदेविषय बाबी (१३) सामाजिक विकास (१४) पर्यटन व वाहतूक (१५) व्यापार व अर्थव्यवस्था.

वरील क्षेत्रे दक्षिण आशियातील जीवनाच्या मूलभूत प्रश्नांची निगडीत असून सामाजिक, आर्थिक, वैज्ञानिक, संस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांशी संबंधित आहेत. तसेच ह्या क्षेत्रांचे विषय गैरराजकीय आणि वादमुक्त असून ह्यामुळे त्याबाबतीत भरीव सहकार्य सहज होऊ शकते. ह्या प्रत्येक क्षेत्रात सार्कने विविध योजना व प्रकल्प सुरू सुरू केले आहेत.

सार्कद्वारे काही महत्वाचे करार करण्यात आले आहेत, ते असे –

१) सार्क लवाद परिषद करार
२) सार्क कस्टमविषयक करार
३) सार्क विकासनीधी करार

४) सार्क खाद्याकोष करार
५) सार्क मुक्त व्यापर करार ( SAFTA)
६) सार्क प्रादेशिक मानक आयोग करार
७) सार्क दूहेरी कर निर्मूलन करार

ह्याव्यतिरिक्त काही महत्वाचे करार (Convention) सुध्दा सार्कने केले आहेत. उदाहरणार्थ-
१) शरीर विक्रयासाठी स्त्रीया व मुलांचा व्यापार करण्यास प्रतिबंध करार.
२) बालक विकास वृध्दी करार
३) गुन्हेगारी चौकशीसाठी परस्पर सहकार्य करार
४) दहशतवाद प्रतिबंधक प्रादेशिक करार
५) मादक द्रव्य व अंमली पदार्थाविषयी करार

**सार्कचे आर्थिक व्यवस्थापन आणि निधी संकलन –**

सार्कचे प्रशासन चालविण्यासाठी आणि विविध योजनांकरता निधी उभारण्यासाठी अनेक मार्ग सार्कने अवलंबले आहेत. सदस्य राष्ट्रे ठरवून दिलेल्या प्रमाणात सार्कच्या गंगाजळीत निधी देतात. त्याचबरोबर विविध प्रकल्पांकरता पुढील प्रकारे निधी उभा केला जातो.

(अ) सार्कची स्थापना झाली तेव्हा सार्क प्रादेशिक निधी आणि सार्क प्रादेशिक प्रकल्प निधी असे दोन कोष तयार करण्यात आले होते. १९९६ मध्ये त्यांचे एकत्रिकरण करून दक्षिण आशिया विकास निधी (डअऊऋ) निर्माण करण्यात आला. ह्या निधीद्वारे सार्कचे प्रकल्प, रचनात्मक व मानवसंसाधन विकासाचे प्रकल्प आणि संरचनात्मक विकासाचे प्रकल्प ह्या करता अर्थसहाय्य दिले जाते.

(ब) १९९३ मध्ये जपानशी सार्क संघटनेचा करार होऊन जपानच्या अर्थसहाय्यातून विशेष निधी उभारण्यात आला. त्यातून एक भाग सध्या चालू असलेल्या सार्कच्या विविध प्रकल्पासाठी वापरला जातो आणि दुसरा भाग जपानने ठरवलेल्या क्षेत्रांमध्ये संशोधनात्म कार्य, प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्रे व कार्यशाळा ह्यासाठी वापरला जातो. त्यामध्ये विशेषतः आरोग्य, कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान, दूरसंचार, शिक्षण आणि प्रसारमाध्यमे अशा क्षेत्रांमद्ये कार्यक्रम घेण्यात येतात.

## ४.१५ सार्कची कामगिरी –

१९८५ मध्ये स्थापना झाल्यापासून सार्कने ठरवून दिलेल्या क्षेत्रात आपले कार्य सुरू केले. सार्कने जाणीवपूर्वक वादग्रस्त, द्विपक्षीय व राजकीय स्वरूपाचे मुद्दे बाजूला ठेवले. कारण त्यामुळेच भरीव सहकार्य आजपर्यत होऊ शकले नव्हते.तसेच निर्णयप्रक्रियेत प्रत्येक स्तरावर सर्वसंमती आवश्यक केली आहे. ह्या अटींमुळे सर्वमान्य असे निर्णय घेतले गेले आणि त्यांच्या ांमतबजावणीमध्येही पूर्ण सहकार्य, एकवाक्याता आणि प्रामाणिकता प्राप्त झाली. सार्कच्या नियमावलीतील हे मुद्दे वास्तववादी आणि आवश्यक होते, त्यातून सार्कच्या नेत्यांची दूरदृष्टी आणि प्रगल्भता दिसते. सार्कची आजपर्यतच्या कामगिरीतील ठळक बाबी खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) सार्कमुळे उशीरा का होईना एकमेकांवर अविश्वास असलेले देश प्रथमच एका छत्राखाली एकत्र आले. राजकीय दृष्ट्या अत्यंत स्फोटक स्थिती असलेल्या दक्षिण आशियात आणि विकासाच्या भिन्न टप्प्यावर असलेले हे देश एकत्र आले ही फार मोठी उपलब्धी आहे. एकतेच्या विरोधी कार्य करणारे आणि सहकार्यत अडसर निर्माण करणारे अनेक घटक जोरावर असूनही सामायिक फायद्याची प्रबल इच्छा आणि एकत्र सहकार्य करण्याची तीव्र इच्छा अखेर जास्त प्रभावी ठरली आणि सार्कची स्थापना झाली.

२) दक्षिण आशियामध्ये अर्थव्यवस्थेत परस्पर साध्यर्म आहे आणि आर्थिक समस्याही सारख्याच प्रमाणात भेडसावत आहेत. त्यामुळे सार्कने आर्थिक क्षेत्रात सहकार्याच्या योजना आखल्या त्या महत्त्वाच्या होत्या आणि त्यात सार्कने यशसुध्दा संपादन केले. व्यापार, वित्तीय व्यवस्थापन, चलनविषयक क्षेत्र ह्या मूलभूत क्षेत्रात काही भरीव सहकार्य झाले आहे.

उदाहणार्थ - सार्क मुक्त व्यापार करारांतर्गत (SAFTA) दुहेरी कर आकारणी बंद करण्यात आली, दक्षिण आशियाअंतर्गत व्यापाराला प्रोत्साहन देण्यात आले आणि काही पारंपारिक वस्तूच्या व्यापाराला करमुक्त करण्यात आले, ह्या करारानुसार प्रत्येक सार्क देशाने एकमेकांना 'अत्यानुकुल राष्ट्राचा' (Most Favoured Nation) दर्जा दिला आहे. पाकिस्तानने मात्र भारताला तो दर्जा दिलेला नाही. सार्क देशांच्या योजना आयोग, मध्यवर्ती बँका, ह्यांच्यातही विचारांची देवाण-घेवाण होते. तसेच स्टॉक एकस्चेंजचे अधिकारी, उद्योगपती व व्यापाऱ्यांच्या संघटना ह्यांच्यातही चर्चा होतात. त्यातून काही समान समस्या सोडवण्याचा आणि सहकार्य करण्याचा प्रयत्न होतो.

३) शिक्षण, क्रीडा, संस्कृती आणि प्रसार माध्यमे ह्या क्षेत्रात सार्कने भरीव कार्य केले आहे. दक्षिण आशियामध्ये सांस्कृतिक वैशिष्ट्ये विविध प्रकारची आहेत. त्यामुळे सार्कद्वारे सांस्कृतिक देवाण-घेवाण करण्याच्या पुष्कळ योजना राभवण्यात आल्या. त्यात चित्रपट महोत्सव, कवी-लेखक संमेलन, मुशायरे, नृत्य महोत्सव, खाद्य मेळावे, संगीत मैफिल असे कार्यक्रम आयोजित केले आहेत. दूर-चित्रवाणी व रेडियोवर सार्क प्रश्न मंजूषा, सांस्कृतिक वैशिष्ट्यांवरील माहिती पट असे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. मोठ्या वृत्तपत्रसमूहांच्या संपादकांना दक्षिण आशियात व्हिसामधून सूट देण्यात येते. शिक्षण क्षेत्रात दक्षिण आशिया विद्यापीठ दिल्ली येथे सुरू झाले आहे आणि त्याद्वारे शिष्यवृत्ती आणि शिक्षा वेतनवृत्ती देऊन दक्षिण आशियासंबंधी विषयांवर संशोधन करण्यास प्रोत्साहन दिले जाते. सार्क क्रिडा स्पर्धा व युवक मेळावे आयोजिक केले जातात. पर्यटनाच्या वाढीस आणि सहकार्यस येथे भरपूर वाव असल्याने ग्रुपसहली आयोजित करणे आणि व्हिसाच्या नियमात शिथिलता आणणे असे उपया योजण्यात आले आहेत.

४) विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात दक्षिण आशियाच्या देशांतील सहकार्य फार महत्वाचे आहे. ह्या देशांच्या अर्थव्यवस्थेला पूरक अशा योजना आखण्यात आल्या आहेत. त्यातही अशी क्षेत्रे निवडली आहेत जी दक्षिण आशियातील देशांना जास्तीत जास्त उपयोगी ठरतील.

उदा. सौर उर्जा, जैव-खते, झिंग्यांची मासेमारी, कमी दरातील घरे बांधणी, इलेक्ट्रॉनिक्स, परमाणू जीवशास्त्र, जैवीक इंधन, सांडपाण्यावर प्रक्रिया, प्रदूषण नियंत्रण,

अन्न-प्रक्रिया, रडार तंत्रज्ञान, औषधी व सुगंधी वनस्पतींचे उत्पादन, हवामान तंत्रज्ञान, कीटकनाशके, अपारंपारिक व नवे उर्जास्त्रोत अशा क्षेत्रात सहकार्याच्या योजना सुरू आहेत.

५) लोकसंख्यावाढ आणि आरोग्य हे दक्षिण आशियातील कळीचे प्रश्न आहेत. त्यामुळे त्याबद्दल सार्कने अनेक योजना हाती घेतल्या आहेत. क्षयरोग, मलेरिया, कृष्ठरोग, गॅस्टो, अतिसार, रेबीज, आयोडीन कमतरता, पोलीयो अशा जुन्या आजारांवर सामायिक उपाययोजना सूरू करण्यात आल्या. तसेच एड्स, मधूमेह, कर्करोग अशा नव्या गंभीर रोगावरही सहकार्यच्या योजना आहेत. माता-बालसंगोपन, कुपोषण, गरोदरपणातील मातेची काळजी आणि बालकांचे लसीकरण अशा करता उपक्रम राबवण्यात येत आहेत. महिला आणि मुलींच्या विकासाकरता विशेष लक्ष पुरवण्यात येत आहे. आधुनिक आरोग्य केंद्रद्वारे आणि ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र उभारून आरोग्यसेवांचा विस्तार करण्यात येत आहे. वैद्यकीय पर्यटन हा एक नवीन उपक्रमही सुरू झाला आहे.

६) दक्षिण आशिया हा शेतीप्रधान प्रदेश आहे, परंतु शेतीचे क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. लहरी पर्जन्यावरील अवलंबित्व, नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे नुकसान, जमिनीचा घसरता कस, खते, कीटकनाशके ह्यांचे वाढते दर, जमिनींचे वारसाहक्काने होणारे तुकडे ह्यामुळे शेती नुकसानीची होत असून दारिद्य्र, उपासमार आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा समस्या वाढत आहेत. त्याकरता सार्कने काही महत्वाच्या योजना सुरू केल्या आहेत. त्यामध्ये मुख्य म्हणजे शेतीबद्दल, जमिनीच्या दर्जाबद्दल, पिकांबद्दल, प्रत्येक प्रदेशातील शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीबद्दल आणि तिथे उपयोगी तंत्रज्ञानाबद्दल सार्कने मूलभूत माहिती संकलीत केली आहे. ज्याद्वारे एकमेकांना फायदा होऊ शकतो. कृषी विद्यापीठे व कृषी संशिधन संस्थांद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, पिकांच्या नविन जाती निर्माण करणे, शेतीकरता योग्य असे नवे तंत्रज्ञान विकसित करणे आणि शेतकरी व अधिकारी ह्यांच्यात संवाद वाढवणे असे उपक्रम सुरू आहेत. त्याचबरोबर स्थानिक पातळीवर विकासाच्या योजना आखणे, जनतेचा सहभाग वाढवणे, सामाजिक वनीकरणास प्रोत्साहन देणे, ग्रामीणभागात वीज व पाटबंधारे योजना राबवणे आणि शेतीवर आधारित समांतर व पूरक व्यवसायास प्रोत्साहन देणे असेही उपक्रम सार्कने राबवले आहेत. मुख्य म्हणजे शेती व ग्रामीण विकास हा दक्षिण आशियाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने त्याकडे सार्क प्राधान्याने लक्ष देत आहे.

७) सार्कच्या जाहिरनाम्यानुसार राजकीय व वादग्रस्त विषय कार्यकक्षेच्या बाहेर असले तरी सार्कने दोन अत्यंत धाडसी करार केले आहेत. एक मादक द्रव्य व अंमली पदार्थाच्या प्रतिबंधाचा करार आणि दोन, दहशतवाद विरोधी करार. दक्षिण आशियाला सध्या भेडसावणाऱ्या ह्या दोन गंभीर समस्या आहेत. ह्यांच्याबद्दलच्या ह्या करारांद्वारे सार्कने राजकीय स्वरूपाचे धाडसी पाऊल उचलले आहे, ज्याद्वारे सकारात्मक वातावरण तयार झाले आहे.

## ४.१६ सार्कची क्षमता, भारताची भूमिका आणि मूल्यांकन –

दक्षिण आशियामध्ये विपरीत वातावरणात सार्कची स्थापना झाल्यामुळे फार अपेक्षा उंचावल्या आहेत. सार्कच्याद्वारे सहकार्य वाढवण्यात व ते सदृढ करण्यात अजूनही भरपूर वाव आहे. पूर्ण दक्षिण आशियाला पुरेल इतकी वीजनिर्मिती नद्यांवर धरणे बांधून होऊ शकते. पाटबंधारे योजनांद्वारे शेतीला फायदा होऊ शकतो. दक्षिण आशियांतर्गत खनिज संपत्तीवर आधारीत मूलभूत उद्योग स्थापन केले जाऊ शकतात. उदा. लोखंड, स्टील तसेच ह्या प्रदेशात शेतीमाल, मसाल्याचे पदार्थ, चहा-कॉफी, रबर, फळे इत्यादींचा परस्पर व्यापार वाढू शकतो. युरोपातून आयात करण्यापेक्षा अनेक वस्तूंचा पुरवठ दक्षिण आशियातूनच होऊ शकतो. त्याचप्रमाणे दक्षिण आशियात मुबलक होणाऱ्या मालाची निर्यात प्रदेशाबाहेर सामायिक स्वरूपात होऊन अधिक फायदा मिळू शकतो. ह्या सर्व बाबतीत सार्क अधिक सक्रीय होणे आवश्यक आहे. मुक्त व्यापार करार (SAFTA) अधिक कणखरपणे अंमलात येणे सुध्दा गरजेचे आहे.

सार्कद्वारे दक्षिण आशियातील छोट्या देशांना जागतिक स्तरावर ओळख मिळाली. उदा. मालदिवच्या समुद्रपातळी वाढविण्याच्या समस्येला जगामध्ये वाचा फोडण्याचे काम सार्कने केले. अशाचरीतीने सार्क एकत्रितपणे प्रदेशातील अनेक गंभीर समस्यांबाबत एकजूटीने आंतरराष्ट्रीय पातळीवर आवाज उठवून काही सहाय्य प्राप्त करू शकतो. असेच सहकार्य युनीसेफ, यू एन डी पी, एस्कॅप या संस्थांद्वारे आणि जपान, जर्मनी ह्या देशांकडून प्राप्त झाले आहे. सार्कद्वारे दक्षिण आशियातील राष्ट्रांची जागतिक प्रतिमा उंचावण्यास आणि जगात दबदबा वाढवण्यास भरपूर वाव आहे. अलिप्ततावादाशी बांधिलकी कायम ठेवून जागतिक प्रश्नांवर ठोस भूमिका घेऊन एक गट म्हणून सार्क जागतिक राजकारणात सक्रिय व भरीव भूमिका घेऊ शकतो.

सार्कच्या यशापयशामध्ये भारताची मोठी जबाबदारी आहे. भारताचे स्थान मध्यवर्ती आहे याची त्याला जाणीव आहे. आतापर्यंत चुकीच्या किंवा अतिउत्साही व आदर्शवादी भूमिकेमुळे सहकार्यास खीळ बसली. म्हणून ८० च्या दशकात भारताने सावध भूमिका घेत अन्य देशांना सार्कबद्दल ठोस भूमिका घेण्यास वाव दिला. नंतरच भारताने सार्कला स्वीकारले. त्यानंतरही सार्कच्या अनेक योजनांत भारताने उदार भूमिका घेत निर्णयप्रक्रिया सुकर होण्यास हातभार लावला. भारत-पाकिस्तान तणावाचे संबंध ही प्रमुख्याने सार्कची डोकेदुखी आहे. दोन्ही देश आता अणुतंतज्ञान संपन्न झाल्याने तणाव वाढला आहे. त्यातच भारत-पाक सीमेवर चकमकी होण, भारतात आतंकवादी हल्ले करणे, काश्मीरचा मुद्दा वारंवार उकरून काढणे असे प्रकार पाकिस्तानकडून होतच आहेत. तरीही भारताने संयम राखत चर्चा करण्याची तयारी ठेवली आहे. द्विपक्षीय प्रश्न सार्कच्या आड येऊ नयेत हा भारताचा प्रयत्न असतो. सार्कच्या आतार्पंतच्या वाटचालीत अनेक प्रसंगात भूतान, मालदिव या देशांनी समस्या निवारकाची भूमिका पार पाडली आहे. त्यामुळे छोटे देशही महत्वाची भूमिका पार पाडू शकतात आणि सार्कचे चैतन्य जागृत ठेऊ शकतात. अंतर्गत अशांतता, परस्पर अविश्वास आणि अन्य अनेक अडचणी असूनह सार्क देश एकत्र आले आणि सार्क संघटना टिकली हे फार मोठे यश आहे. सार्कची आजपर्यंतची प्रगती धिम्यागतीची व सावध आहे. फार क्रांतीकारी असे यश त्याला मिळले नाही, पण वास्तविक परिस्थितीचा आढावा घेतल्यास हे मर्यादित यश सुध्द लक्षणीय आहे. सर्व सार्क सदस्यांना 'आपण एकत्र जगलो नाही तर एकएकटे नष्ट होऊ' ह्या सत्याचे भान आहे. परस्पर सहकार्याचे मजबूत करेल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. सार्क देशांमध्ये राजकीय स्थित्यंतरे कशी

होतात, राजकीय स्थैर्य व शांतता किती प्रमाणात नांदते, सैन्य आणि धार्मिक कट्टरवादी किती सक्रिया होतात आणि राजकीय नेते किती समंजस भूमिका घेतात ह्यावर सार्कचे भावितव्य अवलंबून आहे.

## ४.१७ प्रकरणावरील प्रश्न

१) दक्षिण आशियातील समानतेचे घटक स्पष्ट करा.
२) सार्क संघटनेची उद्दिष्ट्ये सांगा.
३) सार्कने राजकीय विषय कार्यकक्षेबाहेर का ठेवले आहेत ?
४) सार्कने शेती व ग्रामीण विकासात राबविलेल्या योजनांची माहिती द्या.
५) सार्कने स्थापन केलेल्या कोणत्याही एका प्रादेशिक केंद्राची माहिती द्या.
६) सार्कने मंजूर केलेल्या दक्षिण आशिया मुक्त व्यापार कराराचे पारिणाम सांगा.

## ४.१८ अधिक वाचनासाठी


१) Kashikar, M.S. : "SAARC : Its Genesis, Development & Prospects"; Himalaya Publishing House, Mumbai, 2000.

२) The SAARC News Letter, SAARC Secretariat, Kathmandu, Relevant Issues.

३) "From SARC to SAARC : A Milestones in the Evolution of Regional Coorperation in South Asia"; SAARC Secretariat, Kathmandu, 1988.

४) Muni, S.D. and Anuradha : "Regional Cooperation in South Asia", National Publishing House, Delhi, 1984.

५) SAARC Summit Declarations, SAARC Secretariat Publication, relevant years.

६) Das, D. K. (ed) : "Policies, Programmes and Prespectives : Study of Regional Coorperation in South Asia"; Deep & Deep Publishers, New Delhi: December-1992: ISBN : 81-7100-389-3.

७) Dev Raj Dahal & Nischal N. Panday (eds.) : "New Life Within SAARC" (2005); Institute of Foreign Affairs (IFA) & Freiedrich-Ebert-Shiftung (FES)

८) Gupta, Anshuman : "SAARC : SAPTA TO SAFTA" (2002); Shipra Publications.

९) E. Sudhakar : “SAARC : Origin, Growth and Future” (1994) Gyan Books Pvt. Ltd.

१०) Sharma, Suman : “India and SAARC”, (2011), Gyan Book Pvt. Ltd.

११) Singh, Sudhir Kumar : “Handbook of SSARC”, (2001), Pentagon Press.

१२) Saurabh, B. C. Uperti : “Strengthening SAARC – Exploring Vistas from Expanded Coopreration” (2012). Pentagon Press.

❖❖❖❖

**नव्या जगाची रचना – अमेरिकेचा साम्राज्यवाद.**

दुसऱ्या महायुध्दात जर्मनी आणि जपानचा पाडाव झाला पण त्याच बरोबर ब्रिटनचा जगभर पसरलेल्या साम्राज्यालाही घरघर लागण्यास सुरूवात झाली. ब्रिटनपाठोपाठ स्पेन, फ्रान्स, पोर्तुगाल, हॉलंड या युरोपिय देशांच्या वर्चस्वाखाली असलेल्या आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि आशिया खंडातली अनेक वसाहती स्वतंत्र्य झाल्या. हे स्वतंत्र देश पुढे आर्थिक मदतीसाठी, राजकीय स्थैर्यासाठी अमेरिका आणि सोव्हिएट युनियन यांच्यात विभागले गेले. दुसऱ्या महायुध्दामुळे अमेरिका एक सशक्त लष्करी – आर्थिक महासत्ता म्हणून उदयास आली. पण त्याचबरोबर सोव्हिएट रशियाही एक महासत्ता म्हणून अमेरिकेच्या राजकीय, आर्थिक, विज्ञान-तंत्रज्ञानाला आव्हान देण्यासाठी उभा राहिला.

दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका एक बलाढ्य लष्करी आणि आर्थिक महासत्ता म्हणून का उदयास आली याची कारणे अमेरिकेच्या इतिहासात, या देशात अंतरंगात दडलेली आहेत.

१८ व्या शतकात अमेरिकेकडे निर्वासितांचा देश म्हणून जरी पाहिले जात असले तरी अमेरिकेच्या सामर्थ्यवादाची झलक अमेरिकन सिव्हिल वॉर, म्हणजे यादवी युध्दात दिसून येतात. अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी यादवी युध्दात देश एकीकरणाच्या लढ्यात अमेरिका भविष्यात एक सामर्थ्यवान देश बनू शकतो याची बीजे रोवली होती. त्यानंतर २० व्या शतकाच्या सुरूवातीस, पहिल्या महायुध्दाच्या काळात अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी अमेरिकेची भूमी मानवी कौशल्याला वाव देणारी, नैसर्गिक साधनसंपत्तीने समृध्द, कारखानदारी, उद्योगांसाठी एक मोठी बाजारपेठ असणारी, कट्टर भांडवलशाहीचा पुरस्कार करणारी, उदारमतवाद-मानवतावाद-लोकशाही मुल्यांची जपवणूक करणारी एक भूमी आहे अशी प्रतिमा तयार केली होती. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात थिओडोर रूझवेल्ट यांनी अमेरिका जगाच्या राजकारणाला वळण देणारी एक लष्करी आणि आर्थिक महासत्ता म्हणून तिचा दबदबा निर्माण केला व या जगावर फक्त अमेरिकाच आपला अंकुश प्रस्थापित करू शकते, असा आत्मविश्वास अमेरिकी सत्ताधार्यांमध्ये, तेथील समाजमनात रूजवला. १९४० च्या काळात वन वर्ल्ड या संकल्पनेभोवती अमेरिकेतील राजकारण फिरू लागले होते. टाइम, लाइफ फॉर्च्युन या लोकप्रिय मासिकांनी अमेरिकन सेंच्युरी या मथळ्याखाली अमेरिकेच्या शक्तीचे गुणगान सुरू केले होते. युरोप अमेरिकेच्या या सामर्ध्यामुळे चारपावले मागे गेला. त्याच्यामुळे दुसऱ्या महायुध्दानंतर युरोपची भांडवलशाही व साम्यवाद अशी सरळ फाळणी झाली. जे अमेरिकेच्या ध्येयधोरणांना, त्यांच्या राजकीय-आर्थिक विचारसरणीला मानणारे होते, जे त्यांच्या लष्करी मदतीचा लाभ घेत होते ते अमेरिकेच्या गोटात (अटलांटिक ब्लॉक) गेले तर उरलेले देश समाजवादी चिवारसरणीच्या प्रभावामुळे सोविएत युनियनच्या (सोविएत ब्लॉक) गटात गेले. जगाची ही विभागणी शीतयुध्दाची सुरूवात होती.

## शीतयुध्दा दरम्यानचे जग

शीतयुध्दाच्या काळात अमेरिका आणि सोविएत युनियन जरी एकमेकांच्या विरोधात उभे असले तरी या दोन्ही देशांदरम्यान थेट असा लष्करी संघर्ष झाला नाही. दोन्ही देश लष्करी दृष्ट्या प्रबळ होते. दोघांकडेही विनाशकारी अशी अणवस्त्रे होती. दोघांमध्ये विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक करण्यात आली होती. यामुळे मनवी जीवनाचा कायापालट करणारे अनेक

महत्वाचे शोध १९४५ ते १९९० या काळात लागले. केवळ विज्ञान-तंत्रज्ञान नव्हे तर साहित्य, चित्रपट, चित्रकला, संगीत या मानवी संस्कृतीला नवे आयाम देणाऱ्या कलांनी जगभर खळबळ उडवून दिली. शीतयुध्दाच्या काळात युरोपने  स्वतःचे सत्व जपण्याचा प्रयत्न केला. हा खंड अमेरिका-सोविएत रशियामध्ये विभागला गेला असला तरी या खंडामध्ये स्वतःची नवी एक अर्थव्यवस्था निर्माण झाली. युरोपियन युनियन कम्युनिटीच्या माध्यमातून युरोपने दोन सत्ताकेंद्रात विभागलेल्या जगामध्ये तिसरे सत्ताकेंद्र उभे केले. शीतयुध्दाचा अभ्यास करणाऱ्या काही विचारवंतराच्या मते शीतयुध्दाचा काळ हा दुहेरी सत्ताकेंद्र असा नव्हता तर तिहेरी होता. हे तिसरे केंद्र आर्थिक दृष्ट्या सक्षम होत गेल्याने शीतयुध्दामुळे निर्माण झालेली दाहकता, अस्थिरता लोप पावत गेली.

शीतयुध्दाच्या काळात जपान या नव्या आर्थिक सत्तेचा उदय झपाट्याने झाला. दुसऱ्या महायुध्दात अणुहल्याने बेचिराख झालेला जपान ७० च्या दशकात एक आर्थिक सत्ता म्हणून उद्यास आला. १९५३ ते १९६० या काळात जपानचा आर्थिक विकास दर ९.१ टक्क्यांपर्यत होता तर अमेरिकेचा ३.२ टक्के होता. जपानने लष्करी सामर्थ्यावर खर्च न करता देशी उद्योगांना प्रोत्साहन दिले. अनेक नव्या इलेक्ट्रॉनिक्स उद्योगांची पाया भरणी या काळात झाली.

शीतयुध्दांच्या काळात चीन आणि भारत या दोन आशियाई देशांनी जाणीवपूर्वक स्वतःला आलिप्त ठेवले. भारत तर या काळात अलिप्तता चळवळीचे नेतृत्व करत होता. चीनने आपल्या देशीय बाजारपेठेकडे अधिक लक्ष्य दिले. या दोघांनी स्वतःच्या राजकीय आणि आर्थिक सामर्थ्याकडे लक्ष दिल्याने हे देश पुढे आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करू लागले.

शीतयुध्दाच्या काळात अमेरिकेला कोरिया आणि व्हिएतनाम युध्दात नामुष्की पत्करावी लागली तरीही अमेरिका एक सशक्त लष्करी आणि आर्थिक महासत्त म्हणून अधिक वेगाने विकसित होऊ लागली. अमेरिका या काळात जगातला सर्वात मोठा आयातदार देश बनला तेवढाच तो परदेशी गुंतवणुकीसाठी अगरक्रमाचा देश बनला. परदेशी गुंतवणकीच्या प्रचंड ओघामुळे अमेरिकेत बलाढ्य अशा कॉर्पोरेट कंपन्यांचा उदय झाला. या कंपन्या पुढे जगाच्या अर्थकारणावर राज्य करणाऱ्या नव्या आर्थिक शक्ति झाल्या. अमेरिकेचा वाढलेला आर्थिक साम्राज्यवाद हे शीतयुध्दामुळे आहे हे लक्षात घेतले पाहिजे. अमेरिकेत या काळात प्रचंड विविध शास्त्रीय शाखामध्ये, वाणिज्य, कला, इंजिनिअरिंग क्षेत्रात मूलभूत संशोधन झाले. अनेक नवी विद्यापीठे उद्यास आली. या विद्यापीठांमध्ये शिकवणारा व शिकणारा एक वर्ग बुध्दीमान होता. या विद्यापीठांमधील शिक्षणाचा दर्जा अत्युत्तम असल्याने संपूर्ण जगातील बुध्दीमान मुले, शिक्षक अमेरिकेकडे वळले. ते अमेरिकेत स्थायिक झाले. त्या देशाचे नागरिक झाले. अमेरिकेची अशी सर्वच क्षेत्रातील भरारी व्यापार उदीमांमध्येही दिसू लागली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ), जागतिक बँक (वर्ल्ड बँक) यांच्यावर अमेरिकेचे नियंत्रण आले. अमेरिकेचे डॉलर हे चलन आंतरराष्ट्रीय विनियमाचे साधन बनले. अमेरिका विकसनशील राष्ट्रांना कर्जपुरवठा करणारा एक बडा सावकार देश बनला. अमेरिकेत तयार होणारे कोट्यावधी अन्न गरीब देशांना मदत म्हणून दिले जाऊ लागले. पण अमेरिकेच्या या साम्राज्याला शीतयुध्द समाप्तीनंतर धक्के बसू लागले.

## शीतयुध्दानंतरची जगाची रचना

१९८९ साली बर्लिनची भिंत कोसळल्यानंतर शीतयुध्दामुळे निर्माण झालेली तटबंदी कोसळण्यास सुरूवात झाली ही तटबंदी १९९२ मध्ये सोविएत रशियाच्या पतनानंतर कायमची जमीनदोस्त झाली. सोविएत युनियनच्या पाडावामुळे त्यांच्या वर्चस्वाखाली असलेल्या पूर्व युरोपीय देशांमध्ये लोकशाही उठाव झाले व पूर्व-पश्चिम युरोप यामधील तणाव नाहीसा झाला. तर अमेरिका ही जगातील एकमेव महासत्ता म्हणून कायम राहिली. तिसऱ्या जगामध्ये आधुनिकीकरणाचे वारे वाहू लागले. पूर्वाश्रमीच्या सोविएट युनियनमधील आर्मेनिया – अझरबैजान या प्रांतादरम्यान सीमावादामुळे तणाव निर्माण झाला तर चेचन्यात यादवी सदृष्य परिस्थिती निर्माण झाली. तिसऱ्या जगातील भारत, श्रीलंका, सुदान या देशांमध्ये फुटीरतावादी चळवळींना जोर आला. दहशतवाद, वांशिक संघर्ष, धार्मिक कट्टरतावाद यांना शीतयुध्दाच्या समाप्तीमुळे जोर आला. या कालावधीत अमेरिकेचे पर्शियनच्या आखात वर्चस्व प्रस्थापित झाले. त्यामुळे अमेरिका इराण, सीरिया व त्यांच्या शत्रू राष्ट्रांवर वचक ठेवू लागला. अमेरिकेने जपानला लष्करी मदत दिल्याने अमेरिकेचा अप्रत्यक्षपणे चीनवर लक्ष राहिले. अमेरिकेने पुढे १९९१ मध्ये कुवेतवरील इराकच्या आक्रमणावरून आखातात आपले अधिकृतरित्या पाय रोवले. पण शीतयुध्दामुळे अमेरिका जरी महासत्ता म्हणून पुढे आली तरी त्याचवेळी चीन, जपान, युरोप, रशिया हेही अमेरिकेला शह देणाऱ्या सत्ता उद्यास आल्या. जगावर एकाचे वर्चस्व राहिले नाही तर अनेक केंद्रांचे म्हणजे बहुकेंद्रीय झाले.

## शीतयुध्दाच्या समाप्तीमुळे झालेले परिणाम

१) शीतयुध्दाच्या समाप्तीमुळे जागिकीकरणाला गती मिळाली जग एका नव्या व्यवस्थेकडे वाटचाल करू लागले. या व्यवस्थेत लष्करी सत्तेएवजी, साम्राज्यवादाऐवजी आर्थिक घडामोडींना अधिक महत्व प्राप्त झाले. जागतिकीकरणाच्या प्रवाहात उतरलेले देश एकमेकांशी सौहार्दाचे संबंध स्थापन करण्यासाठी प्रयत्न करू लागले. जगामध्ये आता केवळ अमेरिका नव्हे तर युरोप, रशिया, जपान, चीन या सत्ता उद्यास आल्या. आंतररष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचे बलाढ्य असे स्थान कमी झाले व जग बहुकेंद्री झाले.

२) शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर दळणवळण क्षेत्रातही क्रांती झाली. जागतिकीकरणाला वेग मिळण्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे दळणवळण होय.

३) अणुप्रसारबंदी, पर्यावरण, लोकसंख्या विस्फोट, ऊर्जा, आर्थिक सहकार्य हे मुद्दे आता केवळ दोन देशांदरम्यान किंवा एखाद्या खंडामधील राहिले नाहीत तर ते सामुदायिक पातळीवर सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले.

४) शीतयुध्दाच्या समाप्तीमुळे जग ही एक मोठी बाजारपेठ बनली. वस्तू आणि सेवा हा जगाच्या अर्थकारणाचा परवलीचा शब्द बनला. विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था खुल्या झाल्याने परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढू लागला.

५) शीतयुध्दाच्या समात्पीमुळे अर्थकारणाला गती मिळाली असली तरी वांशिक दंगली, हिंसाचार, धर्मावर आधारित दहशतवाद, कट्टरतावाद यांना बळ मिळाले. दहशतवाद ही समस्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाची होऊ लागली.

## जागिक रंगमंचावर आशियाई देशांचा प्रवेश

शीतयुध्दाच्या काळात ७० च्या दशकात जपानने प्रगतीची कास धरल्याने त्यांचे राष्ट्रीय सकल उत्पन्न एकूण जर्मनी एवढे होते. १९८० च्या दशकात जपान वाहनउद्योग उत्पादनात प्रथम क्रमांकावर होता व हा देश जगातील तिसरी महत्वाची आर्थिक महासत्ता बनला. पण जपानबरोबर दक्षिण कोरिया, तैवान, हाँगकँग, सिंगापूर, मलेशिया, थायलंड, इंडोनिशिया या आशियाई देशांनीही आर्थिक प्रगतीच्यादृष्टीने वाटचाल सुरू केली. चीनमध्ये डेंग यांच्या कारकिर्दी आर्थिक सुधारणा कार्यक्रम झपाट्याने सुरू झाला. चीनची बाजारपेठ परकीय गुंतवणुकीला मोकळी झाली. केवळ ३० वर्षाच्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमात चीनमधील दरडोई उत्पन्नात आठपटीने वाढ झाली आणि या देशाने जागतिक अर्थकारणात अमेरिकेला टक्कर देण्यास सुरूवात केली. भारतानेही ९० च्या दशकात आर्थिक सुधारणा कार्यक्रम हाती घेतल्याने देशाच्या आर्थिक प्रगतीला वेग आला. देशात आलेल्या आयटी क्रांतीने पुढे जगाच्या आयटी क्रांतीवर स्वतःचा ठसा उमटवलं. भारत हा जगाच्या आयटी इडस्ट्रीचे बॅक ऑफिस बनले. अमेरिकन व युरोपीयन कंपन्यांची आऊटसोर्सिगची कामे भारतातून केली जाऊ लागली. चीन औद्योगिक उत्पादनात अग्रेसर झाला तर भारत सेवा क्षेत्रात प्रगती करू लागला. चीन आणि भारताच्या अर्थव्यवस्था वेगाने घोडदौड करत असल्याने युरोपीय आणि अमेरिकी कंपन्यांनी बरीचशी गुंतवणूक या दोन देशांमध्ये करण्यास सुरूवात केली. त्यामुळे अमेरिकी आणि युरोपिय बाजारपेठांमध्ये अस्थिरता निर्माण झाली. तेथे रोजगाराचे प्रश्न उपस्थित होऊ लागले. स्वस्त मालाच्या आगमनाने विकसित देशांच्या बाजारपेठांमध्ये किंमत युध्द पेटले. चीन आणि भारत या दोन देशांच्या आर्थिक प्रगतीला वेग देण्यात एक घटक कारणीभूत ठरला तो म्हणजे मध्यमवर्गाचा उदय. मुक्त अर्थव्यवस्थेची कास धरल्याने नव्या आर्थिक संधी निर्माण झाल्या आणि रोजगार निर्मिती योऊन चीन आणि भारतामध्ये मध्यमवर्गाची संख्या झपाट्याने वाढू लागली. या वर्गाच्या अपेक्षा वाढल्या. त्यांच्यामध्ये सृजनशक्ती वाढली. या वर्गाने तंत्रज्ञानाल आत्मसात केल्याने या वर्गाचे जीवनमानही बदलले. पण उदारीकरणामुळे सामाजिक विषमताही तितकीच वाढली. लोकसंख्या वाढीचे प्रमाण घसरले असले तरी या दोन्ही देशांमध्ये गरीबीचे प्रमाण आजही अधिक आहे.

## आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा उगम

शीतयुध्दाच्या काळात दहशतवाद हा भौगोलिकदृष्ट्या मर्यादित होता. ब्रिटनमधील आयरीश रिपब्लिकन आर्मीचा दहशतवाद, भारतामध्ये स्वतंत्र्य खलिस्तान राष्ट्रासाठी निर्माण करण्यात आलेला दहशतवाद, श्रीलंकेतील तामिळ अस्मितेच्या रूपातून आलेले तामिळी दहशतवाद, अरब राष्ट्रांमधील इस्त्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष, लेबनॉनमधील ख्रिश्चन-मुस्लिम संघर्ष हे राजकीय-सामाजिक-धार्मिक असंतोषातून निर्माण झालेले संघर्ष होते. त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप आलेले नव्हते. पण २००१ साली न्यूयॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर अल-काइदा या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेने केलेला हल्ला ही आंतरराष्ट्रीय दहशतवादाची ठळक घटना होती. कारण हा हल्ला करण्यासाठी अल-काइदाने इजिप्त, सौदी अरेबिया, येनेन,

लेबनॉन या अरब राष्ट्रांमधून दहशतवादी एकत्र केले होते. त्यांना दहशती कारवायांचे प्रशिक्षण दिले होते. ८०-९० च्या दशकात अमेरिकेने अरब राष्ट्रांमधील राजवटी उलथवण्याचे प्रयत्न केले होते. त्यामुळे अमेरिकेच्या विरोधात पॅलेस्टाईन, लिबिया, इराक, इराण, अफगाणिस्तान, सुदान या इस्लामी राष्ट्रांमधून दहशतवादाला पोषक अशा स्थानिक संघटना उदयास येऊ लागल्या. या संघटनांचा एक आंतरराष्ट्री गट स्थापन झाला त्याचे नेतृत्व सौदी अरेबियातील एका श्रीमंत कंत्राटदाराने पत्करले. त्याचे नाव ओसामा बिन लादेन.

१९९२ मध्ये इराकवर हल्ला करण्याच्या निमित्ताने अमेरिकेचे आखाती देशांमध्ये पाय अदिक रोवले गेले. एकीकडे आंतरराष्ट्रीय तेलबाजारावर त्यांना नियंत्रण हवे होते तर दुसरीकडे त्यांना अरब राष्ट्रांच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करायचा होता. ८० च्या दशकात इराणमध्ये इस्लामी क्रांती आल्यानंतर अमेरिकेला शह बसला होता. तर दहा वर्षाच्या कालखंडानंतर अमेरिकेला इराकचा सर्वेसर्वा सद्दाम हुसेनही वरचढ वाटू लागला. १९९२ मध्ये अमेरिकेने अफगाणिस्तान युध्द जिंकल्याने संपूर्ण अरब जगतामध्ये भारतीय उपखंडांमध्ये प्रचंड अस्थिरता निर्माण झाली. या अस्थिरतेमुळे अल-काइदा ही कडवी दहशतवादी संघटना व तालिबान दहशतवादाचा वेगाने विस्तार झाला. पुढे २१ वे शतक उजाडेपर्यंत अमेरिकेचा दबदबा कायम होता पण या देशाविरोधात असंतोष कमालीचा वाढला होता. २००१ मध्ये न्यूयॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला करून अल-काइदाने अमेरिकेच्या सामर्थ्याचा मानबिंदू जमीनदोस्त केला. या हल्ल्यानंतर तत्कालिन  अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी अमेरिकी जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात 'ते आणि आम्ही' अशी विभागणी केली. बुश यांचे दहशतवादाविरोधातली हे धोरण पुढे आंतरराष्ट्रीय दहशतवादाला बळ देणारे ठरले. ज्या अमेरिकी लष्कर साम्रगीवर अरब राष्ट्रे पोसली गेली होती ती शस्त्रास्त्रे दहशतवाद्यांच्या हातात आली. अमेरिकेचे लष्कर सामर्थ्याचा मुकाबला करण्यासाठी प्रत्यक्ष युध्द नव्हे तर दहशतवादी मार्ग, गनिमी कावाच उपयोगी येऊ शकतो हे दहशतवादी संघटनांनी जोखले आणि जग आंतरराष्ट्रीय दहशतवाद्याच्या वणव्यात लोटले गेले.

बुश यांचे दहशतवादाविरोधातील ते आणि आम्ही हे धोरण पुढे अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांना पचनी पडले नाही. फ्रान्स, जर्मनी या युरोपीयन देशांनी अमेरिकेच्या भूमिकेपासून स्वतःला वेगळे ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला. अमेरिकेच्या दादागिरीला हा एकप्रकारे कडवा आणि वैचारिक विरोध होता. अमेरिकेच्या तिजोरीवरही इराक-अफगाण युध्दांचा बोजा वाढल्याने अमेरिकेची आर्थिक स्थिती ढासळू लागली.

अमेरिकी जनमतही पुढेपुढे बुश यांच्या धोरणाविरोधात जाऊ लागले. त्याचा फटका त्यांना २००८ च्या अध्यक्षीय निवडणुकीत बसला. अरब राष्ट्रांमध्ये अमरेकिच्या विरोधात असंतोष वाढू लागला. अमेरिकेने इराकमध्ये लोकशाही स्थापन करण्याचे प्रयत्न केले पण ते त्यांना जमले नाहीत. हा बुश यांच्या धोरणाचा परिणाम होता. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरोधात अमेरिकेने सुरू केलेली ही लढाई पुढे व्यापक झाली नाही. उलट या लढ्याने अधिक दहशतवादी निर्माण केले. जगभर भयाचे, दहशतीचे वातावरण पसरले. अरब जगतात ट्युनिशिया, येमेन, इजिप्त येथे झालेली लोकशाही आंदोलने ही केवळ सत्ताधार्याच्या भ्रष्टाचारविरोधात नव्हती तर ती भयमुक्त विचारसरणीची मागणी करणारी होती. अरब जनतेने दुसऱ्या महायुध्दापासून राजकीय अस्थिरता अनुभवली असून त्यांनाही दहशतवादाची मोठ्या प्रमाणात झळ बसली आहे.

इस्लामी कट्टरतावादामुळे तर सर्वसामान्यांचे आयुष्य ढवळून निघाल्याने जनता लोकशाही, सेक्युलर मूल्यांसाठी अधिक आक्रमाक झाली व तिने प्रस्थापितांच्या विरोधात बंड पुकारले.

## नव्या विश्वरचनेत भारताचे स्थान

शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचे एक महासत्ता म्हणून महत्व कमी झालेले नसले तरी आशिया खंडातील भारत आणि चीन या नवमहासत्ता आर्थिक विकासाच्या जोरावर अमेरिकेला आव्हान देणाऱ्या ठरू लागल्या आहेत. भारताने तर ९१ च्या उदारीकरणाच्या पर्वात प्रवेश केल्यानंतर औद्योगिक, व्यापार, कृषी, विज्ञान, अवकाश, तंत्रज्ञान, अणुशक्ती, संरक्षण, मानवी साधनसंपत्ती या मध्ये उल्लेखनीय प्रगती केली. ही प्रगती साधत असताना भारताने शेजारी देशांशी शांतता-सौहार्दाचे संबंध राखले. पाकिस्तानशी भारताचे तणावाचे संबंध (कारघील युध्द, पाकपुरस्कृत दहशतवाद ) असले तरी उदारीकरणाच्या या वर्षामध्ये भारताने मोठे युध्द करण्याची चूक केलेली नाही. भारतीय उपखंडात दहशतवाद ही समस्या पाकिस्तानने रूजवली असली तरी खुध्द पाकिस्तान आता या समस्येचा बळी पडतना दिसत आहे. शेजारील बांग्लादेशही धार्मिक कट्टरतावादाच्या विरोधात आपली सेक्युलर फळी अधिक घट्ट करत आहे. श्रीलंकेत तामिळ दहशतवाद कायमचा संपुष्टात येऊन भारत-श्रीलंका यांच्यामधील संबंधांमधील कटुता कमी झालेली आहे. त्यामुळे भारताचे महत्व कमी न होता ते अधिक व्यापक झाले आहे. भारताने स्वतःचे सामर्थ्य वाढवल्याने संयुक्त राष्ट्रांमध्ये कायमचे सदस्यत्व मिळावे म्हणून भारताचे लॉबिंग अन्य देशांकडून केले जात आहे.

उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा फायदा घेत भारताने स्वतःची बाजारपेठ विकसित केल्याने भारत आज जी-२० देशांचा एक प्रमुख घटक बनला आहे. त्याचबरोबर दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांच्या आशियान या संघटनेत एक जबाबदार क्षत्रीय सहकारी म्हणून भारत महत्वाची कामगिरी बजावत आहे. आशियान देशांच्या गटात केवळ आर्थिक नव्हे तर विभागीय प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न केले जातात. त्यामुळे संरक्षण मुद्यावर बरेचसे ताणतणाव चर्चेद्वारे सोडवले जातात. दुसरीकडे सार्क या दक्षिण आशियाई संघटनेच्या माध्यमातून गरीबी आणि बेकारी हटवण्याचे प्रयत्न केले जात आहे. सार्क राष्ट्रांची आर्थिक सहकार्यातील प्रगती मंदगतीने असली तरी या संघटनेची उद्दीष्टे समान असल्याने या राष्ट्रांमध्ये फारसा संघर्ष उडतना दिसत नाही.

## शीतयुध्दानंतरची नवी विश्वरचना

शीतयुध्द संपेपर्यंत संयुक्त राष्ट्र संघाची भूमिका ही बरीचशी बोटचेपी अशी होती. कारण या संघटनेच्या सुरक्षा समितीवर असणाऱ्या अमेरिका आणि पूर्वाश्रमीच्या सोव्हिएट युनियनने नकाराधिकाराचा (व्हेटो) अनेक वेळा वापर करून सत्तासमतोलाचे राजकारण खेळले होते. पण सोव्हिएट युनियनच्या पतनानंतर रशियाचे नकाराधिकार कायम राहिला पण त्याचे महत्व कमी झाले. संयुक्त राष्ट्र संघटनेनेही जागतिकीकरणाची पावले आोळखून आपली आंतरराष्ट्रीय भूमिकाही बदलण्यास सुरूवात केली. आंतरराष्ट्रीय शांतता, आर्थिक सहकार्य, गरीबी निर्मूलन, सामाजिक विषमतेवर प्रहार, पर्यावरण संवर्धन, लोकशाही मूल्यांचा प्रसार, राजकीय स्थिरता, मानवी हक्कांचे संरक्षण अशा भूमिकांवर संयुक्त राष्ट्र संघ आंतरराष्ट्रीय राजकारणात सक्रीय झाला. संयुक्त राष्ट्राने विविध आफ्रिकन, युरोपीयन, दक्षिण अमेरिका, आशिया खंडात राजकीय

स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी, यादवी-वांशिक संघर्षातून तोडगा काढण्यासाठी शांती सैन्याची राजकीयदृष्ट्या अस्थिर देशांमध्ये पाठवणी केली. संयुक्त राष्ट्राच्या या भूमिकेमुळे यादवीने पोळून गेलेल्या रवांडा, सोमालिया, इथिओपिया, इस्ट तिमोर, श्रीलंका, बोस्निया, सर्बिया, कांगो, नायजेर, कॉस्टारिका अशा अनेक देशांमध्ये मानवतावादी कार्य पार पडण्यास मदत झाली. युध्द गुन्हेगारांवर खटले भरण्यात आले. मानवाधिकारांचे उल्लंखन रोखण्याचे प्रयत्न झाले. युध्दग्रस्त देशांमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आरोग्य पथकाने उल्लेखनीय कामगिरीही पार पाडली. अमेरिकेच्या वाढत्या एकाधिकारशाहीला थांबवण्यासाठी संयुक्त राष्ट्रांचे प्रयत्न फार मोलाचे ठरत आहेत.

नव्या विश्वरचनेत जशी संयुक्त राष्ट्रांची भूमिका महत्वाची ठरत आहेत तसे विविध व्यापारसंघांच्या उदयामुळे केवळ आर्थिक व्यापार नव्हे तर मानवी साधनसंपत्तीची आयात-निर्यात सुरू झाली. तर शीतयुध्दाच्या काळात शस्त्रांस्त्रांचा होणारा व्यापार हा शीतयुध्द समाप्तीनंतर अधिक पटीने वाढला. यामध्ये अणुतंत्रज्ञानाची चोरटी आयात होती. दहशतवाद्यांना दिला जाणारा शस्त्रास्त्रसाठा होता. शिवाय आशिया खंडातील चीन-भारत-पाकिस्तानमध्ये क्षेपणास्त्र विकासाचे अब्जावधी डॉलर गुंतवणूकीचे संशिधन सुरू झाले. एकापरीने शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर आशियाखंडातील शस्त्रास्त्र स्पर्धेने जोर धरला. आर्थिक आघाडीवर युरोपियन महासंघ, आशियान, नाफ्टा, सार्क एपेक, आफ्रिकन महासंघ, जी-७, जी-२०, जी-७७ असे आर्थिक महासंघ सक्रीय झाले. व्यापारवृध्दी, आर्थिक सहकार्य, आंतरराष्ट्रीय शांतता अशा मुद्यांवर या महासंघाच्या दरवर्षी बैठका होत असतात. या महासंघाच्या सक्रीय भूमिकेमुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला. जागतिकीकरणामुळे राष्ट्रांचे परस्परावलंबित्व वाढले. ते इतके वाढले की, २००८ मध्ये अमेरिकेत आलेल्या मंदीचा फटका ग्रीस, इटाली, जर्मनी, ब्रिटन या देशांना बसला. चीनलाही काही काळ मंदीला सामोरे जावे लागले. भारतीय अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत अडकली नाही पण तिच्या काही उद्योगांना मंदीची झळ बसत आहे.

जागतिकीकरणात एक मोठा बदल असा झाला की, बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे अर्थव्यवस्थेचे नियंत्रण जाऊ लागले. उदारीकरणात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जोरदार मुसंडी मारल्याने क्रोनी कॅपिटॅलिझम वेगाने पसरू लागला. अमेरिकेत २००८ मध्ये आलेली मंदी ही क्रोनी कॅपिटॅलिझमचा एक भाग आहे. भारतात झालेले आर्थिक घोटाळे हेही अशाच भांडवलशाहीचा भाग आहे.

❖❖❖❖

**भारत-रशिया संबंध**

१९९१ मध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन झाल्यानंतर या खंडप्राय व विशाल देशामधून १५ स्वतंत्र राष्ट्रे जन्मास आली. ही राज्ये म्हणजे स्लाव्हिक गणराज्ये – (रशियन संघराज्य, बेलारूस), बल्टिक गणराज्ये (लिथुआनिया, लाटव्हिया, इस्टोनिया), कॉकेशियन गणराज्ये (जॉर्जिया, आर्मेनिया, अझरबैजान), मध्य आशियाई गणराज्ये (तुर्कमेनिस्तान, कझाकस्तान, किरगीझस्तान, उझबेकीस्तान, ताजिकीस्तान), रोमॅनियन भाषिक गणराज्ये (माल्डोवा) अशी आहेत. या १५ स्वतंत्र राष्ट्रांची स्वतःची स्वतंत्र आर्थिक-परराष्ट्रीय-राजकीय धोरणे आहेत. शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर या देशांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात, जागतिकीकरणाच्या प्रक्रियत, आर्थिक सहकार्य, शांतताकार्य, ऊर्जा संवर्धन, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून स्वतःचे वेगळे अस्तित्व ठेवले. या सर्व देशांशी भारताने मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले आहेत पण भारत-रशिया संबंधांना इतिहासाची व्यापक पार्श्वभूमी आहे, शीतयुध्दाचे गडद नेपथ्य आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर रशियातील कम्युनिस्ट क्रांतीच्या विचारसरणीचा मोठा प्रभाव होता. रशियातील समाजवादी प्रयोगाचे पं. नेहरूंना आकर्षण होते. नेहरूंना अभिप्रेत असलेला समाजवाद, पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून त्यांनी भारतात हाती घेतलेला आर्थिक कार्यक्रम, अवजड उद्योगांची उभारणी या मागे रशियन धोरणांचा प्रभाव होता. दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका आणि सोव्हिएत युनियन असे दोन गट पडले असताना आणि प्रत्यक्ष जगाची विभागणी झाली असताना नेहरूंनी कोणत्याही गटात सहभागी न होता अलिप्तवादी धोरणाचा स्वीकार केला. पण हे करत असताना त्यांनी १९५५ मध्ये सोव्हिएत युनियन बरोबर मैत्री आणि सहकार्याचा करार केला. या ऐतिहासिक करारामुळे शीतयुध्दाच्या काळात भारताला शीतयुध्दाची प्रत्यक्ष झळ बसली नाही उलट भारताच्या अवकाश कार्यक्रमात, ओद्योगिक प्रगतीत, सामरिक सामर्थ्य उभे करण्यासाठी सोव्हिएत रशियाने नेहमीच मदत केली. शीतयुध्दाच्या काळात भारत-सोव्हिएत रशिया मैत्रीमुळे अमेरिकेचा भारतीय उपखंडाच्या राजकारणातील हस्तक्षेपाला शह प्राप्त झाला होता. १९७१ मध्ये पाकिस्तानशी संघर्ष उभा असताना आणि अमेरिकेची पाकिस्तानला मदत असताना तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सोव्हिएत युनियनशी पुन्हा शांतता आणि मैत्रीचा करार करून राजकारण बदलून टाकले होते. या करारामुळे भारत हा सोव्हिएत युनियनचा एक खांदा पाठिराखा झाल्याचा स्पष्ट संकेत आंतरराष्ट्रीय राजकारणात गेले. तर दुसरीकडे या करारामुळे भारताच्या संरक्षणाची अप्रत्यक्ष जबाबदारी सोव्हिएत युनियनने स्वीकारली असाही संदेश जगभरात गेला. त्याचे प्रत्यंतर १९७१ च्या पाकिस्तानाविरूध्द बांगलादेश मुक्ती युध्दात दिसून आले. त्या अगोदर क्रुश्चेव्ह यांच्या कारकिर्दीत सोव्हिएत युनियनने काश्मीरप्रश्नाविषयी व गोव्याच्या मुद्यावर भारताच्या भूमिकेला समर्थन दिले होते. भारताची सोव्हिएत रशियाशी असलेले जवळीक ही चीनच्या दृष्टीने चिंतेची बाब होती. कारण १९६२ च्या चीनविरूध्दच्या युध्दात सोव्हिएत युनियने भारताला सर्व लष्करी व आर्थिक मदत देऊ केली होती. सोव्हिएत युनियनचे स्वतःचे समावाद चीनशी होते. त्यामुळे सत्तासमतोलाच्या दृष्टीने सोव्हिएत युनियनने नेहमीच भारताची बाजू घेण्याची धोरण अंगिकारले होते. शीतयुध्द समाप्तीपर्यंत म्हणजे नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कारकिर्दी पर्यंत बारताचे सोव्हिएत युनियशी मैत्रीचे आणि सौहार्दाचे संबंध राहिले होते. सोव्हिएत युनियनने १९७९ मध्ये अफगाणिस्तानात फौजा घुसवल्यानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. कारण सोव्हिएत रशियाची ही चाल प्रत्यक्ष महायुध्दास कारणीभूत ठरली असती. या गंभीर प्रसंगात बहुसंख्य देश सोव्हिएत रशियाच्या विरोधात असताना भारताने मात्र

त्याला विरोध केला नाही. भारताची सोव्हिएत युनियनविषयीची मैत्रीची कटिबध्दता उभय देशांमधील संबंधांचा एक परिपाक होता. पण खुद्द सोव्हिएत युनियनचे विघटन झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेपथ्यच बदलून गेले. अमेरिका ही जगातील एकमेव लष्करी व आर्थिक महासत्ता म्हणून प्रस्थापित झाली शिवाय सोव्हिएत रशियाच्या गटातील अनेक पूर्व युरोपिय देश अमेरिकेच्या वर्चस्वाखाली आले. प्रभावाखाली आले. सोव्हिएत युनियमधून १५ नवे देश फुटल्यानंतर उरलेल्या रशियाची आर्थिक परिस्थिती विदारक झाली होती. त्यामुळे भारत आणि रशिया संबंधात फारसे विधायक असे काही संबंध प्रस्थापित झाले नाहीत. रशिया उलट अमेरिका आणि युरोपिय देशांच्या मदतीची अपेक्षा करत होता. रशियाला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व विश्व बँकेने मदतीचा हात दिला पण या दोन्ही संस्था अमेरिका धार्जिण्या असल्याने रशियाची परिस्थिती अधिक बिकट झाली. पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत युनियनमधील कझाकीस्तान, उझबेकीस्तान या मध्य आशियातील देशांनी स्वतःच्या भौगोलिक साधनसंपत्तीचा पुरेपुर वापर करण्यास सुरूवात केली. या देशांकडे पेट्रोलजन्य पदार्थ, भूगर्भ वायू व खनिज संपत्ती मोठ्या प्रमाणात असल्याने अमेरिका आणि युरोपीयन देशांनी मध्य आशियांच्या राजकारणावर स्वतःचा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न सुरू केला. अमेरिकेने १९९४ मध्ये नाटो विस्ताराची एक योजना बनवून युरोपीय देश व मध्य आशियातील देशांना त्यामध्ये सामील करून घेण्याचे ठरवले. अमेरिकेची ही चाल थेट रशियाला आव्हान देणारी होती.

पण शीतयुध्द संपल्याचा एक फायदा रशियाला झाला. जागतिकीकरण-उदारीकरणाला वेग आल्यामुळे रशियाची अर्थव्यवस्था सावरू लागली व एकदा अर्थव्यवस्थेची घडी नीट बदल्यानंतर रशियाच्या परराष्ट्र धोरणातही आमूलाग्र, काळानुरूप बदल होऊ लागले. रशियाने आपल्या जुन्या मित्रांना महत्व देण्यास सुरूवात केली. त्यांच्याशी व्यापारी-लष्करी-आर्थिक करार केले. रशियाचे माजी परराष्ट्रमंत्री आणि माजी पंतप्रधान प्रिमाकॉव्ह यांनी १९९४ मध्ये बहुध्रुवीय विश्वरचनेच्या दृष्टीकोनातून भारत-रशिया-चीन अशी युतीची कल्पना मांडली. हे प्रिमाकॉव्ह तत्व प्रत्यक्षात अमलात आले नाही. पण अशा संरचनेमुळे अमेरिकेच्या एकधिकारशाहीला चाप बसू शकतो असे संकेतही जगामध्ये गेले. प्रिमाकॉव्ह यांनी भारताबरोबरच्या मैत्रीवर भर दिला. त्यांनी उभय देशांच्या संरक्षण क्षेत्रातील करारांनाही नव्याने उजाळा दिला. १९९४ मध्ये त्यांनी सहा वर्षे कालावधीची विशेष योजना आखली. या योजनेनुसार भारत रशियाकडून १५ अब्ज अमेरिकी डॉलर किंमतीची शस्त्रास्त्रांची खरेदी, मिग-२१ लढाऊ विमानांचा दर्जा उंचावणे, एसयू-३० जातीच्या लढाऊ विमानाचा संयुक्त विकास, संरक्षण तंत्रज्ञानाचे हस्तांतरण, क्षेपणास्त्राविरोधी संरक्षणयंत्रणांची खरेदी, अत्याधुनिक टी-९० रणगाड्यांची खरेदी, लढाऊ हेलिकॉप्टर, विमानवाहू नौका, पाणबुडी तंत्रज्ञान या संदर्भात उभय देशांमध्ये करार करण्यात आले. संरक्षणाव्यतिरिक्त रशियाने वीज, तेल, कोळसा, पोलाद, वाहतूक, अवकाश, अणुतंत्रज्ञान या संदर्भातही भारताला सहकार्य देण्यास सुरूवात केली.

### आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे आव्हान

शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर आणि रशियन फौजा अफगणिस्तानातून माघारी बोलावल्यामुळे निर्माण झालेली राजकीय पोकळी आंतरराष्ट्रीय दहशतवादाने भरून काढण्यास सुरूवात केली. ९०च्या दशकात अमेरिकेच्या साम्राज्यवादी धोरणाविरोधात अरब जगतात असंतोष निर्माण होऊ लागला. या असंतोषाला खतपाणी घालण्याचे काम विविध दहशतवादी संघटनांनी सुरू केले. अफगाणिस्तान हा तालिबान व अल-काइदा या दहशतवादी संघटनांच्या कारवायाचे, षडयंत्राचे

मुख्य केंद्र बनले. आंतरराष्ट्रीय दहशतवादामुळे रशियाचा युरोप आणि आशिया खंडातील राजकीय प्रभाव ओसरू लागला. कारण रशियाची लष्करी ताकद विभागली गेली होती. अनेक शस्त्रास्त्रे चोरट्या मार्गाने अफगाणिस्तान, अरब जगतातील दहशतवादी, बंडखोरांच्या हाती पडली. खुद्द रशियाला चेचेन बंडखोरांचा प्रश्न सतावू लागला. भारतालाही ९० च्या दशकापासून पाकपुरस्कृत दहशतवादाचा सामना करावा लागत आहे.

भारत आणि रशिया या दोन्ही देशांपुढे दहशतवाद ही एक प्रमुख समस्या आहे. दोन्ही देशांच्या विरोधात काम करणारे दहशतवादी गट वेगवेगळे असले तरी या गटांची उद्दीष्टे एकच आहेत. ती उद्दीष्टे म्हणजे या दोन्ही देशांमध्ये अशांतता माजवणे, शांतता-सौहार्द बिघडवणे, सतत युध्दजन्य परिस्थिती निर्माण करणे, शस्त्रास्त्रांचा, अमलीपदार्थांचा व्यापार वाढवणे. त्यामुळे दोघांचा एक सामायिक शत्रू असलेल्या दहशतवादाविरोधात लढण्यासाठी उभय देशांनी परस्पर सहकार्य देण्यास संमती दिली आहे. गेल्या काही वर्षात दहशतवादाचे केंद्र अफगाणिस्तान आणि पाकिस्तान या देशांमध्ये असल्याने या देशांमध्ये कार्यरत असणाऱ्या विविध दहशतवादी संघटना एकमेकांना मदत करताना दिसतात. इराक, लिबिया, सीरिया, इजिप्तमधील दिसणारी अशांतता ही दहशतवादी गटांच्या मदतीमुळे आहे हे लक्षात घेतले पाहिजे. २०११ साली अमेरिकेने अल-काइदा या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संगटनेचा प्रमुख ओसामा बिन लादेन याला ठार मारून या संघटनेचा कणाचा मोडला होता. पण लादेनचे काही समर्थक ही संघटना चालवताना दिसत आहे. सध्या दहशतवाद्यांनी आपले जाळे काही आफ्रिकी देशांमध्येही पसरवले आहे. तेथून दहशतवादी कारवायांची आखणी केली जाते. चेचेन बंडखोरांच्या कारवायांची झळ बसल्यामुळे रशिया अधिक सावध झाला आहे. तर जवळच्या चीनलाही दहशतवादाच्या झळ बसत असल्याने या दोघांनी व तीन मध्य आशियाई राष्ट्रांनी १९९६ मध्ये शांघाय सहकार्य संघटना स्थापन केली होती. या संघटनेच्या माध्यमातून मध्य आशियाई राष्ट्रांमध्ये दहसथवादाचा होणारा प्रसार रोखण्याचे प्रयत्न केले जात आहे. शिवाय दहशतवादाशी सामूहिक लढा देण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय मोटही बांधली गेली आहे. या संघटनेचे सदस्यत्व मिळवण्यासाठी भारत प्रयत्नशील आहे.

### भारत-रशिया लष्करी संबंध

अगोदर पाहिल्याप्रमाणे भारत-रशिया संबंधांना जसा ऐतिहासिक आधार आहे, समाजवादी विचारसरणीची जशी चौकट आहे तसा तो लष्करी सहकार्याचाही आहे. शीतयुध्दाच्या काळात भारताने अलिप्तवादी धोरण स्वीकारले असले तरी भारताने एक प्रबळ लष्करी शक्ती म्हणून, चीन आणि पाकिस्तानच्या आव्हानाला प्रत्युत्तर म्हणून स्वतःच्या लष्करी सामर्थ्यातही वाढ करण्यास सुरूवात केली होती. पाकिस्तानला १९७१ च्या युध्दात हरवल्यानंतर भारताने १९७४ मध्ये पोखरण येथे अणुचाचणी घेऊन भारतीय उपखंडात एक बलाढ्य क्षेत्रीय शक्ती म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले. शीतयुध्दाच्या काळात हे स्वतःला अण्वस्त्रसज्ज घोषित करणे हे अपरिहार्य होते. कारण भारताला शेजारील देशांपासून आक्रमणाचा धोका असल्याने कोणत्याही एका गटाचे मांडलिकत्व पत्करण्यापेक्षा स्वतःच्या बळावर एक सत्ता म्हणून वाटचाल करणे हे भारताचे धोरण होते. भारताच्या या धोरणाला आंतरराष्ट्रीय राजकारणाचा एक भाग म्हणून सोव्हिएत युनियनने नेहमीच पाठिंबा दिला शिवाय लष्करी तंत्रज्ञानही वेळोवेळी पुरवले. अमेरिकेने भारतीय उपखंडातील हे राजकीय स्थैर्य बिघडवण्यासाठी जेव्हा पाकिस्तानला अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली विमाने, रणगाडे, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान पुरवले तेव्हा रशियाने पुढाकार घेऊन

भारतालाही त्यांचे अत्याधुनिक लष्करी तंत्रज्ञान पुरवले. या मध्ये टेहळणी करणारी व लक्ष्यावर अचूक मारा करणारी सुखोई-३० जातीची विमाने आहेत. लष्करी व नागरी रसद पुरवणारी हेलिकॉप्टर आहेत. ब्रह्मोस या अत्याधुनिक क्षपणास्त्राचे तंत्रज्ञान आहे. रशियाने टी-९० एस भीष्म या रणगाड्याचे तंत्रज्ञान दिले आहे. शिवाय अकुला-२ ही अणुपाणबुडी, आयएनएस विक्रमादित्य या विमानवाहू जहाजासाठी सहकार्य, मिग-२९ ही लढाऊ विमाने, अत्याधुनिक रडार यंत्रणा भारताला दिले आहे.

२००० सालापासून भारत आणि रशियामध्ये सहकार्य आणि भागीदारीचे नवे पर्व सुरू झाले. त्यानुसार रशियाने भारताच्या लष्कराच्या आधुनिकीकरणासाठी सर्व ती मदत द्यायचे ठरवले आहे. २०२२ सालापर्यंत भारत रशियाकडून अंदाजे १०० अब्ज डॉलरची शस्त्रास्त्रे खरेदी करणार आहे. त्यामुळे भारत हा रशियाकडून सर्वाधिक शस्त्रास्त्रे खरेदी करणारा देश झाला आहे.

रशियाकडून एवढ्या मोठ्या प्रमाणात संरक्षण सहकार्य घ्यायचे कारण असे की भारताला केवळ पाकिस्तानचा नव्हे तर चीनचाही मोठा धोका आहे. पाकिस्तानने गेल्या १५-२० वर्षात दहशतवाद्यांच्या मदतीने भारताविरोधात छुपे युध्द (प्रॉक्सी वॉर) पुकारले आहे. या युध्दाचा सामना करण्यासाठी प्रचंड लष्करी बळाची आवश्यकता लागत नाही पण चीनशी सामना करताना मात्र भारताला त्याच्या सीमा नेहमीच दक्ष व शस्त्रसज्ज ठेवाव्या लागतात. भारताने विकसित केलेली आंतरखंडीय क्षेपणास्त्रे ही केवळ पाकिस्तानला नव्हे तर चीनच्या लष्करी सामर्थ्याला उत्तर आहे. शिवाय रशियाची मदत असल्याने चीनलाही शह बसत आहे. १९९८ मध्ये वाजपेयी सरकारने अणुचाचण्या घेऊन भारतीय उपखंडातील शस्त्रास्त्र स्पर्धेला अचानक वेग दिला. त्यामुळे भारताच्या संरक्षण खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ करावी लागली. भारताच्या अणुचाचण्यांचा निषेध म्हणून अनेक देशांनी भारताविरोधात आर्थिक बहिष्कार पुकारला होता. त्यावेळी रशियाने भारताच्या अणुकार्यक्रमाला सशर्त पाठिंबा दिला होता. २००० साली पुतीन यांनी भारताला भेट देऊन रशियाची मैत्री व्यक्त केली होती. शिवाय आर्थिक सहकार्यासाठी अनेक करारांवर स्वाक्षर्या केल्या होत्या. पुतीन यांनी २०१३ मध्येही भारताला भेट देऊन भारत-रशिय सहकार्य अधिक बळकट केले होते.

### भारत-रशिया अणुसहकार्य

७ नोव्हेंबर २००९ रोजी भारताने रशियाशी ऐतिहासिक असा अणुकरार केला. हा अणुकरार नागरी क्षेत्रासाठी सुध्दा असल्याने रशियाच्या मदतीने तामिळनाडूतील कुडानकुलम येथे अणुऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होणार आहे. नागरी अणुऊर्जा क्षेत्रात २०३० पर्यंत भारत-रशियादरम्यान ४५ अब्ज डॉलर एवढ्या किंमतीचे करार होणार आहेत. भारत या कराराच्या माध्यमातून देशात १७-१८ अणुऊर्जा प्रकल्पांची क्षमता एक हजार मेगावॉट असून २०३० सालापर्यंत भारतातील विजेच्या एकूण निर्मितीपैकी २० टक्के निर्मिती ही एकट्या रशियाच्या मदतीने होणार आहे हे विशेष आहे.

### भारत-रशिया ऊर्जा सहकार्य

भारत हा ऊर्जेसाठी परावलंबी असून त्याला आपल्या ऊर्जेची गरज भागवण्यासाठी ८० टक्के पेट्रोलजन्य पदार्थांची आयात करावी लागते. सध्याच्या भारताची वाटचाल आर्थिक

महासत्ता होण्याच्या दिशेने असल्याने त्यासाठी ऊर्जेची गरज आहे. भारतामध्ये नागरीकरण, शहरीकरण वेगाने होत आहे. एवढ्या कोट्यावधी लोकंना ऊर्जा पुरवणे हे भारतापुढेच खरे आव्हान आहे. रशिया हा पेट्रोलजन्य पदार्थाच्या उत्पादनात जगातील एक अग्रेसर देश असून भविष्यात तो भारताचा एक तेलपुरवठा देशही बनू शकतो. या दृष्टीने भारताने रशियासह मध्य आशियातील देशांशी तेलसंबंध अधिक घनिष्ठ करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. भारतीय तेलकंपन्यांनी रशियातील तेलविहिरी प्रकल्पांमध्ये रस घेतला असून रशियातील साखालिन-१ व साखालिन-२ या नैसर्गिक वायू प्रकल्पांमध्ये भारताने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. तेलाच्या उत्खननापासून तेलविक्रीपर्यंत प्रत्येक टप्प्यात आता भारतीय कंपन्या रशियाशी व्यवहार करणार आहेत. त्यामुळे भारतीय तेलकंपन्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वतःचे स्थान प्रस्थापित करण्याची संधी मिळाली आहे.

मध्य आशियातून थेट भारताला नैसर्गिक वायू मिळेल अशी कल्पना काही वर्षापूर्वी चर्चेस आली होती. या योजनेनुसार मध्य व दक्षिण आशिया असा मोठा एनर्जी कॉरिडोर होऊ शकतो. हा कॉरिडोर प्रत्यक्षात आल्यास आशियाई बाजारपेठ अत्यंत प्रभावशाली होऊ शकते. शिवाय भारतासारख्या प्रचंड देशाला ऊर्जेसाठी अरब राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागणार नाही. भारताने या दृष्टीने कझाकीस्तान, ताजिकीस्तान या देशांशी आर्थिक सहकार्य वाढवले असून उझबेकीस्तान, हिरगिझीस्तान, तुर्केमिनिस्तान या मध्य आशिया देशांशीही चर्चा सुरू केली आहे. मध्य आशियातून येणारा नैसर्गिक वायू पाइपलाइनद्वारे अफगाणिस्तान आणि पाकिस्तानातून येणार असल्याने या दोन्ही देशांना त्यांचा फायदा होणार आहे. पण या दोन्ही देशांमध्ये दहशतवादी गटांचा जोर असल्याने या प्रकल्पाच्या सुरक्षिततेविषयी शंका आहे. या प्रदेशात राजकीय अस्थैर्य असल्यास दहशतवादी गट नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताबा मिळवू शकतात व चोरट्या मार्गाने आयात-निर्याताचाही धोका आहे. पण मध्य आशिया आणि दक्षिण आशिया हा प्रदेश ऊर्जा मार्गाने जोडल्यास आशिया खंडामधील राजकीय-आर्थिक वातावरण बदलून जाऊ शकते. व आशिया खंड जगाच्या राजकारणात निर्णायक भूमिका घेऊ शकतो.

### भारत-रशिया अवकाश सहकार्य

रशियाने भारताच्या अवकाश कार्यक्रमात नेहमीच भारताची मदत केली आहे. २००७ मध्ये भारत आणि रशियात अवकाश सहकार्याचा ग्लोनास हा करार होऊन उभय देशांनी अवकाश संशोधन, अवकाश तंत्रज्ञानाचे हस्तांतरण, अवकाशातील मोहीमांसाठी परस्पर सहकार्य देण्याचे कबूल केले आहे. भारताची चंद्र्यान-२ मोहीम ही रशियन फेडरल स्पेस एजन्सीच्या सहकार्याने आखण्यात आली असून या मोहिमेचा प्रस्तावित खर्च सुमारे सव्वा चार अब्ज डॉलर इतका आहे.

### भारत-रशिया आर्थिक संबंध

शीतयुध्दाच्या काळात आणि त्यानंतर भारत हा रशियाला औषधे, चहा, कॉफी, मसाले, वस्त्र-प्रावरणे, खाद्य तेल, इंजिनिअरिंग वस्तू आदींची निर्यात करत होता. त्या बदल्यात रशिया भारताला पोलाद-लोखड, खते, कोळसा, खनिज कोळसा, रबर व इतर वस्तूंची निर्यात करत होता. हा व्यापार २०१० पर्यंत सुमारे १० अब्ज डॉलर इतका होता. २१ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात भारत आणि रशियाच्या आर्थिक संबंधात आमूलाग्र बदल झाले असून व्यापार, विज्ञान-तंत्रज्ञान, आर्थिक सहकार्य, सांस्कृतिक आदानप्रदान, पायाभूत विकास योजनांमध्ये गुंतवणूक, अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांचा विकास, दळणवळण, बंदर विकास, लष्करी साहित्य आदी क्षेत्रात

उभय देशांमध्ये बर्याच वाटाघाटी झाल्या आहेत. उभय देशांनी दरवर्षी आपल्या व्यापारामध्ये ३० टक्के वृद्धीचे उद्दीष्टये ठेवले असून औषधे, खते, खाणउद्योग, पोलाद, माहिती-तंत्रज्ञान, नागरी हवाई सेवा, दूरसंपर्क, पायाभूत सोयी, अन्नप्रक्रिया उद्योग, सेवा क्षेत्रात अधिक सहकार्य अपेक्षित धरले आहे.

## भारत-रशिया संबंधांपुढील आव्हाने

गेल्या २० वर्षात चीन ही जगात एक सामजिक आणि आर्थिक शक्ती म्हणून उदयास आली आहे. चीनने भारत-रशिया संबंधाला केवळ आव्हान दिलेले नाही तर या दोन देशांना आशियाई राजकारणात महत्वाची भूमिकाही घेण्यास भाग पाडले आहे. चीनने आर्थिक, व्यापारी आणि लष्करी क्षेत्रांत रशियापुढेही स्वतःचे आव्हान उभे केले आहे. चीनच्या व्यापारातील विस्तारवादी धोरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात रशियाचे महत्व कमी झाले आहे शिवाय रशियाचा मध्य आशियातील प्रभावही कमी होत चालला आहे. चीनलाही भारताएवढी ऊर्जेची गरज आहे आणि ती भागवण्यासाठी या देशाने मध्य आशियातील देशांशी आर्थिक सहकार्यासाठी हात पुढे केला आहे. ऊर्जा ही अर्थव्यवस्थेचे इंजिन आहे. पुढील काळ हा उर्जेसाठी संघर्षाचा असून त्यादृष्टीने चीनने आतापासून सावधपणे पावले उचलली आहे. चीन्या विस्तारवादी धोरणामुळे वेळोवेळी त्यांचा रशियाशी संघर्ष उडाला होता. पण प्रत्यक्ष युध्दाला कधी तोंड फुटले नव्हते. पण रशियातील काही फुटीरवादी गटांना चीन शस्त्रास्त्रांची मदत करत असल्याने दोन्ही देशांमध्ये तणाव आहेच. सीरियातील यादवीत रशियाने अमेरिकेच्या विरोधात ठाम भूमिका घेतल्याने रशियाचे आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्व वाढले आहे. शिवाय अरब राष्ट्रांमधील यापुढच्या राजकारणात रशियालाही घुसखोरी करण्याची संधी मिळाली आहे.

काळाच्या ओघात आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलणाऱ्या असंख्य घटनांमुळे रशियाचा भारत-पाकिस्तान संबंधांवरील दबाव मात्र कमी झाला आहे. त्याला अनेक भौगोलिक-राजकीय-सामरिक कारणे आहेत. त्यापैकी एक कारण म्हणजे १९८९ मध्ये अफगाणिस्तानातून रशियन फौजा माघारी गेल्यामुळे रशियाचा अफगाणिस्तान-पाकिस्तान-भारत यांच्यासंदर्भातील राजकारणावर मर्यादा आल्या. ही पोकळी २००० सालापासून अमेरिकेने भरून काढली आणि भारताला आणि पाकिस्तानला भेडसावणारा दहशतवादाचा प्रश्न हा अमेरिकेच्या परराष्ट्रकारणाशी जोडला जाऊ लागला. त्यामुळे अफगाणिस्तानातून अमेरिकी फौजा संपूर्ण मागे घेतल्यानंतर निर्माण होणाऱ्या पोकळीची जागा दहशतवादी गट भरून काढतील अशी भीती असून रशियाला मात्र येथे फारसे काही करता येणार नाही. गेल्या १० वर्षात भारतही अमरेरिकेशी सौहार्दाचे संबंध ठेवण्याचे प्रयत्न करत आहे. भारताने अमेरिकेशी अणुकरार केल्यानंतर तर हे संबंध दोघांसाठीही महत्वाचे ठरले असून आंतराष्ट्रीय दहशतवादाशी लढा देताना अमेरिका आता भारताचीही मदत घेण्यास तयार झाले आहे. अफगाणिस्तानच्या पुनरउभारणी भाराचे वाढत असलेले योगदान हे उदाहरणच आहे शिवाय पाकिस्तानशी संबंध प्रस्थापित करताना भारताला अप्रत्यक्षरित्या रशिया नव्हे तर अमेरिकेची मदत लागत आहे. भारतात सीमापार होणारा दहशतवाद हा नेहमी भारत-पाकिस्तान तणावाचा मुद्दा बनत असताना भारतासमोर अनेक राजनैतिक अडचणी निर्माण होताना दिसतात. या अडचणी अमेरिकेच्या मदतीनेच सोडवाव्यात असे दबाव आंतरराष्ट्रीय राजकारणात होत असतात आणि त्याशिवाय तरणोपाय नसतो. त्यामुळे सध्याचे दक्षिण आशियातील वातावरण पाहता, चीनचे वाढते सामर्थ्य पाहता, पाकिस्तानस्थित दहशतवादी गटांच्या भारतविरोधी  कारवाया पाहता रशिया नव्हे तर

अमेरिकेची मदत भारताला घ्यावी लागत आहे. कारण केवळ दहशतवादाच्या समस्येमुळे भारत-पाकिस्तानमधील सुसंवाद, व्यापार, सांस्कृतिक आदान-प्रदान धोक्यात आले आहे. शीतयुध्दाच्या काळात सोव्हिएत रशियाशी असलेल्या मैत्रीमुळे भारतीय उपखंडात सत्तासमतोल साधण्यात भारताला यश मिळाले होते. शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर कारगीलची घटना वगळता भारत-पाकिस्तानदरम्यान मोठा असा लष्करी संघर्ष उध्दवलेला नाही. कारण आता दोघांकडेही अण्वस्त्र असल्याने कोणीही पहिल्यांदा अणुबाँबचा हल्ला केल्यास दुसरा देशही त्याला त्याच भाषेत उत्तर देईल अशी स्थिती आली आहे. शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर पाकिस्तान नव्हे तर भारत हा एक आर्थिक महासत्ता म्हणून वेगाने पुढे आलेला देश आहे, हे समजून घेतले पाहिजे. तसेच शांततावादी धोरणामुळे, या देशात पसरलेल्या विस्तृत बाजारपेठेमुळे भारत आंतरराष्ट्रीय राजकारणात आता महत्वाची भूमिका बजावू लागला आहे. भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये स्थायी सदस्यत्वासाठी लॉबिंग सुरू केले आहे. त्याला रशियानेही पाठिंबा दिला आहे. भविष्यात स्थायी सदस्यत्व मिळाल्यानंतर भारताचे महत्व वाढेलच, त्यामागे रशियासोबतच्या दीर्घ मैत्रीचा वारसा असेल.

❖❖❖❖

# १

# परराष्ट्र धोरण : आवश्यकता आणि निर्मिती

**प्रकरणाची रचना :**

१.० उद्दिष्टे
१.१ परिचय
१.२ व्याख्या
१.३ रार्ष्ट हित आणि परराष्ट्र धोरण
१.४ परराष्ट्र धोरणाची ध्येय
१.५ परराष्ट्र धोरण तत्वप्रणालीला प्रभावीत करणारे घटक
१.६ थोडक्यात महत्वाचे
१.७ संपूर्ण प्रकरणावरील प्रश्न

## १.० उद्दिष्टे

या प्रकरणात आपण स्वतंत्र देशांना परराष्ट्र धोरणाची आवश्यकता का भासते यांवर विचारविमर्श करणार आहोत. परराष्ट्र धोरणाच्या चर्चेत असणारया महत्वाच्या व्याख्या आणि परराष्ट्र धोरण निर्धारित करतांना साधारणतः सर्व राष्ट्रांना लागू होणारे घटक यांचा आपण अभ्यास करणार आहोत. आधुनिक काळातील परराष्ट्र धोरणाला प्रभावीत करणाऱ्या अंतर्गत आणि बाह्य निर्धारक बाबींची समीक्षा या प्रकरणात करण्यात येईल.

## १.१ परिचय

आधुनिक राज्य-राष्ट्र संकल्पनेची पाळेमुळे वेगाने रूजून विविध राष्ट्रांदरम्यान परस्पर संपर्कात वाढ होण्यातून सुनिश्चित परराष्ट्र धोरण आखण्याची गरज सर्व राष्ट्रांच्या सरकारांना जाणवू लागली. पाश्चिमात्य देशांच्या वसाहतवादाचा निर्णायक शेवट होऊन अनेक नव्या राष्ट्रांचा उदय झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय संबंधांमधील गुंतागुंत अधिकच वाढायला लागली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेने विविध राष्ट्रांना आपपली भूमिका मांडण्याचे व्यासपीठ उपलब्ध होऊन राष्ट्र-राष्ट्रांमधील संवादात वाढ झाली. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये आणि राष्ट्रा-राष्ट्रांतील संवादात सुसूत्रता आणण्यासाठी प्रत्येक देशाला साचेबध्द परराष्ट्र धोरणाची आवश्यकता जास्त तीव्रतेने जाणवायाला लागली. बहुतांश राष्ट्रांनी एकलकोंडेपणा न स्विकारता जास्तीत जास्त राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करण्याचे धोरण स्विकारले. ज्या राष्ट्रांनी काही काळाकरता काही राष्ट्रांशी जाणूनबुजून संबंध स्थापन करण्याचे टाळले त्या मागे सुध्दा त्यांच्या परराष्ट्र समूहाशी कुठल्याही प्रकारे संबंध प्रस्थापित न करणे हे सुध्दा एक विशिष्ट प्रकारचे परराष्ट्र धोरणच आहे.

त्याचप्रमाणे, सुनिश्चित उद्दिष्टांचे परराष्ट्र धोरण न आखणे हेच एक प्रकारचे परराष्ट्र धोरण आहे. उदाहरणार्थ, सन १९९२ पर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणाचा महत्वाचा भाग होता की इस्त्राईल या राष्ट्राशी कुठल्याही प्रकारे संबंध प्रस्थापित करायचे नाही. या धोरणाचा फादा भारताला पश्चिम आशियातील इतर देशांशी संबंध बळकट करण्यात झाला. जागतिक व्यासपीठामध्ये काश्मिर प्रश्नावर या देशांचा पाठिंबा प्राप्त करण्यात, या देशांतून खनिज तेलाची आयात करण्यात आणि अनेक भारतीय कामगारांना या देशांत रोजगार मिळण्याची वाट मोकळी करण्यात भारताला यश आले. त्याचप्रमाणे, दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदी सरकार विरोधातील आंदोलनाला बळकटी आणण्यासाठी या देशावर जाहीर बहिष्कार टाकण्याचे धोरण भारताने जाणीवपूर्वक स्विकारले होते. यामुळे जगभरातील विषमतेविरूध्द आणि पारतंत्र्याविरूद्ध लढणाऱ्या राष्ट्रीय आंदोलनामध्ये भारताला मानाचे स्थान प्राप्त झाले होते. त्या त्या राष्टांमध्ये ही आंदोने यशस्वी झाल्यानंतर त्या देशांशी व्यापक संबंध विणण्यात भारताला यश आले होते. थोडक्यात इतर राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करणे किव्हा न करणे याचा निर्णय घेणे परराष्ट्र धोरणांच्या उद्दिष्टांमुळे सोपे जाते.

परराष्ट्र धोरणाशिवायच्या राष्ट्राची तुलना मैदानात उतरलेल्या पण विरोधकांवर गोल डागण्याची कोणतीच योजना नसलेल्या फुटबॉल चमूशी होऊ शकेल. फुटबॉल चमूतील ११ ही खेळाडू कोणत्याही निर्धारित उद्दिष्टाशिवाय चेंडू फक्त इकडचा तिकडे टोलवत असतील तर त्या चमुवर सुनियोजित खेळ खेळणाऱ्या विरोधी चमूतर्फे अनेक गोल डागण्यात येतील. त्याचप्रमाणे जागतिक पटलावर अस्तित्वात असणाऱ्या एखाद्या राष्ट्रच्या सरकारातील व्यक्ती परराष्ट्र धोरणाशिवाय राज्यशकट हाकत असतील तर शक्तीशाली व योजनाबद्धरित्या कार्यतर इतर राष्ट्रांद्वारे त्या राष्ट्राचे शोषण होण्याची परिस्थिती निर्माण होते. परराष्ट्र धोरण अस्तित्वात नसल्यास राष्ट्राच्या परराष्ट्र विभागास द्वी-पक्षीय संबंध प्रस्थापित करण्याबाबत, बहुराष्ट्रीय व्यासपीठांवरील सहभागाबाबत मार्गदर्शक तत्वे मिळणार नाही. त्याचप्रमाणे, देशाच्या संरक्षण खात्यास संरक्षण सिद्धतेबाबत योग्य मार्गदर्शक तत्वे मिळणार नाही. त्याचप्रमाणे, देशाच्या संरक्षण खात्यास संरक्षण सिद्धतेबाबत योग्य मार्गदर्शन मिळणार नाही कारण परराष्ट्र धोरणाच्या अभावी मित्र देश, मदतीस तत्पर देश, शत्रू देश, तठस्थ देश याप्रमाणे विविध राष्ट्रांची बिभागणी करता येणार नाही. अर्थ मंत्रालय आणि वाणिज्य मंत्रालयास देशाचा आंतरराष्ट्रीय व्यापार वाढवण्यासाठी कसलेही मार्गदर्शन मिळणार नाही. थोडक्यात, परराष्ट्र धोरणाशिवायच्या राष्ट्राची तुलना अथांग सागरात कुठलेही दिशा ज्ञान नसलेल्या जहाजाशी करता येईल. ज्याप्रमाणे समुद्रातील जहाज होकायंत्र व रडाच्या मदतीने निर्धारित दिशेने वाटचाल करत बंदरावर पोहोचते त्याप्रमाणे परराष्ट्र धोरणाच्या सहाय्याने जागतिक राजकारणात राष्ट्राला योग्य दिशेने वाटचाल करत विनाकारण होऊ सकणारे संघर्ष टाळता येतात आणि आवश्यक त्या देशांशी मैत्री संबंध वृद्धिंगत करता येतात. एकंदरीत, सार्वभौम राष्ट्र-राज्ये जागतिक पटलावर अस्तित्वात असतील तोपर्यंत प्रत्येक राष्ट्राला परराष्ट्र धोरणाची आवश्यकता असेल.

## १.२ परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या

परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासकांनी या संज्ञेच्या व्याख्या वेगवेगळ्या प्रकारे केल्या आहेत. विविध व्याख्यांमध्ये सर्व तज्ञांचे एका मुद्यावर एकमत आहे की परराष्ट्र धोरणाचा संबंध एका राष्ट्राच्या दुसऱ्या राष्ट्राशी किंवा राष्ट्र-समूहाशी असलेल्या व्यवहाराशी आहे. जॉर्ज मोडेल्स्की

यांच्या मतानुसार, परराष्ट्र धोरण म्हणजे एका समुदायाने किंवा राष्ट्राने दुसऱ्या समुदायाच्या किंवा राष्ट्रांच्या वर्तनाल प्रभावीत करण्यासाठी आणि आंतराष्ट्रीय पटलावर स्वतःचे स्थान सुरक्षित व मजबूत करण्यासाठी कर्यान्वित केलेला क्रियाकलाप होय. दुसऱ्या राष्ट्रांची वर्तने यशस्वीपणे बदलण्यासाठी आवश्यक त्या निर्णयप्रक्रियेवर आणि स्वःव्यवहारावर प्रकाश टाकण्याची भूमिका परराष्ट्र धोरणाला बजावावी लागते. (George Modelski, A Theory of Foreign Polcy, (London, 1962) pp.6-7) प्रत्येक राष्ट्राच्या व्यवहाराचा व वर्तनाचा परिणाम प्रत्येक दुसऱ्या राष्ट्राच्या निर्णयाप्रक्रियेवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, कमी किंवा जास्त प्रमाणात, लाभदायकरित्या किंवा हानीकारकपणे होत असतो. दुसऱ्या राष्ट्रांच्या व्यवहार-वर्तनातून होणारे लाभ जास्तीत जास्तीत प्रमाणात मिळवणे आणि योऊ शकणारे नुकसान टाळणे अथवा अत्यल्प ठेवणे हे परराष्ट्र धोरणाचे महत्वपूर्ण कार्य आहे. परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट दुसऱ्या राष्ट्रांच्या व्यवहार-वर्तनात बदल घडवणे एवढेच नाही तर इतर राष्ट्रांच्या योग्य व्यवहार-वर्तनात खंड पडू नये यासाठी कार्यकलाप करणे हे सुध्दा आहे. उदाहरणार्थ, शीत-युध्द काळात काश्मिरच्या मुद्यावर ग्रेट ब्रिटेनच्या भूमिकेत संदिग्धता होती. ग्रेट ब्रिटेन ने संदिग्ध धोरण सोडून ठामपणे भाराची बाजू घ्यावी भारतचे परराष्ट्र धोरण कार्यान्वित होते. दुसरीकडे, सोविएत संघाने काश्मिरच्या मुद्दयावर संयुक्त राष्ट्रात भारताची साथ दिली होती. इथे भारताचे परराष्ट्र धोरण सोविएत संघाच्या भूमिकेत बदल घडू नये यासाठी आवश्यक ते निर्णय घेत होते.

परराष्ट्र धोरण म्हणजे राष्ट्राची इतर राष्ट्रांसोबतची आणि आपल्या सार्वभौमित्व क्षेत्राबाहेरील घटकांशी होणारी किचकट आणि गतिमान राजकीय अन्योन्यक्रिया होय. जोसेफ फ्रांकेल यांच्या मतानुसार, एका राष्ट्रांचा इतर राष्ट्रांशी असलेल्या अन्योन्यक्रियेशी संबंधीत निर्णय आणि प्रक्रियांचा संच म्हणजे त्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण. (Joseph Frankel, The Making of Foreign Policy, p.1) याचा अर्थ, परराष्ट्र धोरणात राष्ट्र-राज्याच्या सार्वभौमित्वातील अधिकृत शक्तींनी किंवा संस्थांनी राष्ट्र-राज्याच्या सार्वभौमित्वाबाहेरील शक्ती किंवा संस्थांच्या प्रती घेतलेले निर्णय आणि लागू केलेल्या प्रक्रियांचा समावेश होतो. एका राष्ट्राने इतर राष्ट्रांची कायदे-निर्मिती व शंमलबजावणची प्रक्रिया प्रभावीत करण्यासाठी आणि आपल्या सार्वभौमित्व क्षेत्राबाहेरील राज्यहीन अथवा राष्ट्र-राज्याच्या निर्णय प्रक्रियेत अधिकृत स्थान नसलेल्या (non-state actors) घटकांच्या कारवाया प्रभावीत करण्यासाठी उपयोगात आणणाऱ्या साधन-संचाची निवड करण्याचे काम परराष्ट धोरण करत असते. आपले राष्ट्रीय हित जपण्यासाठी राष्ट्र-राज्याच्या अधिकृत घटक संस्थांनी आपल्या सार्वभौमित्व क्षेत्राबाहेरील सर्व व्यक्ती, संस्था आणि राष्ट्रांशी करावयाच्या वर्तनासाठी आवश्यक त्या संकल्पनांची निर्मिती करून त्यांच्या व्यवहार्य अंमलबजावणीची रूपरेषा परराष्ट्र धोरणात आखणे अपेक्षित असते. परराष्ट्र धोरणाशी संबंधीत सर्व निर्णयांमागे एखाद्या विशिष्ट राष्ट्राशी अथवा राष्ट्र-समूहाशी सहकार्य/सह-अस्तित्व प्राप्त करणे किंवा संघर्षाची स्थिती निर्माण करणे किंवा तटस्थता राखणे हा महत्वपूर्ण हेतू असतो.

ह्युज गिब्सन यांच्या मतानुसार, परराष्ट्र धोरण म्हणजे ज्ञान आणि अनुभवावर आधारीत सुरेख व्यापक योजना ज्या आधारे सरकार बाह्य-जगताशी व्यवहार करत असते. याचे ध्येय राष्ट्राच्या हितांचे रक्षण आणि जोपासना करणे असते. राष्ट्रहित नेमके कशात आहे याची स्पष्ट समजदारी आणि ते प्राप्त करण्यासाठी किंवा टिकवण्यासाठी आपल्या साधनसंपत्ती व प्रभावाचा कितपत वापर करणे योग्य आहे. ज्ञान परराष्ट्र धोरणात निहित असणे आवश्यक आहे. याच्या

शिवाय परराष्ट्र धोरण उभे राहू शकत नाही. (Huge Gibson, The road to Foreign Policy, p.9)

परराष्ट्र धोरणाची तत्वप्रणाली साधी आणि संक्षिप्त असू शकते किंवा ती गुंतागुंतीची आणि संदिग्ध पण असू शकते. एक बाब स्पष्ट आहे की, परराष्ट्र धोरणात राजनैतिकांच्या गाठी-भेटी, दोन किवा अधिक राष्ट्र-प्रमुखांनी एकत्र येऊन जारी केलेली वक्तव्ये आणि सरकारांनी जाहीरपणे केलेल्या घोषणा यांच्यापेक्षा खूप काही समाविष्ट आहे. परराष्ट्र धोरणात निश्चितपणे राष्ट्र-राज्याची राजकीय उद्दिष्टे, नैतिक तत्वे आणि राष्ट्रहिताची परिभाषा यांचा समावेश होतो. पादेल्फोर्द राष्ट्र-राज्याची राजकीय उद्दिष्टे, नैतिक तत्वे आणि राष्ट्रहिताची परिभाषा यांचा समावेश होतो. पादेल्फोर्द आणि लिंकन यांच्यानुसार, परराष्ट्र धोरण म्हणजे राष्ट्र-राज्याचे बाह्य-घटकांशी संबंधीत सर्वांगीण व्यवहार-वर्तन, राष्ट्र-राज्याच्या व्यापक ध्येय आणि हितांचे रक्षण आणि प्राप्तीसाठी इतर राष्ट्रांप्रती अंमलात आणलेल्या विशिष्ट प्रक्रियांचा संच म्हणजे परराष्ट्र धोरण. (Norman J padelford and George A Lincoln, The Dynamics of International Politics, p.195) या सर्व व्याख्यांचा सारांश असा काढता येईल की राष्ट्रीय ध्येय प्राप्त करण्यासाठी उपलब्ध राष्ट्रीय संसाधनांच्या मदतीने इतर राष्ट्रे व आपल्या सार्वभौमित्वाबाहेरील संस्था/व्यक्ती यांच्याशी होणारा क्रियाकलाप निर्धारित करणारी तत्वप्रणाली म्हणजे राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण.

परराष्ट्र धोरण पोकळीत अस्तित्वात येऊ शकत नाही. राजकीय-आर्थिक-सामाजिक-ऐतिहासिक संदर्भामध्ये परराष्ट्र धोरण तयार होत असते. राष्ट्र-राज्याच्या निर्मितीशी संबंधीत ऐतिहासिक घडामोडी, राष्ट्रियनिर्मितीची वैचारिक तत्व-चौकट आणि राष्ट्र-राज्याच्या अस्तित्वाचे तार्किक अधिष्ठान यांच्या संगमातून राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा उगम होतो. राष्ट्राच्या राज्यसंस्थेचा प्रकार, अर्थव्यवस्थेचे स्वरूप व गरजा, राजकीय परिस्थिती, भौगोलिक स्थान आणि सांस्कृतिक जडणघडण यांच्या संयुक्त साच्यातून परराष्ट्र धोरणाला आकार-उकार प्राप्त होतो.

**आपली प्रगती तपासा.**

१ राष्ट्राला परराष्ट्र धोरणाची आवश्यकता का असते हे उदाहरणासह स्पष्ट करा.

२ परराष्ट्र धोरणांच्या निदान २ व्याख्यांची चर्चा करा.

## १.३ राष्ट्र हित आणि परराष्ट्र धोरण

आधुनिक काळात, परराष्ट्र धोरणात सातत्य आणि सुसंगतता राखण्यासाठी देशाच्या नागरिकांमध्ये त्याची स्वीकार्हता आणि मान्यता मिळणे आवश्यक आहे. देशाच्या परराष्ट्र धोरणाद्वारे राष्ट्रीय हितांचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या प्रक्रियेतून धोरण निर्मितीत नागरिकांचा सहभाग निश्चित करण्यात येतो. नागरिकांनी विविध वैद मार्ग सरकारला कळवलेल्या आपल्या गरजा, इच्छा-आकांक्षा आणि ध्येय यांचे मिश्रण म्हणजे राष्ट्र-हित. प्रत्येक राष्ट्रासाठी त्यांचे राष्ट्रहित विविध पद्धतीने अधोरेखित होत असते. उदाहरणार्थ, आक्रमणाविरूद्ध बचाव करण्यासाठी आवश्यक संसाधनांची जुळवाजुळव, नागरिकांचे राहणीमान उंचावण्यासाठी आवश्यक ती संसाधन आणि संपत्ती निर्मिती, संयुक्त राष्ट्र संघटनेसारख्या जागतिक संस्थांमध्ये राष्ट्रच्या शक्तीनुसार योग्य स्थान प्राप्त करणे इत्यादी. चार्ल्स लर्च आणि अब्दुल सैद यांनी

पुढील प्रमाणे राष्ट्रहिताची व्याख्या केली आहे. जी दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी राष्ट्र आणि त्याचे सरकार निरंतर कार्यरत असते ती उद्दिष्टे म्हणजे राष्ट्रहित. (Charles O. Lerche Jr. and Abdul A Said, Concepts of International Politics, (Engelwood Cliffs, 1963), p.6)

अंतर्गत संसाधनांच्या अंतर्गत अंमलबजावणीतून अंशतः राष्ट्रहिताची प्राप्ती शक्य होते. मात्र बरेचदा अंतर्गत संसाधनांचा बाह्य-शक्तींशी क्रियाकलाप घडवून आणून राष्ट्र-हित प्राप्त करावे लागते किंवा त्यांचे रक्षण करावे लागते. साहजिकच 'राष्ट्रहित' राष्ट्रा-राष्ट्राप्रमाणे आणि विविध वेळी वेगवेगळे असू शकते. प्रत्येक राष्ट्राला आपल्या राष्ट्रहिताच्या पूर्ततेसाठी आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण करण्यात रस असतो. राष्ट्रहिताची पूर्तता ही साधारणतः अखंडीतपणे चालणारी प्रक्रिया आहे. इतर राष्ट्रांशी निर्माण होणाऱ्या संबंधांतून प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रहिताचे रक्षण व जोपासना करण्याचा प्रयन्त करत असते.

राष्ट्रहिताला २ भागांमध्ये विभाजित केल्या जाऊ शकतेः अत्यावश्यक किंवा केंद्रीय हित आणि दुय्यम हित. परराष्ट्र धोरणासाठी अत्यावश्यक किंवा केंद्रिय हिताचा विचार सर्वात महत्वाचा आहे. केंद्रीय हिताशी कुठल्याही प्रकारची तडजोड करण्यास राष्ट्र-राज्य तयार होत नाही आणि त्याच्या रक्षणासाठी अथवा प्राप्तीसाठी युध्द पुकारण्याची सुध्दा तयारी असते. भारतासाठी काश्मिर हा केंद्रीय हिताचा मुद्दा आहे. चीनसाठी तैवान आणि तिबेट हे केंद्रीय हिताचे मुद्दे आहेत. काही वर्षे पूर्वी, अमेरिकेसाठी अफगाणिस्तानातील तालिबान सरकारचा पाडाव करणे हा राष्ट्रहिताचा केंद्रीय मुद्दा होता तर आता तालिबानची सद्दी वाढू नये हा त्याच्याशीच संबंधीत मुद्दा अमेरिकेच्या दृष्टीने राष्ट्रहिताच्या केंद्रस्थानी आहे. केंद्रीय राष्ट्रीहिताच्या मुद्यांना परराष्ट्र धोरणात अग्रक्रम प्राप्त होतो आणि नागरिकांसाठी तो भावनिक मान-सन्मानासह स्वतःच्या स्वतंत्र सार्वभौम अस्तित्वाचा मुद्दा बनतो.

दुसरीकडे, दुय्यम श्रेणीतील राष्ट्रीय हितांची पूर्तता करण्याकडे राष्ट्र-राज्य दुर्लक्ष करत नसली तरी त्यांच्या पूर्ततेसाठी युध्दासारखे अनिम पाउल उचलणे टाळण्यावर त्यांचा भर असतो. उदाहरणार्थ, भारतासाठी संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व प्राप्त करणे किंवा जागतिक बँकेत मतदानाचा भरीव वाटा मिळवणे ही महत्वपूर्ण राष्ट्रीय उद्दिष्टे आहेत. मात्र त्याच्या पूर्ततेसाठी युध्दास सामोरे जाणे मान्य होणार नाही. परराष्ट्र धोरणासंदर्भात असे म्हणता येईल की राष्ट्रहिताचे केंद्रीय मुद्दे हे परराष्ट्र धोरणाची तडजोड न करता येणारी उद्दीष्टे असतात तर दुय्यम हिताचे मुदे् हे दीर्घकालीन योजनाबध्द प्रक्रियेचे भाग असतात.

शिवाय, राष्टहिताच्या मुद्यांना विशिष्ट मुद्दे आणि सर्वसाधरण मुदे् असे दोन भागांमध्ये विभाजित करता येते. राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणातील विशिष्ट मुद्दे हे प्रत्येक राष्ट्रानुसार बदलत असतात तर सर्वसाधारणा मुद्दे हे सर्व राष्ट्रांना लागू होतात. चीनशी असलेला सीमा-विवाद सोडवणे ही बाब चीनशी संबंधीत असल्याने ती विशिष्ट मुद्यांमध्ये मोडते. तसेच भोपाळ गैस दुर्घटनेतील आरोपीना ताब्यात घेण्याची बाब मुख्यतः अमेरिकेशी संबंधीत असल्याने विशिष्ट मुद्दयांमध्ये समाविष्ट होते. दुसरीकडे, हवामान बदल आणि जागतिक तापमान वाढीच्या संदर्भात भारताने घेतलेली जबाबदारी सर्वाची पण भार कमी-जास्त ही भूमिका सर्वसाधारण हितामध्ये मोडते कारण याप्रक्रियेतील वाटाघाटीत जवळपास सर्वच देश सहभागी आहेत.

## १.३ परराष्ट्र धोरणाची ध्येय

परराष्ट्र धोरणाची मुख्य ध्येय खालीलप्रमाणे आहेत. जी जवळपास सर्व देशांना समान प्रमाणात लागू होतातः

१. देशाच्या एकात्मतेचे आणि अखंडचे रक्षण करण्याचे काम परराष्ट्र धोरण पार पडत असते. उदाहरणार्थ, भारताच्या चीन व पाकिस्तानशी असलेल्या द्विपक्षीय संबंधांचा केंद्रबिंदू या देशांनी भारताच्या भूमीवर सांगितलेला दावा अमान्य करत खोडून काढणे हा असतो. या संदर्भात इतर आंतरराष्ट्रीय घटकांनी भारताच्या भूमिकेशी विपरीत नकाशे जारी केल्यास त्याबाबत नेषेध नोंदवत ते मागे घेण्यास भाग पाडण्याचे प्रयत्न करणे हा भाग ही या अनुषंगाने परराष्ट्र धोरणात समाविष्ट होतो. देशाची एकता आणि अखडता अबाधित राखण्यासाठी सुसज्जता वाढवण्यास परराष्ट्र धोरणात प्राथमिकता देण्यात येते. भारतीय लष्कराला सुसज्ज ठेवण्यासाठी वेगवेगळ्या देशांतील शस्त्रास्त्रे आणि तंत्रज्ञान प्रणाली मिळवण्यासाठी त्या देशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखण्याचे काम भारताचे परराष्ट्र धोरण करत असते.

२. परराष्ट्र धोरणाद्वारे देशांच्या नागरिकांच्या हितांचे रक्षण करण्यात येते. उदाहरणार्थ, द्वी-पक्षीय आणि बहुपक्षीय आंतरराष्ट्रीय व्यापार संबंधीत वाटाघाटींमध्ये भारतीय ग्राहक, शेतकरी, उद्योजक आणि निर्यातक यांच्या हितांचे रक्षण करण्याच्या दृष्टीने भारताचे परराष्ट्र धोरण आखण्यात येते. आपल्या नागरिकांच्या आर्थिक हितांची जोपासना करणे आणि जीवनावश्यक बाबींची पूर्तता सुनिश्चित करणे हा परराष्ट्र धोरणातील एक केंद्रीय मुद्दा असतो. आंतरराष्ट्रीय व्यापारात विविध देशातील नागरिकांच्या हितांमध्ये संघर्षाची स्थिती उत्पन्न होणे स्वाभाविक आहे आणि अशा परिस्थितीत परराष्ट्र धोरणात आपल्या देशातील नागरिकांच्या हिताच्या रक्षणास सर्वोच्च प्राथमिकता देणे क्रमप्राप्त आहे. परराष्ट्र धोरण देशाच्या आर्थिक संपन्नतेसाठी कार्यरत असणे अपेक्षित असते कारण आधुनिक काळात जागितक पटलावरील देशाचे स्थान आर्थिक निकषांवरून निर्धारित होत आहे. साहजिकच, इतर राष्ट्रे आणि राष्ट्र-समूहांशी केलेल्या करारातून आपापल्या देशाची आर्थिक प्रगती साधण्याचे उद्दिष्ट प्रत्येकच देशाच्या परराष्ट्र धोरणात समाविष्ट झाले आहे.

३. देशाच्या सीमेपलीकडे अधिकृतरीत्या राहणाऱ्या देशाच्या नागरिकांच्या सुरक्षेचे आणि हिताचे रक्षण करणे हे परराष्ट्र धोरणाचे एक महत्वपूर्ण उद्दिष्ट आहे. उदाहरणार्थ, ऑस्ट्रेलियातील भारतीय विद्यार्थ्यांशी होणाऱ्या कथित वर्णभेदाच्या प्रकरणांचा तपास करून त्या देशातील भारतीयांच्या सुरक्षेशी कुठलीही तडजोड होणार नाही. यासाठी प्रयत्न करणे हा भारताच्या ऑस्ट्रेलिया प्रतीच्या परराष्ट्र धोरणाचा महत्वाचा भाग आहे. त्याचप्रमाणे, पश्चिम आशियाई देशात कामासाठी स्थलांतरीत झालेल्या भारतीय नागरिकांच्या तक्रारींचे निर्वारण करण्यासाठी प्रयत्नरत असणे तसेच भारताच्या आंतराष्ट्रीय भूमिकांचा - विशेषतः पश्चिम आशियाशी संबंधीत भूमिकांचा - वाईट परिणाम तिथल्या भारतीयांच्या सुरक्षेवर होणार नाही हे सुनिश्चित करणे हा भारताच्या पश्चिम आशियाई देशांप्रतीच्या परराष्ट्र धोरणाचा भाग आहे.

४. आपल्या देशातून परदेशात जात तिथे स्थायिक झालेल्या व्यक्तीच्या सांस्कृतिक मूल्यांचे प्रतीष्ठतेचे, भावनांचे आणि मान-सन्मानाचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नरत असणे हे परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट असते. उदाहरणार्थ, फ्रांस सरकारने शिख समुदायाच्या व्यक्तींनी पगडी/फेटा घालण्यावर बंदी आणल्यानंतर भारताने या प्रतीचा कायदा शिथिल करण्याची गळा फ्रेंच सरकारला घातली. या प्रकरणातील शिख समुदायाच्या व्यक्तींनी फ्रांसचे नागरिकत्व स्विकारले असले तरी त्यांची सामाजिक-सांस्कृतिक मुळे भारतात असल्याने भारत सरकारने हा मुद्दा उपस्थित करणे योग्य मानले.

५. सर्व देशांशी चांगले संबंध निर्माण करत त्या देशांशी आर्थिक आणि तंत्रज्ञान आधरित देवाणघेवाणीची प्रक्रिया सदृढ करण्यावर परराष्ट्र धोरणात भर देण्यात येतो. याद्वारे आपल्या राष्ट्राचे हित साधण्याचा परराष्ट्र धोरणाचा हेतू असतो. सन १९५० आणि ६० च्या दशकात नव्याने स्वतंत्र होणाऱ्या आफ्रिकी आणि आशियाई देशांना मान्यता देण्यात भारत हिरीरीने पुढे होता. या देशांशी आर्थिक, शैक्षणिक आणि तंत्रिक देवाणघेवाणीद्वारे भारताने जागतिक राजकारणात आपले स्थान पक्के केले आणि आपल्या राष्ट्रीय हिताच्या पूर्ततेचा प्रयन्त सुध्दा केला.

इथे उधृत करण्यात आलेली उदाहरणे भारताच्या परराष्ट्र धोरणाशी संबंधीत असली तरी जवळपास सर्वच राष्ट्रांचा परराष्ट्र धोरणांची निर्णयप्रक्रिया याच निकषांवर कार्यरत असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) राष्ट्रहित आणि परराष्ट्र धोरण यांच्या दरम्यान असलेला संबंध स्पष्ट करा.
२) परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे उदाहरणासह स्पष्ट करा.

## १.४ परराष्ट्र धोरण आखणीतील प्रभावशाली घटक

परराष्ट्र धोरणाची तत्वप्रणाली आखण्यात आणि अंमलबजावणीत अंतर्गत निर्णायक घटक आणि बाह्य निर्णायक घटक यांचा प्रभाव असतो. हे निर्णायक घटक खालीलप्रमाणे आहेत :

**अंतर्गत निर्णायक घटक.**

**१. आकार आणि भौगोलिक परिस्थिती:** राष्ट्र-राज्याच्याभौगोलिक आकाराचा परराष्ट्र धोरणावर स्वाभाविक परिणाम होतो. सर्वसाधारण धारणेनुसार राष्ट्र-राज्याचा भौगोलिक आकार जेवढा जास्त तेवढा आंतरराष्ट्रीय राजकारणात त्याचा दरारा जास्त असतो. या धारणेमागे ३ कारणे आहेत: एक, मोठ्या भौगोलिक क्षेत्रफळामुळे जास्त नैसर्गिक साधनसंपत्ती राष्ट्राच्या वाटेस येऊ शकते. दोन, वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी, उदाहरणार्थ शेतीचा विस्तार करून अन्न-धान्याचे जास्त उत्पादन करण्यासाठी विस्तृत क्षत्रफळ उपयोगी येऊ शकते. तीन, मोठ्या भूप्रदेशावर ताबा मिळवणे शत्रू राष्ट्रांना कठीण असल्याने आकाराने मोठी राष्ट्रे अपराजित राहू शकतात. जागतिक पटलावर महाशक्ती म्हणून उदयास येण्याच्या भारताच्या सामुहिक इच्छा-शक्ती मागील आत्मविश्वास निर्माण होण्यात भारताच्या विशाल भौगोलिक आकाराची भूमिका मोठी आहे.

जगातील राष्ट्रांमध्ये आकाराच्या मानाने भारताचा ७ वा क्रमांक लागतो. आंतराष्ट्रीय राजकारणावर वर्चस्व असणाऱ्या अमेरिका, रशिया आणि चीन या देशांचा भौगोली आकार सुध्दा विशाल आहे. मोठ्या भौगोलिक आकारामुळे भारतासारख्या देशाची सीमा अनेक राष्ट्रांशी संलग्नित होत असल्याने त्या राष्ट्रांसाठी भारत आपोआप महत्वपूर्ण देश होती तर त्याचवेळी अनेक शेजारी लाभल्याने भारताचे परराष्ट्र धोरण अधिक आव्हानात्मक होते. भारताच्या विशाल आकारामुळे आशियातील सर्वच महत्वाचे प्रदेश भारताला जवळचे होतात. दक्षिण-पूर्व आशिया, चीन, मध्य आशिया आणि पश्चिम आशिया या महत्वपूर्ण आर्थिक व सामरिक उलाढलींच्या प्रदेशांची भारताला जवळीक आहे. या प्रदेशातील देशांना भारताला दुर्लक्षित करणे शक्य नसल्याने जागतिक राजकारणात भारताला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. विशाल भौगोलिक आकारासह मोठी लोकसंख्या असल्याने जागति महाशक्तींसह सर्वच देशांना भारताची नोंद घेणे अपरिहार्य आहे. भारतातील मुबलक मनुष्यबळामुळे विकसित पाश्चात्य देशांसह पश्चिम आशियातील तेल निर्यातीने श्रीमंत झालेल्या देशांना भारताचे आकर्षण आहे. भारतातून अस्थायीरीत्या स्थलांतरीत झालेले मनुष्यबळ या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेचा महत्वाचा भाग बनले आहे. त्याचवेळी भारतीय नागरिकांच्या रोजगाराच्या सुरक्षेसाठी या सर्व देशांशी मैत्रीपूर्ण संबंध कायम ठेवणे भारतासाठी गरजेचे आहे.

आकाराने लहान असलेल्या देशांना मनुष्यबळ आणि साधनसंपतीच्या अभावाने जागतिक राजकारणावर फारसा प्रभाव टाकता येत नाही यात सुध्दा तथ्य आहे. आशिया-पैसिफिक क्षेत्रातील अनेक लहान-लहान राष्ट्रे, आफ्रिकेतील देश आणि कैरेबियन राष्ट्रे यांचे या संदर्भात उदाहरण देता येईल. म्हणजेच भौगोलिक आकार आणि लोकसंख्या हे घटक परराष्ट्र धोरणात महत्वाची सकारात्मक भूमिका पार पाडतात असे म्हणता येईल. राष्ट्राचे जागतिक नकाशातील स्थान सुध्दा त्याच्या परराष्ट्र धोरणावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव निर्माण करत असते. महाशक्तींच्या शेजारच्या राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचा केंद्रीय मुद्दा हा त्या महाशक्तीशी कशा प्रकारचे संबंध ठेवायचे हा असतो. स्वातंत्र्यानंतर भारताला आपले स्वतंत्र परराष्ट्र धोरण विकसित करता आले यामागे एक महत्वपूर्ण कारण होते की तत्कालीन महाशक्ती म्हणजे अमेरिका आणि सोविएत संघ, यांच्यापासून भारताचे भौगोलिक अंतर खूप जास्त आहे. मात्र सोविएत संघाच्या शेजारील यरोपीय देशांना किव्हा अमेरिकेच्या शेजारील मध्य अमेरिकी व लैटीन अमेरिकी देशांना हे सौभाग्य प्राप्त झाले नव्हते. राष्ट्राला समुद्र किनारा आणि बंदरगावांसाठी योग्य स्थळे लाभली आहेत की नाही याचा सुध्दा त्याच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम होतो. अफगाणिस्तान आणि नेपाळसारख्या चहूबाजूंनी जमिनींनी वेढलेल्या देशांना नाविक दल विकसित करणे शक्य नसते आणि आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी त्यांना इतर शेजारी देशांमधील बदरगावांच्या वापरावर अवलंबून रहावे लागते.

मात्र वरील धारणांना तडा देणारी उदाहरणे सुध्दा जागतिक राजकारणात आहेत. नेपाळला समुद्र किनारा लाभला नसला तरी आशियातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या २ अर्थव्यवस्थांमध्ये, म्हणजेच भारत आणि चीन यांच्या दरम्यान, नेपाळचे भौगोलिक स्थान असल्याचा फायदा या देशाला मुळू लागला आहे. त्याचप्रमाणे, आकाराने लहान असलेल्या इंग्लंड आणि जपान सारख्या देशांनी जागतिक राजकारणास मोठ्या प्रमाणात प्रभावी केले आहे तर दुसरीकडे बांगला देश सारखा प्रचंड मनुष्यबळ असलेला देश

जागतिक राजकारणात प्रभावहीन आहे. दुसरीकडे ऑस्टेलिया आणि कॅनडा सारख्या खंडप्राय देशांचा जागतिक पटलावरील राजकीय प्रभाव क्षीणच आहे. ऑस्टेलिया आणि कॅनडातील विरळ लोकसंख्येने आणि या देशांनी अमेरिकेच्या वर्चस्वाखाली नांदायचे धोरण पत्करल्याने जागतिक राजकारणात त्यांचा वेगळा प्रभाव निर्माण झाला नाही. त्याचप्रमाणे, या देशांनी सुध्दा त्यांच्या मनुष्यबळाच्या तसेच एकांगी भौगोलिक स्थानामुळे निर्माण होणाऱ्या सामरिक मर्यादा ओळखत जागतिक राजकारणात अवाजवी हस्तक्षेप करण्याचे टाळले आहे. इंग्लंड आणि जपानचा भौगोलिक आकार लहान असला तरी त्या आकाराच्या तुलनेत मुबलक मनुष्यबळाची उपलब्धता, औद्योगिक विकास, सागरी सामर्थ्य आणि व्यवस्थापन कौशल्य याच्या जोरावर त्यांनी आपले आगळे स्थान निर्माण केले आहे.

देशाच्या आकाराप्रमाणेच देशातील हवामान, जमिनीची पिक-उत्पादकता, पिकांमधील वैविध्य, जमिनीच्या आत खनिजे, नैसर्गिक वायू, तेल यांची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता इत्यादी भौगोलिक बाबींचा राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम होती. या घटकांची मुबलक उपलब्धता असल्यास देशाला इतर देशांच्या सहकार्यवर फारसे अवलंबून रहावे लागत नाही आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वबाळावर भूमिका घेण्याचे धारिष्ट्य प्राप्त होते. स्वातंत्र्यानंतर भारताला भांडवलशाही गटात किंवा साम्यवादी गटात सहभागी होण्याची आवश्यकता भासली नाही कारण देशांतर्गत मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध होती तसेच सर्व देशांशी व्यापार करावयासाठी गरजेच्या वस्तू/उत्पादने आणि मार्ग उपलब्ध होते. त्यामुळे भारताला कोणत्याही गटामध्ये सहभागी न होता स्वतःचे गट-निरपेक्षतेचे धोरण विकसित करणे आणि त्याभोवती अनेक देशांना लामबंद करणे शक्य झाले होते.

२. **इतिहास आणि सांस्कृतिक वसा :** ऐतिहासिक अनुभव आणि सांस्कृतिक परंपरा यांचा राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर ठसा उमटलेला असतो. एकसंध संस्कृती आणि देशातील सर्व भागांचे समान ऐतिहासिक अनुभ असतील तर त्या राष्ट्राला सातत्यपूर्ण परराष्ट्र धोरण आखणे तुलनेने सोपे असते. मात्र सांस्कृतिक विविधतेसह भूतकाळात प्रत्येक प्रांतांचे वेगवेगळ्या काळात वेगवेगळे ऐतिहासिक अनुभव असतील तर परराष्ट्र धोरणात देशातील सर्व भूभाग व समुदायांच्या लोकांच्या चिंता तसेच इच्छा आकांक्षांना समाविष्ट करणे ही तारेवरची कसरत होऊ शकते. भारतासारख्या खंडप्राय देशाला आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करतांना सर्व प्रांतांना आणि त्यामधील लोकांना जोडणाऱ्या समान दुव्याला सर्वेच्च स्थान देणे क्रमप्राप्त होते. भारताच्या बाबतीत हा समान ऐतिहासिक घटक होता वसाहतवाद विरोधी स्वातंत्र्य चळवळा स्वातंत्र्य आंदोलनात विकसित झालेल्या मूल्यांना आणि उद्दिष्टांना परराष्ट्र धोरणात अग्रक्रम देत जवाहरलाल नेहरू यांनी परराष्ट्र धोरणाबाबत सार्वमत बनवण्यात यश मिळवले होते. काळाच्या ओघात भारताच्या परराष्ट्र धोरणालादेखील सातत्य राखण्याच्या बाबतीत नवनव्या आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. जागतिक अण्वस्त्र निःशस्त्रीकरणाची मागणी करत असतांना अण्वस्त्रधारी होणे, इतर राष्ट्रांच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्विकारले असतांना श्रीलंकेतील तामिळ नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नरत असणे इत्यादी मुद्यांचा समावेश आहे.

३. **आर्थिक आणि तंत्रज्ञानाचा विकास :** आर्थिक विकास आणि तंत्रज्ञानातील प्रगती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. औद्योगिक विकासातून आर्थिकदृष्ट्या संपन्न झालेले देश आधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्यात देखील इतरांच्या तुलनेत खूप पुढे आहेत. स्वाभाविकतः आर्थिक उन्नती तंत्रज्ञानातील प्रगतीने देशाच्या परराष्ट्र धोरणाला आत्मविश्वास प्राप्त होतो आणि आक्रमकपणे आपली उद्दिष्ट्ये प्राप्त करण्याचे परराष्ट्र धोरण आखणे शक्य होते. आर्थिक संपन्नता आणि तंत्रज्ञानाचा विकास याच्या जोरावर देशाचे लष्करी सामर्थ्य वाढवणे सहज शक्य होते आणि सैन्य शक्ती विकसित करण्यासाठी इतर राष्ट्रांच्या मदतीवर विसंबून राहण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते. दुसरीकडे, गरजू देशांना आर्थिक मदत आणि तंत्रज्ञानाची निर्यात याद्वारे अनेक देशांवर आपला प्रभाव टाकणे आणि घनिष्ट मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे प्रगत देशांना शक्य होते. अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांना परराष्ट्र धोरण ठरवतांना आर्थिक-तंत्रिक दृष्ट्या प्रगत देशांकडून मिळणाऱ्या/मिळू शकणाऱ्या मदतीची गंभीर दखल घेणे अपरिहार्य आहे. द्वितीय विश्वयुद्धानंतर जर्मनी व जपान या देशांनी लष्करी सामर्थ्य वाढवले नसले तरी त्यांची आर्थिक संपन्नता आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी साध्य केलेल्या प्रगतीमुळे जागतिक राजकारणात त्यांनी महत्वाचे स्थान प्राप्त केले आहे. भारत आणि चीनच्या जागतिक पटलावरील बहुचर्चित उदयामागे या दोन्ही देशांनी अलीकडच्या काळात केलेली आर्थिक प्रगती आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मारलेली मुसंडी आहे. या विपरीत, सोविएत संघाच्या विघटनानंतर रशियाचा औद्योकिक विकास मंदावल्याने जागतिक राजकारणात या देशांची थोडी पीछेहाट झाली आहे.

रोसेनौ यांच्या मतानुसार, तंत्रज्ञानातील बदलाने देशाचे आर्थिक आणि लष्करी सामर्थ्य बदलू शकते आणि त्याचा परिणअम त्या देशाच्या जगतिक राजकारणातील स्थानावर व भूमिकेवर होऊ शकतो. (James N Rosenau, in Thompson and Boyd, (eds), World Politics : An Introduction, pp.21-22) मात्र, हे सुध्दा तेवढेच खरे आहे की जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेत प्रगत देशांच्या तंत्रज्ञानातील वर्चस्वाला विकसनशील देश प्रशिक्षित मनुष्यबळाच्या आधारे टक्कर देऊ शकतात. भारत आणि चीन सारख्या विकसनशील देशांचे महत्व औद्योगिक दृष्ट्या विकसित देशांमध्ये वाढले असल्याचे एक प्रमुख कारण म्हणजे या दोन्ही देशातील प्रशिक्षित मनुष्यबळाची हे आहे.

४. **लष्करी सुसज्जता :** इतर राष्ट्रांनी किंवा राष्ट्र - बाह्यशक्तींनी सशस्त्र आक्रमण केल्यास त्यास सडेतोड उत्तर देत देशाच्या सीमांचे रक्षण करण्याच्या राष्ट्रीय सामर्थ्याचा राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावार चांगला किंवा वाइट परिणाम होतो. या संदर्भात देशाचे लष्करी सामर्थ्य जेवढे बलवान तेवढे देशाचे परराष्ट्र धोरण स्वतंत्र वाट जोपासू शकते. मात्र लष्करी सामर्थ्यात कमतरता असेल तर स्वतंत्र परराष्ट्र धोरण ठरवण्याऐवजी जागतिक महाशक्तिशी संधी करण्यावर किंवा अनेक देशांसोबत एकत्र येत लष्करी गट तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. द्वितीय विश्वयुध्दानंतर शत्रू-पक्षापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी अनेक देशांनी एक तर अमेरिकेशी युती केली किंवा सोविएत संघाच्या छत्र-छायेखाली जाणे पसंत केले. लष्करी सामर्थ्याच्या बळावर युध्दामध्ये विजय मिळवल्यास देशाच्या जागतिक प्रतिष्ठेत लक्षणीय वाढ होते आणि पराभव वाटेस आल्यास देशाची जागतिक प्रतिष्ठा मोठ्या प्रमाणात कमी होते. सन १९६२ मध्ये भारताला चीनच्या आक्रमणाचा योग्य प्रकारे सामान करता न आल्याने विकसनशील देशांमधील भारताच्या

पुढारीपणाला धक्का लागला होता. मात्र त्यानंतर सन १९७१ मध्ये पाकिस्तानचा युध्दात दारूण पराभव करत आणि बांगला देशाच्या निर्मितीत महत्वाची भूमिका बजावत भारताने आपली गमावलेली प्रतिष्ठा परत मिळवली होती. सन १९९८ मध्ये भारताने अण्वस्त्राधारी होण्याचा निर्णय जाही केल्यानंतर प्रगत देशांनी काही काळ विरोधाची भूमिका घेतली पण त्यानंतर भारताशी संबंध सृद्ढ करण्यास प्राधान्य दिले.

५. **सामाजिक संरचना :** राष्ट्राच्या सामाजिक संरचनेचा किंवा त्यातील बदलांचा परराष्ट्र धोरणावर तत्काळरित्या कमी पण दीर्घकाळात दूरगामी परिणाम होऊ शकतो. अर्थात, एखाद्या देशाची सामजिक संरचना एकजिनसी आहे की विविधतेची आहे. हे ठरवण्याची परिमाणे निश्चित नाही. त्याचप्रमाणे एकजिनसी संरचनेत एकात्मता जास्त असते आणि विविध छटांच्या सामाजिक संरचनेत राष्ट्रीय एकात्मतेत कमी येते असा सिध्दांत सुध्दा छातीठोकपणे मांडता येणार नाही. असे असले तरी एखाद्या राष्ट्रात वर्ण, धर्म, जात इत्यादीमध्ये भेदभाव आणि परस्परांवरील अविश्वास यामुखे सतत संघर्ष किंवा तणावाची स्थिती उत्पन्न होत असेल तर देशाच्या परराष्ट्र धोरणाला मर्यादा पडू शकतात. राष्ट्राच्या अंतर्गत सामाजिक संघर्षामुळे गृहयुध्द सुरू झाल्यास किंवा गृहयुध्दसृध्दा परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा विपरीत परिणाम राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर होणे अपरिहार्य आहे. २० व्या शतकात भारतासारखे क्लिष्ट सामाजिक संरचनेचे अनेक देश स्वतंत्र होऊन जागतिक राजकारणात सक्रिय झालेत. सामाजिक संरचनेतील क्लिष्टतेमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या संघर्षाचा परिणाम परराष्ट्र धोरणावर होऊ नये यासाठी भारतासारख्या देशाने राष्ट्रवादाची भावना आणि स्वातंत्र्य-लढ्याचा प्रेरणादायी इतिहास यांचा वापर प्रभावीपणे केला आहे.

६. **राष्ट्रीय सामर्थ्य :** देशाचे राष्ट्रीय सामर्थ्य विकास, तंत्रज्ञानातील प्रगती, लष्करी बळ आणि सामाजिक सामंजस्यासह राष्ट्रीय एकात्मतेची भावना या घटकांवरून निर्धारित होते. राष्ट्रीय सामर्थ्याचा देशाच्या परराष्ट्र धोरणावर मोठा प्रभाव असतो. राष्ट्रीय सामर्थ्यातील बदलावानुसार परराष्ट्र धोरणात सुध्दा बदल घडू शकतात. जागतिक राजकारणापासून विलगीकरणाचे धोरण बदलत सक्रिय भाग घेण्याचे धोरण स्विकारले. द्वितीय विश्वयुध्दात मित्र-पक्षांचा विजय झाल्यानंतर देखील त्यावेळचा मित्र-पक्षांचा म्होरक्या ग्रेट ब्रिटेनने नेतृत्वाची छडी अमेरिकेकडे सोपवली. द्वितीय विश्वयुध्दातील सहभागाने ब्रिटेनच्या राष्ट्रीय सामर्थ्यात लक्षणीय कमी झाल्यामुळे या देशाने भांडवलशाही गटाचे नेतृत्व अमेरिकेकडे सुपूर्द केले. अलीकडच्या काळात चीनच्या राष्ट्रीय सामर्थ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यानंतर या देशाच्या परराष्ट्र धोरणात आक्रमकता येऊ लागल्याचे निरीक्षकांचे मत आहे. राष्ट्रीय सामर्थ्य वाढल्यामुळे चीनच्या आशियाई आणि आफ्रिकी देशांतील प्रभाव सातत्याने वाढत असल्याबाबत निरीक्षकांमध्ये एकमत आहे.

७. **राष्ट्र-राज्याची विचारधार :** राष्ट्र-राज्याने अधिकृतपणे एखाद्या विचारधारेचा स्विकार केला असेल किंवा एखाद्या धर्म अथवा वर्णाच्या रक्षणासाठी/प्रसारासाठी राष्ट्र-राज्याची निर्मिती झाल्याचे प्रमाणित करण्यात येत असेल तर देशाचे परराष्ट्र धोरण सुध्दा त्यानुसार निर्धारित होते. सन १९३० च्या दशकात, जर्मनीतील सत्ताधारी नाझी पक्षाच्या आर्य वर्णाच्या श्रष्ठतेचा आग्रह त्या देशाच्या आक्रमक परराष्ट्र धोरणात परिवर्तीत झाला होता.

त्याचप्रमाणे, अमेरिका आणि सोविएत संघ या महाशक्तीच्या परराष्ट्र धोरणात अनुक्रमे भांडवलशाही आणि साम्यवादी व्यवस्थांचे रक्षण आणि प्रसार यांना अग्रस्थान प्राप्त होते.

८. **इंटरनेट आणि त्यावरील सामाजिक माध्यमांचा फैलाव :** २१ व्या शतकात इंटरनेट, विशेषतः सामाजिक माध्यमांची संकेतस्थळे, मोठ्या प्रमाणात इ-मेल द्वारे संपर्क राखणे आणि संदेश पोहोचवणे, ताज्या बातम्या आणि संबंधीत लेखांची संकेतस्थळे, इत्यादी माहिती तंत्रज्ञानाशी संबंधीत माध्यमांचा परराष्ट्र धोरणावर नियंत्रित पण अचूक प्रभाव पडण्यास सुरूवात झाली आहे. केवळ व्यापारी आणि तांत्रिक कारणासाठी इंटरनेटच्या वापरला परवानगी देण्यात आली तरी इंटनेटची एकंदरीत संरचना अशी आहे. की त्याद्वारे माहितीची आणि भूमिकांची देवाणघेवाण पूर्णपणे थांबवणे शक्य नाही. परिणामी, खुल्या निवडणुका आणि बहु-पक्षीय पध्दती नसलेल्या देशांमध्ये सुध्दा इंटरनेट आणि त्याचाशी संबंधीत सामाजिक माध्यमांचा फैलाव झालेला असल्यामुळे त्यांच्या परराष्ट्र धोरणावरील प्रभावाकडे अभ्यासक लक्ष लावून आहेत. चीनसारख्या देशात इंटरनेट वरील चर्चेवर आणि माहितीच्या देवाणघेवाणीवर सरकारी यंत्रणेचे बारीक लक्ष असते, तरी सुध्दा चीनचे नागरिक राष्ट्रीय महत्वाच्या अनेक मुद्यांवर आपली मते मांडत सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत असतात. विशेषतः राष्ट्रीय सुरक्षेच्या आणि राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या मुद्यांवर सरकारवर टिकाटिप्पणी करण्याचे प्रमाण चीनमध्ये लक्षणीय रित्या वाढलेले आहे. महत्वाचे म्हणजे, इंटरनेटवर व्यक्त होणाऱ्या मतांना चीनचे सरकार गांभीर्याने घेऊ लागले आहे. पूर्वीच्या यगोस्लावियाच्या विघटनाच्या प्रक्रियेत नाटोच्या विमानांनी केलेल्या बॉम्ब हल्ल्यात चीनच्या दूतावासाचे मोठे नुकसान झाले होते. त्यावेळी चीनच्या नागरिकांनी इंटनेटवरून प्रचंड रोष जाहीर करत चीन च्या सरकारला नाटो विरूध्द कडक भूमिका घ्यायला लावली होती. त्याचप्रमाणे, जपानच्या बाबतीत चीनचे नागरिक सामाजिक माध्यमांतून वेळोवेळी आपला राग व्यक्त करत असतात. चीनच्या जपानविषयक परराष्ट्र धोरणावर याचा मोठ परिणाम झालेला आहे.

९. **राज्यव्यवस्थेचा प्रकार :** राष्ट्रांची राज्यव्यवस्था कोणत्या प्रकाराची आहे याचा परराष्ट्र धोरण ठरवण्यात आणि त्याच्या अंमलबजावणीत सिंहाचा वाटा असतो. एक-पक्षीयव्यवस्था किंवा लष्करी हुकुमशाहीत परराष्ट्र धोरणाचे निर्णय ताबडतोब घेणे शक्य असले तरी ते दूरगामी राष्ट्रहिताचे असतील याची खात्री देता येत नाही. मुळात एक-पक्षीय व्यवस्था किंवा लष्करी हुकुमशाही पद्धतीत राष्ट्रहिताची व्याख्या अत्यंत संकुचित असण्याची जास्त शक्यता असते. अशा संकुचित राष्ट्रहितावर आधारीत परराष्ट्र धोरणाचा परिणाम जागतिक राजकारणात देशाच्या एकांगी पडण्यावर होऊ शकतो. उत्तर कोरियातील कथित कम्युनिस्ट सरकार अथवा काही काळापूर्वीपर्यंत म्यानमारचा कारभार एकहस्ती चालवणारा लष्करी गटांच्या परराष्ट्र धोरणामुळे हे देश जागतिक राजकारणात वाळीत पडले होते. अशा रांजवटीत देशाच्या नागरिकांच्या इच्छा-आकांक्षांना परराष्ट्र धोरणात स्थान प्राप्त झाले की नाही हे ठरवणे कठीण असते कारण नागरिकांना त्यांची मते कुल्याने मांडून चर्चा करण्याचा वाव कमी असतो. लोकशाही व्यवस्थांमध्ये प्रसारामध्ये, राजकीय पक्षांची व्यासपीठे आणि लोकप्रतिनिधीगृहांमध्ये परराष्ट्र धोरणावर व्यापक चर्चा घडत असल्याने जनमताच ठाव घेण्याची संधी सत्ताधाऱ्यांना मिळते असते आणि जनमतानुसार धोरणांमध्ये बदल करण्याचे आव्हान सरकारला पेलावे लागते. विएतनाम युद्धाच्या काळात अमेरिकी जनमत सरकारच्या लष्करी हस्तक्षेपाच्या धोरणाच्या विरोधात गेले होते.

अमेरिकी सरकारच्या विएतनाममधून काढता पाय घेण्याच्या निर्णयामागे जनमताचा रेटा हे एक प्रमुख कारण होते.

लोकशाहीप्रधान राष्ट्रे आपापसात युध्दाच्या टोकाच्या भूमिकेपर्यंत जात नाहीत आणि हुकुमशाही व्यवस्थेतील राष्ट्रांमध्ये युद्धखोरी जास्त असते या सिध्दांताला २० व्या शतकात आंतराष्ट्रीय संबंधाच्या क्षेत्रात मान्यता प्राप्त झाली होती. ज्या दोन किंवा दोन पेक्षा जास्त राष्ट्रांमध्ये युध्द होते तेव्हा त्यांच्यापैकी निदान एका राष्ट्रात तरी हुकुमशाही / एक-पक्षीय व्यवस्था / लष्करी राजवट असते असे या सिद्धांतात सप्रमाण दाखवण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तान दरम्यानच्या युध्दांना हा सिध्दांत लागू होतो. सन १९६५ आणि १९७४ मध्ये भारत आणि पाकिस्तान दरम्यान झालेल्या युध्दांच्या वेळी पाकिस्तानात लष्करी राजवट होती पाकिस्तानात लोकशाही नांदत असतांना दोन्ही देशांमध्ये तणावाचे अनेक प्रसंग आलेत तरी युध्दास तोड फुटले नाही.

खुल्या निवडणुकीवर आधारीत बहु-पक्षीय पध्दतीत राष्ट्रहिताचा जास्त सखोल विचार करण्याची प्रक्रिया अंतर्भूत असते मात्र निर्णयप्रक्रिय किचकट होऊ शकते. त्यामुळे लोकशाहीप्रधान देशांमध्ये परराष्ट्र धोरणाचे निर्णय ताबडतोब घेणे बरेचदा शक्य नसते. लोकशाहीप्रधान देशांमध्ये अस्तित्वात असलेल्या सरकारचे बहुमत कशा प्रकारचे आहे यांवर सुध्दा परराष्ट्र धोरणाची निर्णयप्रक्रिया अवलंबून असते. एकाच पक्षाच्या बहुमताचे सरकार असेल तर परराष्ट्र धोरणासंदर्भातील निर्णय घेणे सोपे असते आणि अनेक पक्षांच्या आघाडीचे सरकार असेल तर बरेचदा अवघड होऊन बसते. सन १९९६ नंतर भारताने आघाडीच्या सरकारांमध्ये परराष्ट्र धोरणाचे निर्णय कशाप्रकारे जाहीर चर्चेचे विषय होतात याचा अनेकदा अनुभव घेतला आहे. लोकशाहीप्रधान देशांमध्ये राष्ट्राध्यक्षीय पध्दत आहे की संसदीय प्रणाली आहे यावरून त्या-त्या राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाची निर्णयाप्रक्रिया ठरत असते. संसदीय प्रणालीत परराष्ट्र धोरणाबाबत मंत्रीमंडळाचा निर्णय अंतिम असतो तर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षीय पद्धतीत परराष्ट्र धोरणातील महत्वाच्या बाबींवर अमेरिकी काँग्रेसची, विशेषतः काँग्रेसचे वरिष्ठ सदन - सिनेटची - मोहोर असणे आवश्यक असते.

१०. **राष्ट्राचे नेतृत्व :** परराष्ट्र निर्धारित करण्यात देशाच्या नेतृत्वाची भूमिका महत्वपूर्ण असते. रोसेनौ यांच्या मतानुसार, "नेतृत्वाची तत्वनिष्ठ", आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आकलन, बौद्धिक क्षमता, व्यक्तीगत जीवनातील अनुभव, मानसिक गरजा आणि विश्वासातील व्यक्तींचे विचार या बाबींचा देशाचे परराष्ट्र धोरण ठरवण्यावर आणि अंमलबजावणीवर निश्चितपणे परिणाम होतो. (James N Rosenau in Rosenau, Thompson and Boyd, (Eds), World Politics : An Introduction, p.28) राज्यव्यवस्थेतील प्रक्रिया प्रणाली आणि सामाजिक संरचना तसेच राष्ट्रीय सामर्थ्य या सर्वाची परराष्ट्र धोरण विकसित होण्यात महत्वाची भूमिका असली तरी संकटाच्या काळात आणि पेचप्रसंगी राष्ट्राच्या नेतृत्वाने घेतलेल्या निर्णयाची परराष्ट्र धोरणावर अमीट छाप उमटते. द्वितीय विश्वयुध्दात विन्स्टन चर्चिल यांच्या खंबीर नेतृत्वाने इंग्लंडला कठीण परिस्थितीत विजय प्राप्त करवून दिला होता. सन १९७१ च्या भारत-पाकिस्तान युध्दादरम्यान इंदिरा गांधीच्या चाणाक्ष निर्णयांनी अमेरिका आणि चीन तर्फे आलेला दबाव झिडकारून लावत लावत पाकिस्तानला पराभूत करण्यात अग्रणी भूमिका बजावली होती.

**बाह्य निर्णायक घटक**

**१. जागतिकपरिस्थिती :** विशिष्ट काळातील जागतिक परिस्थितीनुसार राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणात लघुकालीन ते दिर्घकालीन बदल घडत असतात. जागतिक राजकारणाच्या संरचनेत आपापल्या राष्ट्रांच्या हितांचे रक्षण करणाऱ्याच्या उद्दिष्टांनी परराष्ट्र धोरणाची पुर्नचना करण्यात येते. भारत ज्या वेळी स्वतंत्र झाला त्यावेळी भांडवलशाही देश आणि साम्यवादी देश अशा दोन गटांमध्ये जग विभाजित झाले होते. ही परिस्थिती भारताच्या फायद्याची नव्हती पण ती बदलणे शक्यही नव्हते. त्यामुळे भारताने गट-निरपेक्षतेचा पुरस्कार करत स्वतःसाठी दोन्ही गटांपासून वेगळे स्थान निर्माण केले. भारताने कोणत्याही गटाशी लष्करी संधी न करता प्रत्येक देशांशी राजकीय आणि व्यापारी संबंध मजबूत करण्यास सुरूवात केली. मात्र, काही वर्षामध्येच भारत-चीन संबंधांमध्ये तीव्र कटुता आल्याने आणि पाश्चिमात्य भांडवलशाही गटाने पाकिस्तानला लष्करी मदत पुरवण्यास सुरूवात केल्याने भारताने आपल्या धोरणात फेरबदल केला. भारताच्या दृष्टीने ही बदललेली परिस्थिती होती. गट-निरपेक्षतेचा त्याग न करता सोविएत संघाशी मैत्रीपूर्ण संबंध बळकट करण्यावर भारताने जोर दिला. पुढे सोविएत संघाचे विघटन झाल्यानंतर एकूणच जागतिक परिस्थिती द्वी-ध्रुवीय विश्वातून एक-ध्रुवीय विश्वात परिवर्ती झाली. भारताने रशियाशी पुर्वापारचे चालत आलेले संबंध कायम ठेवलेत पण त्यासोबत अमेरिका आणि इतर प्रगत भांडवलशाही देशांशी संबंधांची पुर्नबांधणी करण्यास सुरूवात केली. यातून भारताने नव्या जागतिक संरचनेत स्वतःचे स्थान भक्कम केले.

**२. शत्रू पक्षाचे लष्करी सामर्थ्य :** जागतिक राजकारणात शांततामय सहजीवनाचे एखाद्या राष्ट्राचे ध्येय जरी असले तरी इतर देशांचा, विशेषतः शेजारी देशांचा किंवा वैचारिक दृष्ट्या विरोधात असलेल्या देशांचा, प्रतिसाद अनुकूलच असेल असे नाही. अशा परिस्थितीत आपल्या राष्ट्राला हव्या असलेल्या ध्येयांना तिलांजली न देता राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्याचे आव्हान परराष्ट्र धोरणापुढे उभे राहते. या संदर्भात शत्रू स्पर्धक राष्ट्रांचे लष्करी सामर्थ्य ध्यानात घेऊन परराष्ट्र धोरणाची रचना करणे क्रमप्राप्त होते. म्हणजेच, लष्करीकरण हे परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट नसले तरी राष्ट्रीय नसले तरी राष्ट्रीय हितांसाठी लष्कराला बळकट करण्याच्या दृष्टीने परराष्ट्र धोरणात पाउले उचलावी लागतात. स्वातंत्र्यानंतर भारताने निःशस्त्रीकरणाचा हिररीने पुरस्कार केला असला तरी शेजारी राष्ट्रांकडून असलेला धोका लक्षात घेताआपले लष्कर आधुनिक आणि बळकट ठेवण्याच्या दृष्टीने परराष्ट्र धोरणाला आयम दिला.

एकंदरीत, परराष्ट्र धोरणाची तत्वप्रणाली क्लिष्ट अंतर्गत आणि बाह्य निर्णायक घटकांनुसार निर्धारित होते. राष्ट्राची दिर्घकालीन उद्दिष्टे, सामुहिक आकांक्षा आणि नेतृत्वाची जागतिक पातळीवर भूमिका बजावण्याची महत्वाकांक्षा यांचा अंतर्गत आणि बाह्य निर्णायक घटकांशी मेळ बसल्यावर देशाच्या परराष्ट्र धोरणास अंतिम स्वरूप प्राप्त होते.

**आपली प्रगती तपासा**

१. परराष्ट्र धोरणाच्या अंतर्गत आणि बाह्य निर्णायक घटकांची चर्चा करा.
२. भारताच्या परराष्ट्र धोरणावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या निर्णायक घटकांची चर्चा करा.

## १.६ थोडक्यात महत्वाचे

आधुनिक काळात राष्ट्र-राज्यांना आपापल्या राष्ट्रहितांचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी परराष्ट्र धोरण आखण्याची आवश्यकता निर्माण झाली. परराष्ट्र धोरणाची तत्वप्रणाली तयार करण्याची आणि त्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया क्लिष्ट आणि सतत विकास पावणारी असल्याने त्याची नेमकी व्याख्या करण्याबाबत तज्ञांमध्ये मतभेद आहेत. मात्र, परराष्ट्र धोरणाच्या व्यापक उद्दिष्टांबाबत तज्ञांमध्ये साधारणतः एकमत आढळते. त्यानुसार निर्धारित करण्यात आलेली परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे याप्रमाणे आहेतः १) देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण करणे, २) देशाच्या नागरिकांची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी बाह्य शक्तींना आवश्यक त्याप्रमाणे प्रभावीत करणे / अंकुशात ठेवणे, ३) इतर देशांशी वास्तव्यास असणाऱ्या देशाच्या नागरिकांची सुरक्षा आणि कल्याणाबाबत योग्य ती पाउले उचलणे, ४) इतर देशांशी सांस्कृतिक संबंध बळकट करत आपल्या देशाची संस्कृती व परंपरांचा परिचय करून देणे, ५) इतर देशांशी व्यापार, वाणिज्य, तंत्रज्ञान, शिक्षण, पर्यावरण, क्रीडा इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये संपर्क वाढवून देशाच्या अर्थव्यवस्थेस त्याचा लाभ पोहोचवणे.

प्रत्येक देशाचे परराष्ट्र धोरण निर्धारित करण्यामागे अनेक अंतर्गत आणि बाह्य निर्णायक घटक कार्यरत असतात. परराष्ट्र धोरणाला प्रभावीत करणारे अंतर्गत निर्णायक घटक पुढील प्रमाणे आहेतः १) आकार, लोकसंख्या आणि भौगोलिक स्थान, २) इतिहास, सांस्कृतिक मुल्ये आणि राष्ट्र-राज्य उभारणीची प्रक्रिया, ३) सामाजिक संरचना आणि राज्यव्यवस्थेचा प्रकार, ४) आर्थिक विकास, तंत्रज्ञानातील प्रगती, लष्करी बळ आणि सामाजिक संरचनेच्या मिलाफातून उभे राहाणारे राष्ट्रीय सामर्थ्य, आणि ५) वैचारिक खंबीरता आणि नेतृत्वगुण या अंतर्गत घटकांसह, जागतिक राजकारणाची संरचना व जडणघडण आणि शत्रू / स्पर्धक राष्ट्रांचे लष्करी बळ या बाह्य निर्णायक घटकांना ध्यानात घेऊन परराष्ट्र धोरणाची रचना करण्यात येते. राष्ट्र-राज्याची उद्दिष्टे, तत्कालिक राष्ट्र हित आणि निर्णायक घटकांची वस्तुस्थिती यांच्यातील समन्वयाने देशाच्या परराष्ट्र धोरणाला अंतिम रूप प्राप्त होते.

## १.७ संपूर्ण प्रकरणावर आधारीत प्रश्न

१. राष्ट्र-राज्याला आपल्या केंद्रीय राष्ट्रहीतांची रक्षा करण्यासाठी परराष्ट्र धोरणाची गरज का भासते?
२. परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या आणि उद्दिष्टे काय आहेत?
३. राष्ट्र-राज्याचे परराष्ट्र धोरण निर्धारित करणारे मुख्य निर्णायक घटक कोणकोणते आहेत?

## 1.8 REFERENCE

Bandyopadhyaya, J The Making of India’s Foreign Policy, Allied Publishers Pvt Ltd, 2003, New Delhi

Bandyopadhyaya, J, North Over South : A Non-Western Perspective of International Relations, South Asians, 1982, New Delhi

Brecher, Miachel, India and World Politics : Krishna Menon's View of the World, OUP, 1968, London

Chandra, Bipin and others, India Since Independence, Penguin Books, 2007, New Delhi

Dixit, J.N., My south Block Years : Memoirs of a Foreign Secretary, WBSPD, 1996, New Delhi

Jain, P.C., Economic Determinants of India's Foreign Policy : Nehru Years, Vitasta Publishing, 2012 New Delhi

Mathai, M.O., Reiniscences of the Nehru Age, Vikas Publications, 1978, New Delhi

Mattoo, Amitabh and Happymon Jacob, Shaping India's Foreign Policy, Har-Anand Publications, 2010

Mishra, K.P.(ed), Studies in India's Foreign Policy, Vikas Publicatios, 1969, New Delhi

Mukherjee, Amitaava and J. Bandyopadhyaya, International relations Theory : From Anarchy to World Government, Manuscript India, 2001, Howrah

Nehru, Jawaharlal, India's Foreign policy, Publications Divisions, 1962, New Delhi

Panandikar, V.A.Pai and Ajay K Sharma, The Indian Cabinet : A Study in Government, Konark, 1996, New Delhi

❖❖❖❖